
जानेवारी २०१८ / पाने ७६ / किंमत ₹१०

# लोकराज्य

स्मार्ट, समर्थ, संवेदनशील

## आपले पोलीस आपली अस्मिता



सत्यमेव जयते


महाराष्ट्र शासन

**मराठी भाषा विभाग**

**राज्य मराठी विकास संस्था**

आयोजित

# राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन कलाविष्कार स्पर्धा




## 'महाराष्ट्री ते मराठी'

या विषयावर आधारित

नाट्य, चित्र, शिल्प, संगीत

या कलांचा

एकात्म नाट्याविष्कार

(सादरीकरण कालावधी ४० मिनिटे)

मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, रत्नागिरी व सिंधुदुर्ग ही आठ केंद्रे

ऑनलाईन अर्ज व दृक्श्राव्यफिती
**rangavaikhari@gmail.com**
या इमेलवर पाठवण्याची
अंतिम तारीख १५ जाने.२०१८

पूर्व प्राथमिक फेरी- ऑनलाईन अर्ज व दृक्श्राव्यफिती निवड - १७-१८ जाने. २०१८

तालीम स्वरूपातील प्राथमिक फेरी- २५ ते २८ जाने. २०१८ दरम्यान

रंगमंचीय सादरीकरण, विभागीय अंतिम फेरी १० ते १९ फेब्रु. २०१८ दरम्यान

महाअंतिम फेरी: शनि.दि.२४ फेब्रु.२०१८, मुंबई

**पारितोषिके (महाअंतिम फेरी)**

- १.प्रथम - रु. १,५०,००० + स्मृतिचिन्ह+प्रमाणपत्र
- २.द्वितीय - रु. १,२५,००० + स्मृतिचिन्ह+प्रमाणपत्र
- ३.तृतीय - रु. १,००,००० + स्मृतिचिन्ह+प्रमाणपत्र
- ४. उत्तेजनार्थ २- रु.५०,००० + स्मृतिचिन्ह+प्रमाणपत्र

याशिवाय इतर अनेक भरघोस वैयक्तिक बक्षिसे

**राज्य मराठी विकास संस्था**

३ महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई ४००००१
rangavaikhari@gmail.com

अधिक माहितीसाठी
https://sites.google.com/site/rmvsrangavaikhari/
या संकेतस्थळाला भेट द्या

# अंतरंग


| | |
|---|---|
| सुरक्षित-सुव्यवस्थित महाराष्ट्र | ६ |
| प्रतिसाद आणि प्राधान्य | ८ |
| तंत्रज्ञानाच्या वापराला अग्रक्रम | १० |
| फोर्स वन : शौर्यातच असते विजयश्री | १२ |
| महामार्गाचे रक्षक | १५ |
| सक्षम, समर्थ, सदैव सज्ज | १६ |
| तत्पर तपास आणि अपराधसिद्धीत वाढ | १८ |
| संवेदनशील कर्तव्यदक्षता | १९ |
| अब हम रुकेंगे नहीं, छोडेंगे नहीं.... | २२ |
| निर्विवाद समर्थ मुंबई पोलीस | २६ |
| विश्वास वाढला... | ३० |
| बडी कॉप आणि पोलीस काका | ३२ |
| शोध आणि मुस्कान | ३४ |
| धडक कारवाई आणि प्रतिबंध | ३६ |
| पोलिसांना उच्च शिक्षणाची संधी | ३७ |
| तुमची सुरक्षा, तुमचे हित... | ४० |
| आपत्स्य सर्व सेवा कालम | ४१ |
| गुन्हेसिद्धीचे शास्त्रीय तंत्र | ४२ |
| डिजिटल तपासाची स्मार्ट दिशा | ४४ |
| सायबर युगाची आव्हाने | ४६ |
| सायबर क्राईम म्हणजे नक्की काय? | ४८ |
| सायबर गुन्ह्यांचा पाठलाग | ५० |
| सागरी सुरक्षिततेची सज्ज्ता | ५४ |
| गृहरक्षक : निष्काम सेवा | ५६ |
| संधी न्यायाची... | ५७ |
| प्रेरणादायी ऊर्जा | ५८ |
| दीदीचे साहाय्य | ५९ |
| संपर्कदूत 'दक्षता' | ६० |
| संधी शिक्षणाची... | ६१ |
| २४ तास आपल्या सेवेत... | ६२ |
| वनवैभव आणि निसर्ग पर्यटन | ६४ |
| नवी ऊर्जा देणारी 'उभारी' | ६६ |
| सुरक्षित वीज, सुरक्षित जीवन | ६७ |
| आर्थिक स्वावलंबन ते यशस्वी उद्योजिका | ६८ |
| रोपवाटिका ते ट्री मॉल | ७० |
| किमया आंतरपिकांची | ७२ |
| येथे कर माझे जुळती... | ७४ |




आपले पोलीस, आपली अस्मिता



**सुरक्षित-सुव्यवस्थित महाराष्ट्र ६**

महाराष्ट्र पोलीस दलात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आला आहे. सायबर गुन्हेगारीला पायबंद घालण्यास यश मिळत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे अत्यंत सुरक्षित आणि सुव्यवस्थित राज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढत आहे.

**फोर्स वन : शौर्यातच असते विजयश्री १२**



अत्याधुनिक हत्यार सामग्रीसह सदैव तत्पर शूर, धाडसी, देशासाठी जिवावर उदार झालेले, तेजतर्रार, चाणाक्ष, बलदंड, चित्याची झेप आणि गरुडाची नजर असलेले महाराष्ट्र पोलीस दलाचे कमांडो पथक-फोर्स वन..

**अब हम रुकेंगे नहीं, छोडेंगे नहीं.... २२**

पोलिसांच्या विशेष रणनीतीमुळे मागील तीन वर्षात नक्षल्यांकडून केल्या जाणाऱ्या घटनांच्या संख्येत घट होऊ लागली आहे. विविध चकमकीत मोठ्या प्रमाणावर नक्षली मारले जात असल्यामुळे त्यांचे संख्याबळही कमी झाले आहे.





**गुन्हेसिद्धीचे शास्त्रीय तंत्र ४२**

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय हे गुन्हा विश्लेषणास मदत करणारी अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा आहे. देशातील अग्रगण्य प्रयोगशाळांमध्ये तिचा समावेश होतो. या प्रयोगशाळेमार्फत विश्लेषण अहवाल अतिशय कमी वेळात उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे तपास यंत्रणेच्या कामाला गती प्राप्त होत आहे.

**सायबर युगाची आव्हाने ४६**

सध्याच्या डिजिटल युगामध्ये सायबर क्राईमचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे पोलीसदलाला अशा गुन्ह्यांचा तपास व त्यांना शिक्षा होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामग्रीची, आणि दररोज बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती असणे आवश्यक ठरणार आहे.



**सायबर गुन्ह्यांचा पाठलाग ५०**



दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारी वाढत आहे. त्याला बळी पडणाऱ्या नागरिकांची संख्याही वाढत आहे. या गुन्ह्यांची शोध घेणारी यंत्रणा पोलिसांनी प्रभावीपणे कार्यान्वित केली आहे. या यंत्रणेद्वारे अनेक गुन्ह्यांचा शोध यशस्वीपणे लावला जात आहे. अशा काही यशकथा.

वर्ष ६९ वे | अंक ७ | जानेवारी २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ – २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# ॲप्स तुमच्या मदतीला...

## ‘महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल ॲप’




महाराष्ट्र पोलीस विभागाच्या Maharashtra Police Citizen Portal (www.mhpolice.maharashtra.gov.in) यावर विविध २४ सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यापैकी निवडक सेवा Maharashtra Police Citizen Portal App च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येत आहे. हे ॲप गुगल प्ले स्टोअर तसेच ॲप स्टोअरमधून डाऊनलोड करू शकता. या मोबाइल ॲपमध्ये नोंदणी करून नागरिक ई–तक्रार देणे, पोलीस ठाण्याला माहिती देणे, प्रकाशित प्रथम खबर पाहणे, तक्रारीची सद्य:स्थिती पाहणे, अटक झालेल्या आरोपीची माहिती पाहणे, अनोळखी मृतदेहाची माहिती पाहणे, हरवलेल्या इसमाची माहिती पाहणे व इतर तीन सुविधांचा लाभ घेऊ शकतात.

ई–तक्रार केल्यानंतर तक्रारदारास त्याचा एसएमएस व ई–मेल प्राप्त होतो. त्यामध्ये तक्रारींचा क्रमांक व तक्रार कोणत्या पोलीस ठाण्यात देण्यात आली, याची माहिती देण्यात येते. तक्रारीच्या चौकशीसाठी चौकशी अधिकारी नेमल्यानंतर, तक्रारीवर काय कार्यवाही झाली. याची माहितीसुद्धा एसएमएसद्वारे तक्रारदारास देण्यात येते.


### प्रतिसाद ॲप

महिलांच्या सुरक्षिततेकरिता हे ॲप आहे. ते गुगल प्ले स्टोअरमधून डाऊनलोड करू शकता. संकटकाळी या ॲपमधील इमर्जन्सी बटन दाबताच नियंत्रण कक्षात तसेच ३ किलोमीटर अंतरात ड्यूटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, अंमलदार यांना त्यांच्या मोबाइलवर अलर्ट दिला जातो. मदत मागणाऱ्या व्यक्तीची पूर्ण माहिती, लोकेशन व तेथे पोहोचण्याचा मार्ग ॲपद्वारे दाखवला जातो व एसएमएसदेखील पाठवला जातो. मदत मागणाऱ्या व्यक्तीच्या मोबाइलवर त्याची तक्रार ओळखपत्र क्रमांक, त्याच्याजवळच्या भागात ड्यूटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा मोबाइल क्रमांक दिला जातो. मदत कुठपर्यंत पोहोचली आहे. याची माहितीदेखील पुरवली जाते. गुगल प्ले स्टोअर व ॲपल स्टोरमधून हे ॲप डाऊनलोड करून घेता येते.

**हेल्पलाइन (नियंत्रण कक्ष) : महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक :** १०९१, **संकटातील महिला, ज्येष्ठ नागरिक व बालकामगारांसाठी :** १०३, **नागरिकांसाठी हेल्पलाइन क्रमांक :** १००, **रुग्णवाहिका :** १०८

# जयहिंद मित्रा...

महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक संपन्न, सुसंस्कृत राज्य आहे. महाराष्ट्रात भारतातील सर्व प्रांतातून नागरिक व्यवसाय, व्यापार उदिमासाठी येतात. यातील बरेच जण स्थायिकही होतात. राज्यातील सामंजस्य हे इतरांसाठी कौतुकास्पद ठरत आले आहे. गुंतवणूकदार आणि उद्योजकांचा ओढा महाराष्ट्राकडे असतो, याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे राज्यातील अतिशय उत्कृष्ट असलेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती. यासाठी प्रामुख्याने श्रेय द्यावे लागते ते महाराष्ट्र पोलिसांना.




महाराष्ट्र पोलिसांचे कार्यकर्तृत्व सर्वमान्य झाले आहे. भारतातील सर्वाधिक सक्षम, सामर्थ्यशाली आणि प्रतिभाशाली असलेल्या पोलिसदलात राज्य पोलिसदलाचा समावेश होतो. मुंबई पोलिसांनी आपल्या कर्तृत्वाने जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवला आहे.

महाराष्ट्र पोलिसांना गौरवशाली इतिहास आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला त्यांचा मोठा हातभार लागला आहे. कारण शांतता नसेल आणि कायदा व सुव्यवस्थेबाबत नागरिकांना विश्वास वाटत नसेल तर, प्रगती आणि विकासाच्या वाटा खुंटतात; ही बाब निर्विवादपणे सिद्ध झाली आहे. त्यामुळे राज्य पोलिसांची कामगिरी ही सुवर्णमयी आहे.

दहशतवाद, नक्षलवाद, आर्थिक गुन्हेगारी, सायबर गुन्हेगारी अशा सर्व प्रकारच्या आव्हानांचा राज्याचे पोलीस समर्थपणे सामना करत आहेत. कोणत्याही संकटाचे आव्हान स्वीकारण्याचे सामर्थ्य महाराष्ट्र व मुंबई पोलिसांमध्ये आहे. मुंबईच्या जिवावर उठलेल्या दहशतवाद्यांचा सामना अत्यंत साहसाने मुंबई पोलिसांनी केला आहे. यात काही अधिकारी व पोलिसांना शहीद व्हावे लागले. पण जिवाची बाजी लावून त्यांनी या दहशतवाद्यांशी लढा दिला व मुंबईवरील मोठे संकट परतवून लावले. अशा संकटासोबतच नैसर्गिक आपत्तीच्या समयीही महाराष्ट्राचे पोलीसदल नागरिकांच्या व प्रशासनाच्या साहाय्याला धावत असते. कोणत्याही आपत्तीनंतर नागरिक व प्रशासनाची ऊर्जा व उत्साह लगेच पुनर्जीवित करण्यात राज्य पोलिसांचा मोठा हातभार लागतो.

सायबर क्राइमसारख्या नव्या तंत्राधिष्ठित आव्हानांचा सामना करण्यासाठी पोलिसांना आधुनिक उपकरणे व त्याचे प्रशिक्षण देऊन समर्थ व सक्षम केले जात आहे. महाराष्ट्राचा फोर्स वन, जलद प्रतिसाद दल व इतरही विभाग अत्यंत कार्यक्षमतेने आपल्या भूमिका बजावत आहेत. महिला व बालकांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्यात येते.

पोलिसांना २४ तास कार्यरत राहावे लागते. ते तुमच्या आमच्यासाठी सदैव सजग असतात. त्यांना आपली साथ मिळाली तर ते अधिक प्रभावीरीत्या आपली जबाबदारी पार पाडू शकतात. पोलीस हे आपले मित्र आहेत. त्यांच्याकडे आपण त्याच नजरेतून बघायला हवे आणि वागायला हवे. आपली आणि पोलिसांची मैत्री पक्की आणि दृढ झाली तर महाराष्ट्रावर येणाऱ्या कोणत्याही संकटाचा सामना यशस्वीपणे करता येईल.

या अंकात आम्ही महाराष्ट्र पोलिसांच्या देदीप्यमान कामगिरीचा विस्तृत आढावा घेतला आहे. या आढाव्यानंतर आपणासही वाटेल की, आपले पोलीस हे आपली अस्मिता आहेत. आपण त्यांना मनापासून सलाम ठोकून म्हणाल, 'जयहिंद मित्रा'!

हा अंक आमच्या वाचकांना आवडेल ही खात्री आहे.

नवीन वर्षाच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**



# सुरक्षित-सुव्यवस्थित महाराष्ट्र

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



महाराष्ट्र पोलीसदलाची प्रतिमा देशात वैशिष्ट्यपूर्ण असून ती वर्धिष्णू करण्यासाठी सरकारने अग्रक्रमाने प्रयत्न केले आहेत. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची उत्तम स्थिती हा आमच्या अजेंड्यावरचा प्राधान्याचा विषय आहे. त्यासाठी पोलीसदलाच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आम्ही दीर्घकालीन नियोजन आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करत आहोत.

## अपराधसिद्धतेचा दर उंचावला

प्रभावी अंमलबजावणीच्या या प्रयत्नांचे सुपरिणाम दिसू लागले असून मधल्या काळात याबाबत राज्याची ढासळलेली प्रतिमा सावरण्यात आम्हाला निश्चितच यश मिळाले आहे. मागील काही वर्षात खालावलेला ८ टक्के इतका अपराधसिद्धतेचा दर हा आता ५६.४७ टक्क्यांपर्यंत उंचावला आहे. यासाठी घेतलेल्या विविध १४ निर्णयांचा एकत्रित परिणाम म्हणून ही सुधारणा झाली आहे. खासगी वकील नेमण्याचे अधिकार, सर्व सरकारी वकील अभियोग संचालनालयाच्या अखत्यारीत, त्यांच्या सेवेचे सुधारित नियम, आवश्यक प्रशिक्षण, सरकारी वकिलांच्या पदोन्नतीसाठी २५ टक्के दोषसिद्धीची अट, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगने सुनावणी, आरोपपत्र गुणवत्ता तपासण्यासाठी यंत्रणा, न्याय वैद्यकशास्त्राच्या प्रयोगशाळांचे सक्षमीकरण, गंभीर गुन्ह्यात सरकारी पंच, पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती, निर्भय पुरस्कार, मुख्यमंत्रिपदक असे निर्णय त्यात समाविष्ट आहेत.

**महाराष्ट्र पोलीसदलाच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी दीर्घकालीन नियोजन आखण्यात आले आहे. त्यानुसार प्रभावी अंमलबजावणी केली जात असल्याने अपराध सिद्धतेचा दर उंचावला आहे. पोलीस दलात आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर समावेश करण्यात आला आहे. सायबर गुन्हेगारीला पायबंद घालण्यात यश मिळत आहे. या सर्व उपाययोजनांमुळे अत्यंत सुरक्षित आणि सुव्यवस्थित राज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढत आहे.**

## बदलत्या तंत्रज्ञानाचा समावेश

राज्याच्या पोलीस दलाचा पारंपरिक चेहरा बदलणारे अनेक निर्णय आम्ही घेतले आहेत. बदलत्या तंत्रज्ञानाचा पोलिसांच्या कार्यपद्धतीत समावेश करताना, त्याला एक आधुनिकतेचा आयाम आम्ही दिला आहे. नव्या डिजिटल तंत्रज्ञानाचा पोलिसांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी यथायोग्य वापर करण्यावर आम्ही भर दिला आहे. यातून राज्यातील सर्व १०५४ पोलीस स्थानके आणि या स्थानकांशी संबंधित पोलिसांची ६२९ प्रशासकीय कार्यालये ऑनलाइन पद्धतीने एकमेकांशी जोडण्यात आली आहेत. याशिवाय न्यायालये, कारागृहे, न्यायवैद्यक प्रयोगशाळा आणि फिंगरप्रिंट विभाग जोडण्याचीही कार्यवाही सुरू आहे. या तंत्रामुळे पोलिसांच्या

आपले पोलीस, आपली अस्मिता

कार्यपद्धतीत विलक्षण गतिमानता आणि पारदर्शकता येत आहे. पोलीस दलाच्या २४ सेवा मोबाइल ॲपच्या माध्यमातून जनतेच्या हातात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुंबई, नागपूर आणि पुण्यासारख्या शहरात सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून निगराणीची यंत्रणा उभारण्यात आली आहे. जवळपास १२०० कोटी रुपये खर्चून सहा हजार कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे इतर प्रमुख शहरांमध्येही अशा स्वरूपाची निगराणी व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे.

## महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी सजग



महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी सरकार अत्यंत सजग असून, त्याबाबतही विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. विशेषत: मुंबईत उपनगरीय रेल्वेमधील महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी लोहमार्ग पोलीस व रेल्वे पोलीस यांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. मुंबईसारख्या महानगरात महिला आणि बालसुरक्षेसाठी ९४ वाहने तैनात करण्यात आली आहेत. ही वाहने अत्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असतील. राज्यातील विविध वंचित आणि उपेक्षित घटकांच्या सुरक्षिततेसाठी सरकार दक्ष आहे. या घटकाशी संबधित गुन्ह्यांसंदर्भातील कार्यवाही वरिष्ठ पातळीवरून पाहिली जात आहे. अवैध धंदे आणि अवैध दारू विक्रीला प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येक गावात ग्रामरक्षक दलाच्या स्थापनेचे अधिकार ग्रामसभेला देण्यात आले आहेत.

राज्यातील ३५ जिल्हे आणि ९ पोलीस आयुक्तालयांमध्ये ४५ मोबाइल फॉरेन्सिक युनिट सुरू करण्यात आले आहेत. यासह कोल्हापूर आणि नांदेड येथे नवीन न्यायवैद्यक प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या आहेत. या प्रयोगशाळांमध्ये स्वतंत्र गुन्हे विभाग, ध्वनी आणि ध्वनीफीत विश्लेषण विभाग, डीएनए विभाग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ठाणे, सोलापूर, चंद्रपूर, धुळे, रत्नागिरी येथे पाच लघुवैज्ञानिक प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

## मुंबईची सुरक्षितता

मुंबईच्या सुरक्षिततेकडे सरकारचे विशेष लक्ष आहे. मुंबई पोलिसांना आता सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून अहोरात्र देखरेख ठेवणारी नजर प्राप्त झाली आहे. मुंबई पोलिसांची अत्यंत आधुनिक अशी कंट्रोल रूम आणि सीसीटीव्ही निगराणी यामुळे संपूर्ण महानगरावर काटेकोर लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. या यंत्रणेचा फायदा विविध आपत्तींच्या वेळीही होऊ शकणार आहे. पोलिसांना बुलेटप्रुफच नव्हे तर बुलेट रेझिस्टंट जाकिटे देण्यात आली आहेत. दंगल नियंत्रण पथकातील पोलिसांना 'बॉडी प्रोटेक्टर' देण्यात आले आहेत.

## सायबर गुन्हेगारीला पायबंद

नवीन युगाची गुन्हेगारी म्हणून वेगाने वाढत असलेल्या सायबर गुन्हेगारीला पायबंद घालण्याचा जोरदार प्रयत्न सरकारकडून होत आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने सर्व प्रमुख आर्थिक घडामोडींचा केंद्रबिंदू मुंबई हाच आहे. त्यामुळे राज्यातील सायबर सेल सक्षम करून, या क्षेत्रातील गुन्हेगारी रोखण्यासाठी आमचे कसोशीने प्रयत्न सुरू आहेत. मुंबईचे देशातील महत्त्व लक्षात घेता, ती यापूर्वी अनेकदा दहशतवादी हल्ल्यांचे लक्ष ठरली आहे. हे हल्ले सुरक्षा यंत्रणेतील त्रुटी आणि कमतरतेमुळे झाल्याचे सिद्ध झाल्याने, त्या अनुषंगानेही मुंबईच्या सुरक्षिततेसाठी सरकारने भरभक्कम उपाययोजना केल्या आहेत. 'एनएसजी'च्या धर्तीवर कार्यान्वित करण्यात आलेल्या 'फोर्स वन' या पथकाला अत्यंत



सुसज्ज अशी उपकरणे आणि अद्ययावत प्रशिक्षणातून परिपूर्ण करण्यात आले आहे. सागरी सुरक्षेवर लक्ष केंद्रित करण्यात आले असून मच्छीमारांच्या बोटींना कलर कोडिंग करण्यात आले आहे. त्यांना ओळखपत्र देण्यात आल्याने एखादी अनोळखी बोट आढळल्यास तत्काळ कारवाई करण्यात येते. ज्या ठिकाणी मनुष्यबळाद्वारे सुरक्षा देणे शक्य नाही, त्या ठिकाणी स्थानिकांना धोक्याचा इशारा देणारे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

### जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यास अग्रक्रम

विविध साधनसामग्री आणि तंत्रज्ञानाने पोलीसदल सक्षम करतानाच, त्यांचे विविध जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवण्यास सरकार अग्रक्रम देत आहे. त्यात पोलिसांच्या घरांचा प्रश्न प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे. पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या माध्यमातून एक लाख घरे बांधण्याचे नियोजन आहे. या घरांच्या उभारणीसाठी आयआयटी मुंबईसोबत महामंडळाने सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे या घरांच्या उभारणीचे काम गतीने होणार आहे. तांत्रिकदृष्ट्या मजबूत, दीर्घकाळ टिकणारी, कार्यपूरक आणि हरित इमारतीच्या संकल्पनेनुसार बांधकामाचे आराखडे आयआयटीमार्फत केले जाणार आहेत. सवलतीच्या व्याजदराने कर्ज देऊनही, पोलिसांच्या स्वमालकीच्या घरांचे स्वप्न साकारण्यासाठी मदत करण्यात येत आहे. राज्यात गृहनिर्माणाचे ३६ मोठे प्रकल्प सुरू आहेत. त्यामध्ये जवळपास साडेतीन हजार सदनिका, साडेसोळाशे क्षमतेची आठ वसतिगृहे, अकरा पोलीस ठाणी आदी कामे करण्यात येणार आहेत.

पोलीसदलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या आहारभत्त्यात घसघशीत वाढ करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. आधीच्या तुलनेत जवळपास दुपटीने वाढ करण्यात आली आहे. वेतनातही सुधारणा करण्याची प्रक्रिया विविध पातळीवर सुरू आहे. पोलिसांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी सरकार जागरुक असून त्या दृष्टीने विविध आघाड्यांवर सध्या सुसूत्र नियोजन करण्यात येत आहे.

### नागरिकांचा कृतिशील सहभाग

सुरक्षा दलातील संख्या वाढवण्यात असलेली मर्यादा नागरिकांच्या कृतिशील सहभागातून दूर होऊ शकते. नागरिकांचा सक्रिय सहभाग इतर अनेक देशात मोलाचा ठरला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील संवेदनक्षम ठिकाणी नागरिकांना धोक्याचा इशारा देण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. दहशतवादी हल्ल्यांसह नक्षलवादी कारवायांचा बीमोड करण्यात नागरिकांची भूमिका निर्णायक ठरणारी आहे. ग्रामस्थांच्या खंबीर पाठबळामुळे सुरक्षा दलांचे मनोधैर्य उंचावले असून अनेक ठिकाणी नक्षलवाद्यांना ठेचण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे. त्यामुळेच नक्षली कारवायांचे प्रमाण २० ते २२ टक्क्यांनी घटले आहे.

नागरिकांच्या सहयोगाशिवाय उत्तम कायदा आणि सुव्यवस्था निर्माण होऊ शकत नाही, हे लक्षात घेऊन; नागरिक आणि पोलीस यांतील अंतर कमी करण्यासाठी नागरिकांच्या अपेक्षांसंदर्भात शासनाने सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची सुरुवात नागपूर येथून करण्यात आली आहे. याच धर्तीवर संपूर्ण राज्यात सर्वेक्षण करून सुधारणा करण्यात येणार आहेत. या सर्व उपाययोजनांमुळे अत्यंत सुरक्षित आणि सुव्यवस्थित राज्य म्हणून महाराष्ट्र देशभरात ओळखले जाईल, असा विश्वास आहे.

शब्दांकन: **हेमराज बागूल**, मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी

# प्रतिसाद आणि प्राधान्य

**दीपक केसरकर**, राज्यमंत्री गृह (ग्रामीण)

राज्यातील महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वच जिल्ह्यात विशेष पथकाची स्थापना करण्यात येणार आहे. केवळ बालक आणि महिलांच्या गुन्ह्यांचा तपास हे पथक करेल. यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष नियुक्ती करण्यात येणार असून, हे पथक आपला अहवाल थेट पोलीस महासंचालकांना सादर करेल. या पथकाची सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी प्रत्येक जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थांना सोबत घेऊन जागृती करण्यात येणार आहे.

### नक्षलग्रस्त भागांवर विशेष लक्ष

नक्षलवादाला आळा घालण्यासाठी पोलीस दलाने विशेष उपाय योजले आहेत. नक्षलग्रस्त भागातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम पोलिसांच्या वतीने सुरू आहे. नक्षलग्रस्त भागात कारवाई करताना पोलीस दल, अर्धसैनिक बल, विशेष अभियान



**गृहिणी असो की नोकरदार, शालेय विद्यार्थिनी असो किंवा महाविद्यालयीन तरुणी यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन त्यासाठी शासन अनेक उपाययोजना राबवत आहे. दामिनी पथक, प्रत्येक पोलीस ठाण्यात व मुख्यालयात महिला सहायता कक्षाची स्थापना, महिला छेडछाडविरोधी पथक, महिलांच्या सुरक्षेसाठी 'प्रतिसाद', सुरक्षेसाठी खास वाहने आदी विविध उपाय योजण्यात आले आहेत. नक्षलग्रस्त भागातील जनतेत विश्वास वाढवून, त्यांना सुरक्षित वातावरण तयार करून देणे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.**



पथक यांच्यात समन्वय राहावा, यासाठी पोलीस मुख्यालयात अभियान कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अनियंत्रित क्षेत्रात पोलीस मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. नक्षलवाद संपवण्यासाठी नागरिकांचा पोलिसांबद्दल व प्रशासनाबद्दलचा विश्वास वाढावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यानुसार 'जनमैत्री' मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नक्षल समर्थकांच्या कारवायांचा प्रतिबंध करण्यासाठी, त्यांना शासनाच्या योजना समजावणे, जनजागृती करणे आदी कामे करण्यात आली आहेत. नक्षलवादाच्या चक्रव्यूहात अडकलेल्या तरुणांसाठी नवसंजीवनी योजना सुरू करण्यात आली आहे.

## स्वतंत्र महिला पोलीस कक्ष

सर्व पोलीस आयुक्तालये/पोलीस अधीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र महिला पोलीस कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. महिलांवर होणाऱ्या अत्याचारांचा सर्वोतोपरी निपटारा करण्यासाठी या कक्षाद्वारे प्रयत्न करण्यात येतात. सर्व जिल्हा/आयुक्तालय पातळीवर तसेच पोलीस ठाण्यांच्या पातळीवर 'महिला सुरक्षा समित्या' स्थापन करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यकक्षेत महिला पोलीस तपास पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकाद्वारे महिला व बालकांवरील गुन्ह्यांच्या सद्य:स्थिती संदर्भात आढावा घेणे, दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी पाठपुरावा करणे आदी कामे करण्यात येतात.

महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे त्वरित निकालात काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. महिला व मुलींची छेडछाड रोखण्यासाठी 'महिला छेडछाड विरोधी पथके' तयार करण्यात आली असून याचा चांगला उपयोग होत असल्याचे दिसून आले आहे. महिलांना त्यांच्या तक्रारीबाबत तातडीने पोलीस मदत मिळण्यासाठी मुंबई, नवी मुंबई व ठाणे शहरांसाठी टोल फ्री दूरध्वनी क्रमांक १०३ व उर्वरित महाराष्ट्रासाठी १०९१ हा दूरध्वनी क्रमांक सुरू करण्यात आला आहे.

बलात्कार व ॲसिड हल्ल्यातील पीडित महिला/बालक व इतर लैंगिक अत्याचारातील पीडित बालके यांना अर्थसाहाय्य करणारी 'मनोधैर्य योजना' महिला व बालविकास विभागाकडून राबवण्यात येत आहे. बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलित कायद्यात सुधारणा केल्या आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी 'प्रतिसाद' हे मोबाइल ॲप कार्यान्वित करण्यात आले आहे.

## सीसीटीव्ही यंत्रणेसाठी विशेष तरतूद

जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी शासनाने विशेष बाब म्हणून जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी खर्च करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर या शहरांबरोबरच राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यास मदत होणार आहे. 'ऑन ड्युटी २४ तास' असलेल्या पोलिसांना शासकीय घरे देण्यासाठी, सुमारे एक लाख घरे बांधण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

आपले पोलीस, आपली अस्मिता

पोलिसांना शासकीय निवासस्थान देण्यात येत असले तरी निवृत्तीनंतर हे निवासस्थान सोडावे लागते. या पोलिसांना स्वतःचे हक्काचे घर घेता यावे, यासाठी गृह बांधणी अग्रिम योजना सुरू केली होती. गेल्या चार वर्षात अनेक कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम देण्यात आले. तरीही मोठ्या प्रमाणात मागणीचे अर्ज महासंचालक कार्यालयाकडे आले होते. त्यातील अनेक अर्ज प्रलंबित होते. यावर निर्णय घेऊन पोलिसांना स्वतःची घरे मिळावीत, यासाठी बँकामार्फत कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे अनेक पोलीस कुटुंबांना स्वतःच्या घरात राहण्यास मिळत आहे.

## सागरी पोलीस दल



सागरी किनाऱ्यावर सुरक्षा व्यवस्था मजबूत राहावी, यासाठी सागरी पोलीस दलाची निर्मिती केली आहे. यानुसार सागरी किनाऱ्यावर पोलीस ठाण्यांची निर्मिती, या पोलिसांना वाहने, बोटी आदी पुरवण्यात आल्या आहेत.

सागर किनाऱ्याच्या संरक्षणासाठी सागरी पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये ९१ चेकपोस्ट, निवडक १४ जेट्टींवर सुरक्षाविषयक उपकरणे व साधनसामग्री ठेवण्यासाठी ऑपरेशनल रुम तयार करण्यात आल्या आहेत. तसेच सागरी सुरक्षेसाठी मनुष्यबळाला कोस्टगार्डतर्फे मरीन पोलीस प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच या पोलीस ठाण्यातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोहण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. किनारपट्टी भागातील गावांमध्ये नागरिकांच्या एकूण ५०६ सागरी सुरक्षा दले निर्माण केली आहेत. समुद्रकिनाऱ्यावरील वाळूमध्ये सुरक्षा गस्त घालण्यासाठी पोलिसांना वाळूवर चालू शकतील अशा गाड्या देण्यात आल्या आहेत. पर्यटकांबरोबर कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी या गाड्यांचा उपयोग होत आहे. राज्याच्या समुद्रकिनाऱ्यांवर बेकायदा मच्छिमारीसाठी येणाऱ्यांवर कारवाईसाठी कोस्टगार्ड व सागरी पोलीस दल यांची गस्त सुरू केली आहे.



**राज्यातील पोलीस हा सुरक्षा व्यवस्थेचा कणा आहे. तो व्यवस्थित राहिला तर राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली राहू शकते. त्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांकडे लक्ष देण्याबरोबरच त्यांच्यावरील ताण कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर राज्य शासन भर देत आहे.**

# तंत्रज्ञानाच्या वापराला अग्रक्रम

**डॉ. रणजित पाटील,** राज्यमंत्री, गृह (शहरे)

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पारंपरिक पद्धतीबरोबरच राज्य शासन डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहे. यामुळे गुन्हे रोखण्यासाठी मदत होत आहे. गुन्ह्यांची उकल झाल्यानंतर त्या गुन्हेगाराला शिक्षा व्हावी व अपराधसिद्धतेचे प्रमाण वाढावे, म्हणूनही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. पोलीस दल सक्षम व्हावे, खालच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचवावे, यासाठी अनेक उपक्रम राज्य शासनाने हाती घेतले आहेत.

## सीसीटीएनएसचा फायदा

गुन्हेगारांवर वचक राहावा, त्यांचा माग काढण्यात सुलभ ठरावे. यासाठी केंद्र शासनाच्या ई-गर्व्हनन्स योजनेंतर्गत गुन्हा व गुन्हेगारी माग काढण्यासाठी नेटवर्क व यंत्रणा (क्राइम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क ॲण्ड सिस्टिम) हा प्रकल्प प्राधान्याने राबवण्यात येत आहे. या प्रकल्पात राज्यातील १०५४ पोलीस ठाणे आणि घटक कार्यालये, परिक्षेत्र कार्यालये, पोलीस उप आयुक्त कार्यालये/सहायक पोलीस आयुक्त कार्यालये, राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग, राज्याचे पोलीस महासंचालक कार्यालय अशी एकूण ६२९ वरिष्ठ कार्यालये एकमेकांशी जोडण्यात आली आहेत. या प्रकल्पांतर्गत राज्यातील विविध पोलीस ठाणी व कार्यालयातील एकूण २.४२ कोटी दस्तऐवज डिजिटल स्वरूपात संग्रहीत करून ते स्टेट डेटा सेंटरवर स्थानांतरीत करण्यात आले आहेत.

## 'ई तक्रार' सुविधा

नागरिकांसाठी मराठी व इंग्रजी भाषेत सिटीझन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या पोर्टलद्वारे हरवलेल्या व्यक्तींची माहिती, बेवारस मृतदेह तसेच इतर ४४ विविध प्रकारचे अर्जांचे नमुने नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर नागरिकांसाठी ऑनलाइन तक्रार (e-complaint) देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



## आधुनिक 'ॲम्बिस' प्रणाली

देशात प्रथमच फिंगर प्रिंटकरिता जागतिक स्तरावरील प्रगत तंत्रज्ञान ऑटोमेटेड मल्टिमॉडल बायोमेट्रिक आयडेन्टिफिकेशन सिस्टिम राबवण्यात येत आहे. या तंत्रज्ञानामध्ये आरोपीच्या बोटांचे ठसे, चेहऱ्याच्या ठेवणीच्या तसेच आयरीस (डोळ्यांचे रॅटिना) याबाबत अभिलेख जतन करण्यात येणार आहेत. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे क्लिष्ट स्वरूपांच्या गुन्ह्यांची उकल करण्यास मोलाची मदत होणार आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे.

## 'नो हॉर्न डे' उपक्रम

वाहनांच्या वाढत्या संख्येबरोबरच कर्णकर्कश आवाजाच्या हॉर्नमुळे ध्वनीप्रदूषणातही वाढ होत आहे. या आवाजाचा रुग्ण, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक त्रास होतो. त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतात. अचानक वाजलेल्या हॉर्नमुळे गंभीर अपघात घडले आहेत. यामुळे 'नो हॉर्न डे' हा उपक्रम मुंबईत सुरू केला आहे. याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## चौफेर नजर

राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याअंतर्गत मुंबई शहरामध्ये १५१० ठिकाणी एकूण ४५३७

सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, प्रकल्प पूर्णपणे सुरू झाला आहे. पुणे व पिंपरी चिंचवड शहरातही सीसीटीव्ही बसवण्यात आले असून, पुणे शहरात ४२५ ठिकाणी एकूण १२३४ कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत.

या सीसीटीव्ही यंत्रणेच्या मदतीने आतापर्यंत एकूण ८० गुन्ह्यांचा तपास पूर्ण करण्यात पोलिसांना यश आले आहे. तसेच ९७९ पेक्षा जास्त व्हिडीओ फूटेजची विविध गुन्ह्यांच्या तपासात मदत झाली आहे. एकूण ३१,०४४ पेक्षा जास्त वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी येणारे गणेशोत्सव, पालखी सोहळा, मोहरम, आंबेडकर जयंती इ. धार्मिक व सार्वजनिक उत्सवांचे तसेच विविध पुतळे, मंदिरे, मशिदी, शाळा, महाविद्यालये इ. ठिकाणांचे दैनंदिन नियंत्रण करणे शक्य झाले आहे.

मुंबई शहरात २९ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक नागरिक इच्छित स्थळी पोहचू शकत नसल्याने अडचणीत सापडले होते. मुंबई शहरात ठिकठिकाणी पाणी साचल्यामुळे नागरिकांना मदत करणे गरजेचे झाले होते. अशा वेळी मुंबई शहरामध्ये बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या व कमांड कंट्रोल सेंटरच्या मदतीने, या नागरिकांना अडचणीतून बाहेर काढणे शक्य झाले.

नागपूर शहरात सीसीटीव्ही प्रकल्प राबवण्याबाबतची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सुरू आहे. तसेच नाशिक शहर व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सीसीटीव्ही प्रकल्प राबवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.




## डायल-११२ प्रकल्प

आपत्कालीन सेवांसाठी वेगवेगळे दूरध्वनी क्रमांक असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होवून या परिस्थितीमध्ये पोलीस/अग्निशामक/रुग्णवाहिका या सेवा मिळण्यास विलंब होत असल्याचे दिसून येते. यामुळे संपूर्ण देशात आपत्कालीन सेवा ११२ या क्रमांकावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प केंद्र शासनाने सुरू केला. ही सेवा अधिक कार्यक्षमरीत्या सुरू राहावी, नागरिकांना तत्काळ सेवा मिळावी, यासाठी राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

## पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी

राज्यातील पोलीस बारा बारा तास कामावर उपस्थित असतो. धावपळ, ताणतणाव यामुळे त्याच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. वाढत्या वयात आरोग्यावरील परिणाम वेळीच रोखण्यासाठी नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाने पोलीस दलातील ४५ व त्यावरील वयाच्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामध्ये सखोल वैद्यकीय तपासणीबरोबरच रक्त व मधुमेह तपासणी, लिपिड प्रोफाईल, यकृत चाचण्या, मौखिक चाचण्या, नेत्र तपासणी, रक्तदाब आदी तपासण्या करण्यात आल्या. पोलिसांना जुनी टोपी वापरताना अडचणी भेडसावत होत्या. जुनी टोपी डोक्यात व्यवस्थित न बसणे, पाठलाग करताना टोपी पडणे आदी प्रकारच्या तक्रारी अंमलदारांकडून करण्यात येत होत्या. त्यानंतर नव्या बेसबॉल कॅपचा वापर सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबईत अशा प्रकारच्या कॅपचा वापर सुरू झाला आहे. मात्र, जुनी टोपीदेखील वापरात राहणार आहे.

## विशेष मोहीम

मुंबई पुणे महामार्गावर होणारे अपघात टाळण्यासाठी व वाहन चालकांना शिस्त लागावी, यासाठी महामार्ग पोलिसांमार्फत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात येते. सुट्टीच्या दिवशी होणारी गर्दी टाळण्यासाठी गोल्डन अवर्स ही विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. यामध्ये गर्दीच्या वेळी अवजड वाहनांना एका विशिष्ट ठिकाणी थांबून टप्प्याटप्प्याने पुढे पाठवण्यात येते. यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यास मदत होते. याशिवाय महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी ब्लॅक स्पॉटस् शोधून त्याठिकाणी सुधारणा करणे, तसेच अशा ठिकाणी सीसीटीव्ही व इन्फोर्समेंट कॅमेरे बसवणे आदी विविध उपाय राबवण्यात येणार आहेत.

## सुसज्ज ९४ वाहने

महिला व बाल सुरक्षेसाठी/गस्तीसाठी बृहन्मुंबई पोलीस दलातील ९४ पोलीस ठाण्यांसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे ९४ नवीन अत्याधुनिक मारुती एर्टिगा वाहने खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या वाहनांमध्ये रायफल, शिल्ड, लाठी व शस्त्रे ठेवण्याची सोय करण्यात आली आहे. या वाहनांमध्ये बिनतारी संदेश संच, पब्लिक ॲड्रेस सिस्टिम बसवण्यात आली आहे. या वाहनांचा उपयोग पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये महिला व बालकांवर होणारे अत्याचार रोखण्याकरिता केला जात असून या वाहनामध्ये प्रत्येकी एक महिला अधिकारी व दोन महिला कर्मचारी कार्यरत आहेत. ही वाहने पोलीस ठाण्यांना देण्यात आली असून, मुख्य नियंत्रण कक्षाकडून संदेश प्राप्त होताच घटनास्थळी जाऊन त्वरित कार्यवाही करण्यात येते. बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत १२९८ ही हेल्पलाइन सेवासुद्धा सुरू करण्यात आली आहे.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे**
सहायक संचालक (माहिती)

# फोर्स वन : शौर्यातच असते विजयश्री

**दहशतवाद्यांचा सशक्तपणे सामना करून, त्यांचा कर्दनकाळ ठरणारे जवान म्हणजे 'फोर्स वन'. अत्याधुनिक हत्यार सामग्रीसह सदैव तत्पर शूर, धाडसी, जीवावर उदार झालेले, तेजतर्रार, चाणाक्ष, बलदंड, चित्याची झेप आणि गरुडाची नजर असलेले महाराष्ट्र पोलीस दलाचे कमांडो पथक– फोर्स वन..**

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा संभाव्य दहशतवादी हल्ल्यांना समर्थपणे सामोरे जाऊन, दहशतवाद्यांचा परिणामकारकपणे सामना करण्यासाठी; महाराष्ट्र पोलीस दलामध्ये राष्ट्रीय सुरक्षा दल (एनएसजी) च्या धर्तीवर 'फोर्स वन' या विशेष कमांडो पथकाची स्थापना करण्यात आली. 'फोर्स वन' हे इच्छुक असलेल्या तसेच शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त व आव्हानांना सामोरे जाण्याची जिद्द असलेल्या, धाडसी पोलीस अधिकारी व जवानांचे एक विशेष पथक आहे. या पथकाचे मुख्यालय राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ८ च्या बाजूला गोरेगाव (पूर्व), मुंबई या ठिकाणी आहे.

### सदैव दक्ष

२४ नोव्हेंबर २००९ रोजी पासून फोर्स वन पथक कार्यरत झाले. अभियानासाठी फोर्स वनची चार कृती गटात विभागणी केली असून एक कृती गट कायम अलर्ट कर्तव्यावर हजर असतो. फोर्स वन नियंत्रण कक्षास आपत्कालीन परिस्थितीची माहिती प्राप्त झाल्यानंतर आदर्श कार्यपद्धतीनुसार पुढील २० मिनिटांमध्ये ॲलर्ट कर्तव्यावरील कृती गट (अधिकारी/ कमांडो) अत्याधुनिक हत्यारे आणि सामग्रीसह अभियानासाठी तयार होतो. त्याच वेळी प्रशिक्षण कर्तव्यावरील दुसरा कृती गट (अधिकारी/कमांडो) देखील ३० मिनिटांमध्ये अत्याधुनिक हत्यारे आणि सामग्रीसह अभियानासाठी तयार होतो. अशा प्रकारे फोर्स वन पथक हे एकाच वेळी दोन ठिकाणी यशस्वीरीत्या अभियान करू शकते.



### प्रशिक्षण

फोर्स वन पथकाबरोबरच शासनाने राज्यात १० महत्त्वाच्या शहरांत जलद प्रतिसाद पथकांची निर्मिती केली आहे. फोर्स वन पथक व जलद प्रतिसाद पथकातील अधिकारी व जवानांना दहशतवाद्यांशी प्रत्यक्ष सामना करण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यासाठी अर्बन काऊंटर टेररिझम ट्रेनिंग सेंटर (यूसीटीसी)ची देखील शासनाने स्थापना केली आहे. हे ट्रेनिंग सेंटर फोर्स वन प्रमुखांच्या आधिपत्याखाली काम करते. हे प्रशिक्षण केंद्र सध्या राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, रामटेकडी, पुणे येथे कार्यरत आहे.

या प्रशिक्षण केंद्रामार्फत पोलीस दलातील अधिकारी व जवानांना दहशतवाद्यांविरुद्ध लढण्यासंदर्भात पायाभूत प्रशिक्षण (जीसीपीसी)

तसेच अद्ययावत प्रशिक्षण (एसीपीसी) देण्यात येते. याव्यतिरिक्त 'फोर्स वन'मधील जवानांसाठी ऑटोकॅड व व्हिडिओ एडिटिंग, फर्स्ट एड, फायरिंग, किल हट फायरिंग, एक्सप्लोझीव्ह व स्नायपर इत्यादी सुपरस्किल दर्जाचे तसेच उजळणी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात येते.

या केंद्रातर्फे गोवा पोलीस, कर्नाटक पोलीस, रेल्वे सुरक्षा बल तसेच मोझांबिक देशातील पोलिसांना दहशतवादाविरुद्ध लढण्याचे पायाभूत प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) व राज्य राखीव पोलीस बल (एसआरपीएफ)च्या जवानांनादेखील दहशतवादविरोधी प्रशिक्षण देण्यात येते. या केंद्रातर्फे ऑल इंडिया कमांडो कॉम्पिटिशनमध्ये सहभागी होणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघासाठी सराव प्रशिक्षण आयोजित करण्यात येते.

## फोर्स वनचा जन्म

२६/११ चा अतिरेकी हल्ला हा देशातील पहिलाच असा हल्ला होता की ज्यामध्ये अतिरेक्यांनी अत्याधुनिक ॲसॉल्ट रायफल, हँन्ड ग्रेनेड व स्फोटकांचा वापर बेधुंदपणे केला. त्यामुळे अशा पाशवी हल्ल्यास त्वरित कसे तोंड द्यावे याबाबत पोलीस यंत्रणा संभ्रमात होती. अतिरेक्यांशी लढण्यासाठी एनएसजी व भारतीय नौदलाच्या मार्कोस कमांडोना बोलावण्यात आले होते; परंतु या कमांडोना अन्य राज्यातून मुंबईत आणण्यासाठी तातडीची प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत बराच उशीर झाला होता. अखेरीस सुमारे चोवीस तासांच्या कडव्या झुंजीनंतर एनएसजी कमांडो सर्व अतिरेक्यांना कंठस्नान घालण्यात यशस्वी झाले.



या अचानक झालेल्या भीषण हल्ल्यानंतर अशा प्रकारचा हल्ला होऊ नये म्हणून महाराष्ट्र दलात एनएसजीच्या तोडीचा एक कमांडो विभाग स्थापन करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने तत्काळ घेतला. पोलीस महासंचालक कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये याबाबत विचारमंथन होऊन, त्यात तत्कालीन पोलीस उप महानिरीक्षक एस. जगन्नाथन यांच्यावर पथकाच्या उभारणीचे शिवधनुष्य सोपवले. त्यांनी सुचवलेल्या मुद्द्यांना अनुसरून एनएसजीच्या धर्तीवर, विशेष कमांडो पथक कशाप्रकारे तयार करावे व त्या पथकाची प्राथमिक उद्दिष्टे व अशा पथकातील अधिकारी व अंमलदार यांची निवड प्रक्रिया कशी असावी याबाबत विचारविनिमय झाला. त्याच वेळी गृहविभागातदेखील पोलीस महासंचालक कार्यालयाने दिलेल्या सूचनांनुसार विशेष कमांडो पथकासाठी लागणारे मनुष्यबळ व साधनसामग्री (अत्याधुनिक हत्यारे, दारूगोळा इत्यादी) याबाबत प्रशासकीय यंत्रणा सक्रिय झाल्या होत्या.

या पथकात योग्य ते अधिकारी आणि अंमलदार यांची निवड करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब होती. २६/११ च्या हल्ल्याचे पडसाद देशभरात व जगभरात उमटल्याने अशा प्रकारच्या हल्ल्यास प्रत्युत्तर देण्यासाठी, तयार होणाऱ्या पहिल्या कमांडो पथकात दाखल होण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दलातील अनेक अधिकारी व अंमलदार उत्सुक असणे स्वाभाविक होते; परंतु अशा पथकासाठी फक्त अत्युत्तम अधिकारी व अंमलदारांची निवड करावयाची असल्याने या निवड प्रक्रियेवर फार बारकाईने विचार करण्यात आला होता.

सशस्त्र सैन्य दलातील अधिकारी व जवान यांच्याकडे सीमेवर, दुर्गम भागात, युद्धजन्य परिस्थितीत शत्रूशी दोन हात करताना अत्युच्च अशी शारीरिक क्षमता असणे आवश्यक असते व त्यासाठी प्रत्येक अधिकारी व जवानास दरवर्षी बीपीईटी (बॅटल फिजिकल इफिशियन्सी टेस्ट) उत्तीर्ण करावी लागते. या परीक्षेत दोन मैल विशिष्ट वेळेत धावणे व इतर शारीरिक क्षमतेची कस लागणाऱ्या इतर चाचण्या असतात. विशेष कमांडो पथकात प्राथमिक निवडीसाठी अशाच प्रकारची चाचणी सर्वानुमते नक्की करण्यात आली आणि प्राथमिक निवड प्रक्रियेत यशस्वी झालेल्या उमेदवारांना किमान तीन महिने एनएसजीच्या धर्तीवर खडतर प्रशिक्षण दिल्यानंतर जे प्राविण्यासह उत्तीर्ण होतील अशाच अधिकारी व अंमलदारांची कमांडो पथकात अंतिम निवड करण्याचे नक्की करण्यात आले.

## कमांडो प्रशिक्षण

महाराष्ट्र पोलीस दलातील दीड लाखांपेक्षा अधिक मनुष्यबळ असलेल्या अधिकारी व अंमलदारांतून इच्छुक व उत्कृष्ट असे किमान वीस तरुण अधिकारी व सुमारे पाचशे पोलीस शिपाई यांची कमांडो प्रशिक्षणासाठी प्राथमिक निवड करणे निश्चितच कठीण होते. यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयातील पोलीस निरीक्षक दर्जाच्या दोन अधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील ०९ आयुक्तालये, २६ जिल्हा पोलीस आस्थापना व राज्य राखीव पोलीस दलाच्या १२ गटांतून आलेल्या इच्छुक अधिकारी व अंमलदारांच्या मैदानी बीपीईटीच्या धर्तीवर मैदानी चाचण्या संपूर्ण राज्यात जाऊन घेतल्या. यानंतर प्राथमिक निवड चाचण्या चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झालेल्या अधिकारी व अंमलदारांना एसआरपीएफ ग्रुप १ पुणे येथे एप्रिल २००९ मध्ये एकत्र करण्यात आले.

प्राथमिक प्रशिक्षणासाठी निवड केलेले अधिकारी व अंमलदारांचे

खडतर प्रशिक्षण हे पुढील तीन महिने तत्कालीन पोलीस उपमहानिरीक्षक, एस. जगन्नाथन व एसआरपीएफ ग्रुप १चे समादेशक चिरंजीव प्रसाद यांच्या कोटेकोर व कठोर मार्गदर्शनाखाली अव्याहत चालू होते. सुरुवातीच्या काळात कमांडो प्रशिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री (उदा. अत्याधुनिक ॲसॉल्ट रायफल, दारूगोळा, अडथळा शर्यतीसाठी लागणारे साहित्य, रॅपलिंगचे साहित्य इत्यादी) नसल्याने सुमारे महिनाभर अतिशय कठीण अशा शारीरिक बलसंवर्धनावर भर देण्यात आला. कमांडोंचे मानसिक संतुलन व क्षमता वाढवण्यासाठी त्यांच्या विविध चाचण्या घेतल्या गेल्या व प्रशिक्षणे दिली गेली. याचबरोबर पुणे येथील माजी सैन्य अधिकारी, कमांडोज व प्रशिक्षक यांच्याकडून प्रशिक्षण दिले गेले. कमांडोजना स्फोटके हाताळण्यासाठीची प्रात्याक्षिके डीआरडीओ (डिफेन्स रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन) यांचे प्रयोगशाळेत तर प्रत्यक्ष प्रशिक्षण एसआरपीएफ ग्रुप १ येथे देण्यात आले. या प्रशिक्षणार्थींची दिनचर्या पहाटेपासून सायंकाळपर्यंत तसेच अनेक वेळा रात्रीदेखील चालत असे. यामध्ये रामटेकडी परिसरातील टेकड्यांमधून लांब अंतर धावणे, अडथळे पार करणे, दोरखंडाचा वापर करून इमारतीवर चढणे, इमारतींवरून रॅपलिंग करणे व Unarmed Combat यांचा अंतर्भाव होता. सुरुवातीचे काही दिवस रॅपलिंगसाठी योग्य ती अत्याधुनिक साधनसामग्री नसतानादेखील कमांडोज निर्धाराने फक्त दोरखंडाच्या मदतीने उंच झाडावर व इमारतीवर चढत उतरत होते. या खडतर प्रशिक्षणामागे प्रत्येक कमांडोच्या मनातील किंवा शरीरातील कोणताही दुबळेपणा राहू नये आणि 'शांती काळात तुम्ही जेवढा जास्त घाम गाळाल तेवढेच युद्ध काळात तुमचे रक्त कमी सांडाल.' असा दृष्टिकोन होता.

## विजेच्या चपळाईने फायरिंग

कमांडो कारवाईत फायरिंग ही सर्वात महत्त्वाची बाब आहे. विजेच्या चपळाईने फायरिंग करता करता स्वतःस सुरक्षित ठेवून शत्रूचा माग घेत त्याचा खात्मा करणे हे प्रत्येक कमांडोचे उद्दिष्ट असते. यासाठी प्रशिक्षणार्थी कमांडोजना दर दिवशी किमान चार तास फायरिंगचे प्रशिक्षण देण्यात येत होते. सर्व कमांडोजच्या शारीरिक क्षमता चाचण्या तसेच गोळीबार सरावाचे गुण दर आठवड्यास एकत्रित करून त्याचा आढावा घेतला जात होता. यामुळे सुरुवातीच्या महिन्या अखेरीसच अनेक प्रशिक्षणार्थी कमांडोजना परत पाठवण्यात आले.

यादरम्यान विशेष कमांडो पथकासाठी, अत्याधुनिक साधनसामुग्री, एमपी-५ ॲसॉल्ट रायफल व दारूगोळा, स्फोटके, बॉडी प्रोटेक्शनसाठी बुलेटप्रूफ जॅकेट, लेगगार्ड, हेल्मेट इत्यादी खरेदी करण्यासाठी आवश्यक निधी मिळवण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाकडून केलेल्या अथक प्रयत्नांना यश मिळाले. त्यामुळे कमांडोजच्या नीतिधैर्यामध्ये कमालीची वाढ झाली. त्यांनी पुणे शहरातील काही इमारती व महत्त्वाच्या ठिकाणांवर अतिरेकी हल्ला परतवण्याच्या सराव चाचण्या (मॉक ड्रिल) केल्या. त्याचप्रमाणे मुंबई हे शहर देशाची आर्थिक राजधानी म्हणून अतिरेक्यांच्या निशाण्यावर असण्याची शक्यता लक्षात घेऊन मुंबईतील रेल्वे स्थानके, विमानतळ व संरक्षित मर्मस्थळे यावर देखील सराव चाचण्या केल्या गेल्या. यामध्ये नरिमन पॉईन्ट येथील एयर इंडिया इमारत व एक्सप्रेस टॉवर्स या तीसपेक्षा अधिक मजली इमारतीवरून रॅपलिंग करताना गोळीबार सरावाची चाचणी करण्यात आली होती.



## 'यतो शौर्य, तथो जय'

सुमारे चार महिन्याच्या अथक प्रशिक्षणानंतर When going gets tough, toughs gets going या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र पोलीस दलातील सर्वोत्कृष्ट असे अधिकारी व कमांडोज राज्याच्या पहिल्या व एकमेव विशेष कमांडो पथकात समाविष्ट झाले. या विशेष कमांडो पथकाचे नामकरण 'फोर्स वन' असे करण्यात येऊन, पथकाचे ब्रीदवाक्य म्हणून 'यतो शौर्य तथो जय' म्हणजेच 'जेथे शौर्य तेथे विजय', असे घोषित करण्यात आले. फोर्स वनचे प्रशिक्षण व युद्धसरावाच्या दृष्टिकोनातून अत्याधुनिक साधनसामग्रीयुक्त असे मुख्यालय मुंबई येथे स्थापन करण्यात आले. फोर्स वन पथक हे भारतातील सर्वात अलीकडील तरुण पथक असूनदेखील फक्त दोन वर्षाच्या कालावधीतच या पथकाने अखिल भारतीय कमांडो स्पर्धेत आयटीबीपी, सीआरपीएफ व इतर अनेक राज्यांच्या कमांडो पथकांशी स्पर्धा करून देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. 'फोर्स वन'च्या ब्रीदवाक्याप्रमाणे भविष्यात महाराष्ट्रात कोठेही कधीही अतिरेकी हल्ला झाल्यास फोर्स वन पथक त्यावर विजय मिळवेल याबाबत संदेह नाही. (साभार: दक्षता)






**महाराष्ट्रातून ३२ राष्ट्रीय महामार्ग जातात. एकूण ३८२ राज्य महामार्ग आहेत. त्यामुळे रस्ते अपघातांचे प्रमाण जास्त आहे. रस्ता सुरक्षा अभियान, गोल्डन अवर्स (सुवर्ण तास) आदी उपक्रमांच्या माध्यमातून अपघातांचे प्रमाण कमी करण्यात महामार्ग पोलिसांना यश आले आहे.**

# महामार्गाचे रक्षक

**विजय पाटील**

रस्त्यावर होणाऱ्या अपघातांना नियंत्रणात आणणे व अपघातग्रस्तांना तत्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे हे दोन मुख्य उद्देश समोर ठेवून, दरवर्षी जानेवारी महिन्यात रस्ता सुरक्षा अभियान राबवण्यात येते. या अभियानाकरिता शासनाकडून घोषवाक्य देण्यात येते व ते घोषवाक्य घेऊन रस्ते सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी, विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या अभियानामध्ये महामार्ग पोलीस, जिल्हा / शहर वाहतूक पोलीस, परिवहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, विविध सेवाभावी संस्था यांचे मदतीने सदरचे अभियान यशस्वी व परिणामकारकरीत्या राबवण्यात येते.

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनतेमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जाणीव निर्माण केली जाते. सुरक्षा नियमांचे पालन करणे कसे आवश्यक आहे याबाबत वाहन चालकांचे समुपदेशन केले जाते. शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना वाहतूक नियमनाबाबत माहिती दिली जाते. त्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

## सुसज्ज यंत्रणा

महामार्ग पोलीस विभागाला शासनाकडून महिंद्रा स्कॉर्पियो, टाटा सफारी यांसारखी हायस्पीड वाहने, टाटा सुमो गोल्ड व नवीन मोटर सायकलचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे महामार्गावर अपघात झाल्यास जखमींना तातडीने वैद्यकीय मदत देणे, महामार्गावर गस्त करणे, वाहतूक नियमन करणे सुलभ झाले आहे.

वाहतूक पोलीस विभागाला स्पीडगन, ब्रेथ नालायझर मशीनसारखी अत्याधुनिक साधनसामग्री पुरवल्याने वेगाने वाहन चालवणारे वाहनचालक व मद्यप्राशन करून वाहन चालवणारे वाहन चालक यांच्यावर प्रभावीपणे कारवाई करण्यात येते.

वाहतूक पोलीस विभागाला वाहतूक नियमनाकरिता मेगाफोन, ट्रॅफिक कोन, बोलार्ड, प्लास्टिक व लोखंडी बॅरिकेट, व्हील क्लॅम्प जॅमर इत्यादी सामग्री प्राप्त झाल्याने महामार्गावर प्रभावीपणे वाहतूक नियमन करण्यात येते.

## अदृश्य पोलीस

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर होणारे वाढते अपघात टाळण्यासाठी व वाहनचालकांना शिस्त लागण्यासाठी, महामार्ग पोलीस विभागाने ९ सप्टेंबर २०१६ पासून अदृष्य पोलीस योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर लेन कटिंग करणारे वाहनचालक, इशारा न देता धोकादायकरीत्या ओव्हरटेक करणारे वाहनचालक व धोकादायकरीत्या वाहन चालवणारे वाहनचालक यांच्यावर कारवाई करण्याकरिता खालापूर, उर्से व कुसगांव टोलनाका येथे विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात येते. नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येते. त्यामुळे मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर करण्यात येणाऱ्या कारवाईमध्ये वाढ झाली आहे.

## गोल्डन अवर्स (सुवर्ण तास)

मुंबई–पुणे–द्रुतगती मार्गावर शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी वाहनांच्या गर्दीमुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महामार्ग पोलीस विभागातर्फे २१ सप्टेंबर २०१६ पासून 'गोल्डन अवर्स' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वाहनांच्या गर्दीच्या वेळी थ्री एक्सेल, मल्टी एक्सेल, ओडीसी वाहनांना द्रुतगती महामार्गावर विशिष्ट ठिकाणी अडवण्यात येते व वाहतुकीची कोंडी टाळण्यात येते.

**पोलीस अधीक्षक, मुख्यालय, महामार्ग सुरक्षा पथक, मुंबई**



**निरपराध सामान्य जनतेला विनाकारण त्रास होणार नाही आणि दोषी व गुन्हेगारांना कठोर शासन करण्याच्या दृष्टीने, दहशतवादविरोधी पथक कार्यरत आहे. या पथकाच्या प्रयत्नांमुळे परभणीसारख्या ठिकाणी इसिस कार्यप्रणालीनुसार संभाव्य दहशतवादी घटना योग्य वेळी उघडकीस आली. महाराष्ट्रातील ८० पेक्षा जास्त तरुण दहशतवादाच्या विचारसरणीकडे वळण्याच्या तयारीत असताना, त्यांचे मानसिक परिवर्तन करून; त्यांना मूळ प्रवाहात आणण्यात आले. त्यांना आत्मनिर्भर करण्याची सामाजिक बांधिलकीसुद्धा या पथकाने दाखवली आहे.**

# सक्षम, समर्थ

**अतुलचंद्र कुलकर्णी**

२००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जगभरात अनेक ठिकाणी दहशतवादविरोधी कारवायांसाठी नव्याने सुरक्षा दलांची स्थापना झाली. काही ठिकाणी अगोदरच अस्तित्वात आलेल्या दलांचे स्वरूप व प्रारूप दहशतवादाशी लढण्यासाठी, अधिक अनुरुप बनवण्यात आले. दहशतवादविरोधी कायदे अनेक ठिकाणी अस्तित्वात आले. पूर्वी अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा करून त्यात दहशतवादाचा अधिक सक्षमतेने मुकाबला करण्यासाठी आवश्यक तरतुदींचा समावेश करण्यात आला.

भारतातदेखील काश्मीर, पंजाब किंवा पूर्वोत्तर राज्यात फुटीरतावादासमवेतच अनेक आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांच्या हल्ल्यांचा इतिहास आहे. २००१ साली झालेला भारतीय संसदेवरील हल्ला, २००२ चा अक्षरधाम मंदिरावरील दहशतवादी हल्ला, २००२-२००३ मुंबईमध्ये विविध ठिकाणी झालेले अनेक बॉम्बस्फोट यामुळे देश हादरून गेला. दहशतवादाचा सामना करण्यासाठी विशेषकृती दलाची आवश्यकता भासू लागली. यातून अनेक राज्यांमध्ये दहशतवादविरोधी पथकाची स्थापना होण्यास सुरुवात झाली.

महाराष्ट्र हे देशातील एक अग्रगण्य व विकासात आघाडीवर असणारे राज्य आहे. नव्वदच्या दशकातच देशाबरोबर महाराष्ट्रात सिमीसारख्या संघटनांनी दहशतवादाची पाळेमुळे मजबूत करण्यास सुरुवात केली होती. या पार्श्वभूमीवर २००४ साली राज्यात दहशतवादविरोधी पथकाची स्थापना करून दहशतवादाचा सामना करण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करण्यात आली. दहशतवादाशी लढण्याची कार्यकक्षा ठरवण्यात आली.

### दहशतवादविरोधी पथक

महाराष्ट्र तसेच देशातील विविध देशविरोधी संघटनांबाबत माहिती मिळवणे व कारवाई करणे, आय.बी. रॉ, एनआयए अशा



# सदैव सज्ज

देशपातळीवरील विविध संस्थांशी समन्वय ठेवणे व इतर राज्यातील समकक्ष संस्थांशी समन्वय साधणे, संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर कारवाई करून त्यांना नेस्तनाबूत करणे, बनावट भारतीय चलनी नोटा आणि अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळ्यांची माहिती घेऊन त्याविरुद्ध कारवाई करणे हा दहशतवादविरोधी पथकाच्या स्थापनेमागील उद्देश आहे. महाराष्ट्रात घडलेल्या दहशतवादी घटनांचा तपास करून आरोपींना जास्तीत जास्त सजा मिळेपर्यंत त्या गुन्ह्यांचा पाठपुरावा करण्याचे कामही दहशतवादविरोधी पथकाकडून केले जाते.

राज्यामध्ये दहशतवादी संघटनेच्या कारवाया आणि दहशतवादी कृत्यांना आळा घालण्याचे आणि राज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका दहशतवादविरोधी पथक बजावत असते.

### कार्यकक्षा

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक, हे राज्याच्या भौगोलिक कक्षेत वेगवेगळ्या ठिकाणी उपपथकाद्वारे कार्यरत आहेत. सप्टेंबर २०१७

मध्ये निर्माण झालेल्या सोलापूर आणि नवी मुंबईसह अशा उपपथकांची संख्या एकूण १४ आहे. अप्पर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी दहशतवादविरोधी पथकाचे प्रमुख असतात, त्यांच्यासोबत विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, सहायक पोलीस आयुक्त पदावरील विविध अधिकारी कार्यरत आहेत. सुमारे ६०० पेक्षा जास्त मनुष्यबळ असणारे महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक हे देशातील कार्यक्षम व अग्रगण्य पथक आहे. दहशतवादाचा सामना करण्यासाठी प्रतिबंध आणि तपास करण्याचे काम दहशतवादविरोधी पथकमार्फत केले जाते. तर कृतीसाठी फोर्सवन व जलद प्रतिसाद पथकासारखी सुसज्ज विशेषीकृत पथके तयार करण्यात आली आहेत.

## व्यापक यंत्रणा

दहशतवादी संघटनांच्या कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी दहशतवादविरोधी पथकाने व्यापक यंत्रणा निर्माण केली आहे. विविध माध्यमातून गोपनीय माहिती मिळवून संशयित व्यक्ती आणि संघटनांची गोपनीय तसेच काही वेळा उघड चौकशी करून संशयित इसमांच्या हालचालीवर लक्ष ठेवले जाते. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या संस्था, संघटनांवर नजर ठेवून दहशतवादविरोधी पथक आपले प्रतिबंधात्मक कार्य पार पाडीत असते. आंतरराष्ट्रीय व सीमापार दहशतवादी आणि त्यांच्या संघटनांचे राज्यातील आणि देशातील दहशतवादी आणि त्यांचे समर्थक यांच्या संपर्क व संबंधावरती नजर ठेवून असतात. अल-कायदा आणि इसिससारख्या दहशतवादी संघटनांचे छुपे समर्थन व प्रचारक यांच्यावर नजर ठेवली जाते. त्याबरोबरच अशा आतंकवादी संघटनांच्या विचारांचा प्रचार करणारी संकेतस्थळे बंद करण्याचे महत्त्वाचे काम दहशतवादविरोधी पथक करत असते.

समाजातील वेगवेगळ्या घटकांशी व नागरिकांशी संवाद साधून आणि दहशतवाद विरोधकक्षांच्या सहकार्याने दहशतवाद विरोधात लोकजागृती करण्याचे कार्यदेखील दहशतवादविरोधी पथक करत असते. युवकांमध्ये धार्मिक कट्टरतावाद रुजवून त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण करून, दहशतवादी संघटनांमध्ये सामील होण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीच्या मुसक्या आवळण्यास, दहशतवादविरोधी पथकास यश प्राप्त झाले आहे. कट्टरतावादी विचारसरणीच्या शिकार झालेल्या व इसिस सारख्या दहशतवादी संघटनांमध्ये सामील होण्याच्या तयारीत असणाऱ्या युवकांचे मानसिक परिवर्तन करून, त्यांना मूळप्रवाहात आणण्यामध्ये यश प्राप्त झाले आहे. मौलवी आणि धर्मगुरूंच्या सहकार्याने इसिससारख्या संघटनांकडे आकृष्ट झालेल्या तरुणांमध्ये जनजागृती करून, शासनाच्या विविध विभागांमार्फत त्यांना स्वयंरोजगाराचे शिक्षण व प्रशिक्षण देऊन आर्थिकदृष्ट्या स्वयंनिर्भर बनवून; त्यांचे पुनर्वसन करण्याचा दहशतवादविरोधी पथक यशस्वीपणे प्रयत्न करीत आहे. जागतिक शांततेची प्रणेती व दहशतवादाची बळी नोबेल पारितोषिक विजेती मलाला युसुफजई यांच्या 'बंदुकीने तुम्ही दहशतवाद्याला ठार करू शकाल, मात्र शिक्षणाने तुम्ही दहशतवादास नष्ट करू शकाल...'या वाक्याची प्रचिती येते.



## राष्ट्रीय कार्य

दहशतवादविरोधी पथकाचे काम हे प्रत्यक्षपणे व महत्त्वाचे राष्ट्रीय काम आहे. ज्यायोगे राष्ट्रविरोधी शक्तींना आळा घालणे व राष्ट्राची एकता व अखंडता टिकवणे हे साध्य होते. दहशतवादविरोधी पथकामध्ये काम करताना दहशतवादी व्यक्ती, संस्था त्यांचे पाठीराखे, सहानुभूतीदार यांच्याशी पथकाचा नित्यनियमाने संबंध येतो. त्यांची माहिती आणणे, त्यांच्यावर निगराणी ठेवणे, त्यांच्या कारवायांना आळा घालणे व वेळप्रसंगी त्यांच्याशी प्रत्यक्ष सशस्त्र मुकाबला करण्याची तयारी ठेवून अशा प्रसंगी उत्तुंग साहसाची, धाडसीवृत्तीची,



कौशल्याची आवश्यकता असते. त्यामुळे दहशतवादविरोधी पथकामधील अधिकारी व अंमलदार यांना अशी व्यावसायिक कौशल्ये व गुण आत्मसात करण्यासाठी देशातील विविध नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये तसेच दहशतवादविरोधी पथकांतर्गतही प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर स्थानिक पातळीवर कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी विविध पोलीस आयुक्तालये व परिक्षेत्रांतर्गत दहशतवादविरोधी पथकामार्फत प्रशिक्षण दिले जाते. दहशतवादाचा पूर्णपणे बीमोड करण्यासाठी व्यावसायिक कार्यक्षम व सक्षम मनुष्यबळाची निर्मिती करण्यात येते.

दहशतवादविरोधी पथकाच्या सक्षमीकरणाकडे व सुधारणांकडे महाराष्ट्र शासनाने गेल्या काही वर्षांमध्ये ठळकपणे लक्ष दिले आहे. दहशतवादविरोधी पथकांतर्गत कामाचे वाढते स्वरूप व व्याप्ती याचा विचार करून सोलापूर आणि नवी मुंबई येथे आणखी २ उपपथकांची स्थापना करण्यात आली आहे.

**अपर पोलीस महासंचालक, दहशतवादविरोधी पथक**



**राज्यातील कायदा व सुव्यवस्था ठेवणारा पोलीस हा महत्त्वाचा घटक आहे. हा घटक अधिक सक्षम आणि सामर्थ्यशाली होण्यासाठी त्याचे आधुनिकीकरण आवश्यक असल्याने, शासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. पोलिसांना कामामध्ये मदत होणे, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे, गुन्ह्यांचा जलद तपास होणे व अपराधसिद्धी वाढणे यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.**

# तत्पर तपास आणि अपराधसिद्धीत वाढ

**सुधीर श्रीवास्तव,** अपर मुख्य सचिव (गृह)



पोलीस दलासाठी अत्याधुनिक नियंत्रण कक्ष वाढत्या डिजिटल गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी सायबर सेलची स्थापना, गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही प्रकल्प, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ई–चलान प्रकल्प आदी प्रकल्प सुरू केले आहेत. पोलीस दलाचा कणा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीतही अनेक महत्त्वाचे निर्णय शासनाने घेतले आहेत.

## ई–तक्रार प्रणाली

नागरिकांना तक्रार दाखल करणे सोपे व्हावे व त्यांना वेळेवर माहिती मिळावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस नागरिक पोर्टलच्या मोबाइल ॲपचे नुकतेच अनावरण केले आहे. या ॲपमुळे नागरिकांना मोठी सोय उपलब्ध होणार असून, पारदर्शक माहितीमुळे पोलिसांवरील विश्वास आणखी वाढण्यास मदत होणार आहे.

## सायबर सेल व सायबर पोलीस ठाणे

राज्यात वाढलेल्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता देशातील पहिला महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प सुरू झाला आहे. याअंतर्गत राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात सायबर सुरक्षा कक्ष सुरू करण्यात आले आहेत. सायबर गुन्ह्यांची लवकरात लवकर उकल व्हावी, यासाठी विशेष पोलीस नियुक्त केले आहेत. या प्रकल्पांतर्गत सायबर गुन्हे तसेच सर्व गुन्ह्यांची उकल करण्यासाठी राज्य पोलीस यंत्रणा सुसज्ज करण्यात येत आहे. सायबर गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस दलाकरिता Automated Multi-model Biometric Identification System (AMBIS) हा संगणकीय प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. देशात प्रथमच फिंगर प्रिंटकरिता जागतिक स्तरावरील हे प्रगत तंत्रज्ञान राबवण्यात येत आहे. या तंत्रज्ञानामध्ये आरोपीचे बोटांचे ठसे, चेहऱ्याच्या ठेवणीच्या तसेच आयरीस (डोळ्यातील पडदा) बाबत अभिलेख जतन करण्यात येणार आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे क्लिष्ट स्वरूपांच्या गुन्ह्यांची उकल करण्यास मदत होणार आहे.



## संगणक गुन्हे विश्लेषण

प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये प्रलंबित प्रकरणे प्राधान्याने निकाली काढण्यासाठी तसेच फौजदारी खटल्यातील सिद्धपराध प्रमाण वाढवण्यासाठी एकूण आठ प्रयोगशाळांपैकी मुंबई, पुणे व नागपूर येथे स्वतंत्र सायबर गुन्हे (संगणक गुन्हे विश्लेषण) विभाग सुरू करण्यात आला असून मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती येथे ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण विभाग सुरू करण्यात आला. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिकच्या प्रयोगशाळांमध्ये डीएनए विभाग सुरू करण्यात आला आहे.

## ई–चलान

राज्यातील दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या व त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर उपाय शोधण्याचे काम पोलीस दलाच्या वतीने सुरू आहे. वाहतूक कोंडीबरोबरच बेशिस्त वाहतुकीला आळा घालण्यासाठी व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तत्काळ कारवाईसाठी ई–चलान हा प्रकल्प सुरू केला आहे.

## पोलिसांसाठी आधुनिक उपकरणे व साहित्य

पोलीस दलाच्या आधुनिकीकरणांतर्गत पोलिसांसाठी आधुनिक उपकरणे व साधनसामग्रीची खरेदी करण्यात आली आहे. यामध्ये पोलिसांसाठी ४६०० बुलेटप्रूफ जॅकेट, १५०० हेल्मेट याचबरोबर बॉडी प्रोटेक्टर सूट, धातू व स्फोटक पदार्थ शोधक यंत्रे, ड्रोन, अंधारात

काम करणाऱ्या अत्याधुनिक दुर्बिणी, मोठ्या बॅगा स्कॅनिंगसाठी एक्स-रे स्कॅनर, तसेच छोटे स्कॅनर, स्फोटक विरोधी सूट, जॅमर आदी साहित्य मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आल्या आहेत. याबरोबरच दंगल नियंत्रण पथकास विशेष पोषाख दिला आहे. पॉलिकार्बोनेटमधील हे पोषाख वजनाने हलके परंतु मजबूत आहेत. दंगल नियंत्रण पथकांना बॉडी प्रोटेक्टर साधने दिली आहेत. या साधनामुळे कुठल्याही दंगल अथवा इतर परिस्थितीत पोलिसांना दगड, काठी, बाटल्या यापासून संरक्षण मिळणार आहे.

पोलीस दल अधिक सक्षम करण्यासाठी व तपास प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी नवीन श्वानपथके निर्माण करण्याकरिता शासनाने 'जर्मन शेफर्ड' व 'लॅब्रेडॉर' जातीचे १३५ आणि 'बेल्जियन मेलेन्वा' जातीचे ४६ असे मिळून एकूण १८१ श्वान खरेदी करण्यास मान्यता दिली आहे.

### आंतर जिल्हा बदलीसंदर्भातील अट रद्द

पोलीस दलात अनेक तरुण हे आपला जिल्हा सोडून इतर जिल्ह्यात भरती होतात. काही तरुण हे ग्रामीण भागातून मुंबई, पुणे शहरात आलेले असतात. नोकरी मिळाली असली तरी गावी राहणारे वृद्ध पालक, मोठ्या शहरात राहताना जाणवणाऱ्या अडचणी यामुळे त्यांना आपल्या स्वतःच्या किंवा जवळपासच्या जिल्ह्यात बदली हवी असते. मात्र, २०११ नंतर भरती झालेल्या पोलिसांना आंतर जिल्हा बदलीची अट घालण्यात आली होती. मात्र, शासनाने निर्णय घेऊन अशा बदली इच्छुक पोलिसांसाठी आंतर जिल्हा बदलीची अट रद्द करून दिलासा दिला आहे.

### कर्मचाऱ्यांना आहारभत्ता

पोलिसांना अनेक वेळा दहा तासांपेक्षा जास्त काळ कामावर हजर राहावे लागते. आठ तासांपेक्षा जास्त काळ कामावर असेल तर अशा कर्मचारी किंवा अधिकाऱ्यास अतिकालिक (आहार)भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, फोटोग्राफर यांना १५०० रुपये तर पोलीस हवालदार, नाईक, शिपाई यांना १३५० रुपये आहारभत्ता लागू करण्यात आला आहे.

### अपराधसिद्धीसाठी विशेष निर्णय

राज्यातील फौजदारी खटल्यातील सिद्धापराधाचे प्रमाण वाढवण्यासाठी स्वतंत्रपणे १४ निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये प्रलंबित खटल्यांबाबत पुनर्विलोकन करण्यासाठी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करणे, सहायक सरकारी अभियोक्त्यांच्या पदोन्नती व पुनर्नियुक्तीसाठी त्यांनी चालवलेल्या खटल्यातील दोषसिद्धीच्या प्रमाणासाठी २५ टक्क्यांची अट बंधनकारक करणे, खटल्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा अवलंब करून अशी साक्ष ग्राह्य मानणे आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

विशेष मुलाखत

आपले पोलीस, आपली अस्मिता



# संवेदनशील कर्तव्यदक्षता

सतीश माथूर

**आजच्या काळात फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत, त्यापासून सुरक्षित राहण्यासाठी आपण जनता आणि पोलीस विभागाला काय संदेश द्याल?**

**पोलीस महासंचालक :** आजच्या काळात फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत हे आपले म्हणणे बरोबर आहे, काही अल्प आकर्षणापायी किंवा ज्याला आपण इझी मनी म्हणतो त्याच्या मोहापायी सामान्य माणूस याला भुलतो. हल्ली सोशल नेटवर्किंग साईट्सच्या माध्यमातून असे मोहाचे जाळे टाकले जाते. ई-मेलवर किंवा व्हॉट्सॲपवर अशा पद्धतीच्या ऑफर दिल्या जातात त्यापासून जनतेने दूर राहिले पाहिजे. तसेच धन दुप्पट करून देण्याच्या किंवा सोने वाढवून देण्याच्या प्रकरणापासून जनतेने दूर राहायला हवे. पोलीस विभागाचे जनतेवर आणि अशा फसवणूक करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष असते याची खात्री जनतेने बाळगावी कारण राज्यभर आम्ही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कॅमेऱ्यांच्या माध्यमाने सगळ्या कानाकोपऱ्यांवर लक्ष ठेवून असतो. पोलीस विभाग सजग आहे. कर्तव्यदक्ष आहे. जनतेने अगदी निडरपणे पोलिसांना आपला स्नेही, मित्र, बंधू, सखा समजावा. पोलीस आपल्या मदतीसाठीच आहे. पण त्याचप्रमाणे जनतेने अल्प मोहाला बळी पडू नये. मला एक गोष्ट सांगायला निश्चितपणे आवडेल की, गेल्या वर्षभरात गणपती, ईद, दिवाळी, नाताळ, पारशी नववर्ष, होळी-धूलीवंदन असे वार्षिक मोठे सण होऊन गेले, अनेक आंदोलने राज्यातील विविध ठिकाणी झाली. मात्र, राज्यातील जनतेने पोलिसांना नेहमीच सहकार्य केले आहे. जनतेच्या सेवेत पोलीस असल्याचे भान जनतेलाही आहे. याचा मला विशेष उल्लेख या ठिकाणी करावासा वाटतो. जनतेने असेच पोलिसांशी सहकार्य ठेवावे आणि पोलिसांकडूनही सहकार्य घ्यावे. जनतेने केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे विशेष अभिनंदन करतो आणि आभारही व्यक्त करतो.

**पोलीस आणि जनतेतील दरी अधिकाधिक कमी व्हावी यासाठी आपण विशेष प्रयत्न करत आलेले आहात. नेमके कोणकोणते प्रयोग आपण केले ज्यामुळे ही दरी बऱ्यापैकी कमी झालेली दिसते.**

**पोलीस महासंचालक :** पोलिसांनी जनतेपर्यंत जावे यासाठी मी

**पोलिसांपर्यंत येण्यास जनता पूर्वी घाबरत असे. त्यामुळे पोलिसांनी जनतेपर्यंत जावे यासाठी पोलीस विभागाला सजग केले आहे. आता पोलीस स्वत: अधिकाधिक जनतेपर्यंत जाताना पाहायला मिळतात. कोणत्याही परिस्थितीचा सामना करताना पोलीस यंत्रणा कमी पडू नये यासाठी आम्ही पोलिसांना अधिकाधिक यंत्रणांनी आणि आधुनिक वाहनांनी सुसज्ज करत आहोत. आधुनिक तंत्रज्ञान आणि चांगली शस्त्रे, बुलेटप्रूफ जॅकेट, बुलेटप्रूफ वाहने, बॉम्बशोधक वाहने आदींची मोठ्या प्रमाणात सज्जता केली आहे.**

आमच्या विभागाला सजग केले. पोलिसांपर्यंत येण्यास जनता पूर्वी घाबरत असे. आता तुम्ही पाहिले तर पोलीस स्वत: अधिकाधिक जनतेपर्यंत जाताना पाहायला मिळतील. हा काही आज आम्ही अमलात आणलेला पर्याय नाही. पोलीस नेहमीच जनतेसाठी कार्यरत असतात, पण त्यात काही वेळेला नरमाई येते. ती दूर करण्याचा प्रयत्न मी केला. मला या कामी माझ्या संपूर्ण पोलीस विभागाचे आणि सहकाऱ्यांचे, विशेषत: पोलीस शिपायांचे खूप सहकार्य झाले. जनतेतील तरुणांचेही खूप सहकार्य झाले. त्यामुळे पोलीस विभागातील अनेक नवीन प्रयोग मी यशस्वी करू शकलो. पोलिसांवर अर्थातच कामाचा ताण खूप असतो. त्यांना स्वत:च्या कुटुंबासाठी वेळ देता येत नाही, दिवसभर ते ड्युटीवर असतात, जनतेच्या अपेक्षांचे, वाढत्या लोकसंख्येमुळे ताण पोलिसांवर येत असतात. पण आम्ही ते आव्हान स्वीकारतो स्वत:च्या स्वार्थाचा, कुटुंबाचा विचार न करता जनतेला सुरक्षित आयुष्य देण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहतो. मध्यंतरी आम्ही ड्रगच्या विळख्यात सापडलेल्या मुलांना बाहेर काढण्यासाठी त्यांच्याजवळ गेलो. त्यांना यातील तोटे समजावून सांगितले आणि त्यांना त्यातून बाहेर काढले. अनधिकृतपणे ड्रग विकणाऱ्यांचाही बंदोबस्त केला. पोलीस विभागातील काही अधिकारी/कर्मचारी शाळा-कॉलेजमध्ये जाऊन त्यांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारे आम्ही अधिकाधिक जनताभिमुख होऊन, जनतेला सहकार्य करण्याचा आणि त्यांच्याकडून सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न करत असतो.


**पोलिसांसाठी विशेषत: शिपाई किंवा हवालदार म्हणून कार्यरत असणाऱ्या पोलिसांसाठी आपण कोणते उपक्रम राबवता.**

**पोलीस महासंचालक :** पोलीस शिपायांची काळजी घेण्यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत. काही योजनांमध्ये त्यांच्या सर्व औषधोपचाराचा खर्च पोलीस विभागामार्फत केला जातो, तसेच पोलिसांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च आम्ही विभागामार्फत करतो. ज्या पोलिसांची मुले उच्च शिक्षण घेत आहेत. त्यांना शिष्यवृत्ती आम्ही जाहीर केली आहे. पोलीस विभागातील शिपाई किंवा हवालदार यांना पुढील शिक्षण घेण्यासाठीही आम्ही प्रवृत्त करतो. त्यांना बढती देऊन त्यांचे भविष्य अधिक चांगले होईल यासाठीही आम्ही काळजी घेत असतो. पोलिसांनी सुट्टी घेतली तर त्यांना विशेष सवलत देऊन, कुटुंबासोबत त्यांना अधिक वेळ देता यावा, पर्यटन करता यावे यासाठीही त्यांना सवलती देऊ करतो.

पोलीस आपल्या कुटुंबासमवेत तीर्थस्थळांवर गेले की, तिथेही त्यांची विशेष सवलतीत व्यवस्था कुटुंबासमवेत होईल, याची आम्ही काळजी घेतो. काही ठिकाणी आम्ही हॉलिडे होमदेखील पोलिसांसाठी सुरू केले आहेत त्याचाही लाभ पोलीस घेत असतात. आणखी एक महत्त्वाची बाब मी इथे आवर्जून सांगू इच्छितो ती म्हणजे, पोलीस विभागात कार्य करणाऱ्या ४५ वर्षांवरील सर्वांना; वरिष्ठ अधिकाऱ्यांना ज्या वैद्यकीय सेवासुविधा मिळतात त्याच दिल्या जातात. त्यांची नियमित तपासणी केली जाते. त्यांना आवश्यक वाटल्यास औषधोपचाराचीही व्यवस्था एका सामाजिक संस्थेकडून आम्ही करतो. पुढील वर्षांपासून आम्ही यासाठी कोणत्याही एखाद्या संस्थेवर अवलंबून न राहता, पोलिसांच्या सर्व चाचण्या आणि त्यावरील उपचार सरकारी रुग्णालयात करण्यात याव्यात असा शासनाला प्रस्ताव पाठवला आहे. शासन यावर निश्चितपणे योग्य तो निर्णय घेईल. त्यामुळे केवळ कामाचा ताणच आम्ही पोलिसांना देत नाही तर त्यांचे स्वास्थ्यही चांगले राहावे

**दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी पोलीस विभाग काय करत आहे?**

**पोलीस महासंचालक :** गेल्या वर्ष दोन वर्षांत तरी राज्यात दहशतवादाची कोणतीही मोठी घटना घडलेली नाही ही चांगली गोष्ट असली तरी आम्ही पोलीस विभागाच्या अॅण्टी टेररिस्ट स्कॉडमार्फत (एटीएस) सज्ज आहोत. संपूर्ण राज्यात विविध जिल्ह्यात आम्ही सेन्सेशनल एटीसी टायर केलेल्या आहेत आणि त्यांना साधन सामग्रीही आम्ही देऊ केली आहे. पोलीस विभागाचे संपूर्ण राज्यावर बारीक लक्ष आहे. त्यामुळे जनतेने निर्धास्त राहावे.



यासाठीही प्रयत्न करतो.

**पोलिसांच्या घराचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. आपण यावर तोडगा काढणार होतात?**

**पोलीस महासंचालक :** आजच्या दिवसापर्यंत आम्ही बऱ्याच अंशी यात यशस्वी झालो आहोत. पोलीस शिपायांची आम्ही छोटी घरे जी ३५० चौ. फूट बांधली आहेत, ती अत्यंत चांगल्या दर्जाची आहेत. त्याची पाहणी करताना पोलीस अधिकारीही आम्हाला अशीच घरे द्या किंवा हीच द्या अशी मागणी करू लागले आहेत. इतकी ती सुंदर आणि टिकाऊ झाली आहेत. पण हे काम खूप मोठे आहे.



वाकोला, मुंबई येथील पोलीस निवासस्थाने

जवळपास १ लाखापेक्षा अधिक घरे बांधण्याची आवश्यकता आहे. ते बांधण्यास वेळ लागेल, पण काम प्रगतिपथावर आहे. या वेळेस जवळपास ३०० कोटी रुपये आपण पोलिसांच्या घरांच्या डागडुजीसाठी दिले आहेत. जुनी जी पोलीस लाइन आहे ती चांगल्या वस्तीत आहे, त्या घरांची डागडुजी करून त्यांना चांगली बनवण्याचा आमचा या वर्षात संकल्प आहे.

**पोलिसांचे कामाचे तास अधिक असतात त्यामुळे त्यांना बरेचदा तणांवाना सामोरे जावे लागते. पोलिसांचे कामाचे तास कमी व्हावेत आणि पोलिसांची संख्या वाढावी यासाठी पोलीस विभागामार्फत काही धोरण आखले जात आहे का?**

**पोलीस महासंचालक :** पोलिसांच्या कामाचे तास अधिक आहेत हे खरे आहे पण याचा ताण अधिक आहे तो शहरांच्या ठिकाणी. कारण त्यांना घरातून कामाच्या ठिकाणी ये-जा करायलाही वेळ लागतो. त्यामुळे त्यांना तो ताण जाणवतो. पण त्यावरही आम्ही काही उपाय करत आहोत. शासनाशी याबाबत आमचा संवाद सुरू आहे. आम्ही पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी बऱ्याचशा जबाबदाऱ्या इतर संलग्न विभागाकडे दिल्या आहेत. त्याचेही सहकार्य आम्हाला पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी होत आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर आता मध्यंतरी सरकारी रुग्णालयात डॉक्टरांवर हल्ला करण्याचा जो प्रकार मध्यंतरी झाला त्याबाबत उपाययोजना म्हणून, आम्ही महाराष्ट्र सिक्युरिटी कॉर्पोरेशनचे (एनएसएस)चे गार्ड त्या रुग्णालयात नेमले. पोलिसांवरील ताण कमी होईल आणि रुग्णालयात कायदा सुरक्षेचा प्रश्न उद्भवणार नाही. असे काही नॉन पोलीस थेट पोलीस ड्युटीसाठी आणून, पोलिसांना सहकार्य करण्याचे धोरण आम्ही राबवत आहोत. जेणेकरून, पोलिसांवरील कामाचा ताण कमी होण्यास मदत होईल.

**पोलिसांची यंत्रणा बरेचदा कमी पडते असे दिसून येते यासाठी आपण काय उपाययोजना करत आहात?**

**पोलीस महासंचालक :** पोलीस यंत्रणा कमी पडू नये यासाठी आम्ही पोलिसांना अधिकाधिक यंत्रणांनी आणि आधुनिक वाहनांनी सुसज्ज करत आहोत. शासनाने यासाठी आम्हाला सहकार्य करायचे ठरवले आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि चांगली शस्त्रे, बुलेटप्रूफ जॅकेट, बुलेटप्रूफ वाहने, बॉम्बशोधक वाहने जी नक्षलवादी भागात लागतात त्याची आम्ही मोठ्या प्रमाणात सज्जता केली आहे.

**मुख्यमंत्री महोदयांच्या 'ट्रॅन्स्फॉर्म महाराष्ट्र' या संकल्पनेस अनुसरून पोलीस विभागात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची कृपया माहिती द्याल.**

**पोलीस महासंचालक :** ट्रॅन्स्फॉर्म महाराष्ट्र या संकल्पनेस अनुसरून आगामी दोन वर्षात पोलीस विभागामध्ये अनेक वैविध्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येणार आहेत. यामध्ये सामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना करण्यात येणार आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला व बालके यांना सुरक्षित-निर्भयपणे जीवन जगता यावे यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. विविध उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट सर्व पोलीस घटकांना ठरवून देण्यात आले आहे. त्याद्वारे पोलीस व सामान्य नागरिक यांच्यातील सौहार्दाचे संबंध वृद्धिंगत होण्यात मदत होणार आहे. तसेच त्याद्वारे जनमानसातील पोलिसांची प्रतिमा उंचावून, समाजात सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचे व त्यातून अत्यंत कार्यतत्पर व लोकाभिमुख पोलीसदल समाजाच्या अतिदुर्बल घटकांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत खालील महत्त्वाच्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

■ महिला, लहान बालके व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता ■ देखभाल न्यायाधिकरणांची स्थापना करणे ■ रस्त्यावरील गुन्हे ■ अभ्यागत व्यवस्थापन प्रणालीचे कार्यन्वयन ■ सायबर गुन्ह्यांबाबत प्रशिक्षण ■ सुरक्षा समज सुचकांक ■ कम्युनिटी पोलिसिंग कक्ष ■ पोलीसदल आणि त्यांच्या कार्यपद्धतीचे आधुनिकीकरण.

मुलाखत: **धनंजय गोडबोले / निखिल दीक्षित**




# अब हम रुकेंगे नहीं, छोडेंगे नहीं....

**देशाच्या अंतर्गत सुरक्षेला मोठे आव्हान असलेली नक्षल चळवळ महाराष्ट्रात १९८० च्या दशकात सुरू झाली. तत्कालीन आंध्रप्रदेश (सध्याचा तेलंगणा) मधून या चळवळीने तेव्हा चंद्रपूर जिल्ह्याचा भाग असलेल्या सिरोंचा या भागात सर्वप्रथम प्रवेश केला. सुरुवातीला राज्याच्या गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ आणि नांदेड या सहा जिल्ह्यांत कार्यरत असलेला नक्षलवाद हा आता केवळ गडचिरोली जिल्हा तसेच गोंदिया जिल्ह्यातील काही तालुक्यापुरताच मर्यादित राहिला आहे.**

**हंसराज राऊत**

नक्षलग्रस्त भागासाठी प्रशासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी व विकासाच्या विविध योजनांमुळे, तसेच पोलिसांचा दुर्गम भागातील ग्रामस्थांशी वाढलेला जनसंपर्क व संवादामुळे; शासनाच्या विकास कामांना जनतेचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळू लागला आहे. पोलिसांच्या विशेष रणनीतीमुळे मागील तीन वर्षात नक्षल्यांकडून केल्या जाणाऱ्या घटनांच्या संख्येत घट होऊ लागली आहे. विविध चकमकीत मोठ्या प्रमाणावर नक्षली मारले जात असल्यामुळे त्यांचे संख्याबळ कमी झाले आहे. शासनाच्या आत्मसमर्पण योजनेचा लाभ घेऊन, अनेक नक्षलवादी समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश करीत असल्यामुळे; नक्षल्यांना त्यांचे उर्वरीत संख्याबळही टिकवून ठेवणे कठीण झाले आहे.

नक्षल भरतीसाठी तरुण मिळत नसल्याने नक्षल्यांची चळवळ कमकुवत झाली आहे. स्वतःचे अस्तित्व संपण्याच्या भीतीमुळेच नक्षली सध्या भ्याड हल्ला करून, निरपराध सामान्य नागरिकांचे बळी घेऊन; दहशत माजवण्याचा प्रयत्न करीत आहेत. पोलिसांच्या यशस्वी रणनीतीमुळेच नक्षल्यांचा मुख्य गड असलेल्या अबुझमाड जंगलातील शिबिर उद्ध्वस्त झाले आहे. पोलिसांनी चहूबाजूने केलेल्या नाकेबंदीमुळे नक्षलवादी सध्या बॅकफूटवर येऊन हतबल झाले आहेत.

## नक्षलग्रस्त भागाची स्थिती

आदिवासी बांधवांचे खरे तारणहार असल्याचा कांगावा करून आणि खोटी आमिषे दाखवून नक्षल्यांनी सुरुवातीला स्थानिक गावकऱ्यांचा पाठिंबा मिळवला होता. मात्र अनेक वर्षे होऊनही आपला व गावाचा कुठलाही विकास न झाल्याचे लक्षात आल्यामुळे, नक्षल्यांचा खरा चेहरा उघड झाला आहे. मागील काही वर्षात राज्यातील इतर जिल्ह्यांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. मात्र केवळ नक्षल्यांनी घेतलेल्या आडमुठ्या भूमिकेमुळेच दुर्गम भागात विकास न झाल्याची जाणीव गावकऱ्यांना झाली आहे. त्यामुळेच स्थानिक गावकऱ्यांनी नक्षल्यांना पाठिंबा देणे बंद केले आहे.

जिवे मारण्याचा धाक दाखवून नक्षली आदिवासी बांधवांना दबावात ठेवत आहेत. शिक्षण, आरोग्य, रस्ता, दळणवळणाच्या सोयींसह आदी पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेकरिता विकासाच्या मार्गात ते वारंवार खोडा टाकत आहेत. तरीसुद्धा शासन व पोलिसांद्वारे दुर्गम भागात पायाभूत सोयी उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. अनेक दुर्गम भागातील गावात रस्ते व पूल बांधण्याचे काम गतीने केले जात आहे. अनेक दुर्गम गावात वीज पोहोचवण्यात यश मिळाले आहे. आरोग्य व विविध सुविधांकडे विशेष लक्ष देण्यात येत असल्यामुळे, स्थानिक जनतेच्या मनात शासनाविषयी विश्वास निर्माण झाला आहे.

ग्रामभेट व जनजागरण मेळाव्यांच्या माध्यमातून पोलीस व शासन दुर्गम भागात जाऊन, ग्रामस्थांच्या अडचणी सोडवल्या जात आहेत. रेशनकार्ड, वाहन परवाना, सातबारा, जातप्रमाणपत्र तसेच शेती, शिक्षण व रोजगार उपलब्धतेसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात येत आहे. विरोध करूनही दुर्गम भागात पायाभूत सोयी, शिक्षण, आरोग्य या बाबी पोहोचू लागल्याने नक्षल्यांचा जनाधार संपुष्टात येत आहे. त्यामुळेच नक्षल्यांच्या मनात स्वतःचे अस्तित्व संपण्याची भीती निर्माण झाली आहे.

## नक्षलवाद्यांविरुद्ध एल्गार

प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध सशस्त्र संघर्ष करणारी माओवादी चळवळ आता निरपराध सामान्यांची मारकेरी झाली आहे. नक्षल्यांकडून केल्या जाणाऱ्या या हिंसाचारामुळे अनेक आदिवासी कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत. पोलीस खबऱ्या ठरवून आदिवासींना ठार करणे, बंदुकीच्या जोरावर सामान्य माणसांच्या मनात कायम दहशत निर्माण करणे, शासनाच्या विकास कामांना विरोध करणे, आदिवासींना शासनाकडून मिळणाऱ्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवणे, शासकीय मालमत्तेचे नुकसान करणे, चळवळीच्या नावावर स्वतःच्या फायद्यासाठी खंडणी उकळणे, आदिवासींना शिक्षण व विकासापासून वंचित ठेवून, स्वतःच्या मुलांना उच्चशिक्षित करून लठ्ठ पगाराच्या नोकरीवर लावणे, हा नक्षल्यांचा दुटप्पीपणा जनतेपुढे उघड झाला आहे. त्यामुळेच सामान्य गावकऱ्यांनी यंदाच्या नक्षल सप्ताहात त्यांच्या आवाहनाला केराची टोपली दाखवली. रस्त्यावर उतरून ठिकठिकाणी नक्षली बॅनर जाळले. नक्षलस्मारक उद्ध्वस्त करून नक्षल्यांविरूद्ध एल्गार पुकारला.

## विशेष रणनीती व उपाययोजना

नक्षल चळवळ व त्यांच्या हिंसक कारवायांना वेळीच पायबंद घालण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहेत. जिल्हा पोलिसांना नक्षलविरोधी अभियान राबवण्याकरिता पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, याकरिता केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) बटालियन, राज्य राखीव दलाच्या (एसआरपीएफ) तुकड्या, विशेष कृती दल, सी ६० दल तसेच भारत राखीव दलाच्या (आयआरबी) कंपन्या नक्षलग्रस्त भागात तैनात करण्यात आल्या आहेत. या सर्वांच्या समन्वयातून कमी पल्ल्याचे तसेच लांब पल्ल्याचे अभियान, गुप्त चकमकी, नाकाबंदी, प्रतिबंधक कारवाई, संयुक्त आंतरराज्यीय अभियान, गुप्त वार्तांवर आधारित अभियान, क्षेत्र वर्चस्व मोहीम राबवली जात आहे.

नक्षलवाद्यांचा मुक्त संचार आणि हिंसाचार थांबवण्यासाठी पोलिसांनी आक्रमक रणनीती अवलंबिली आहे. शहरी भागातील आघाडीच्या संघटनांची गुप्त माहिती मिळवणे, त्यांच्याकडे तरुण–तरुणींना आकर्षित होऊ न देणे, यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत असलेल्या नक्षलविरोधी कक्षाच्या माध्यमातून लक्ष ठेवले जात आहे. सोबतच राज्य गुप्तवार्ता विभागाची (एसआयडी) एक विशेष चमू अशा आघाडीच्या संघटनांची माहिती गोळा करण्याचे काम करीत आहे. जंगलात नक्षलवाद्यांच्या दीर्घकालीन सशस्त्र रणनीतीचा प्रभावीपणे मुकाबला करण्यात येत आहे. त्यामुळेच मागील तीन वर्षात नक्षली घटनांना रोखण्यात पोलिसांना मोठ्या प्रमाणावर यश मिळाले आहे.

२०१५ व २०१६ या वर्षात भूसुरुंग स्फोटात बळी जाण्याची एकही घटना घडली नाही. २०१७ या वर्षात आत्तापर्यंत केवळ २ घटना घडल्या. मागील तीन वर्षात एकूण १०५ चकमकी झाल्या. यातील १४ चकमकींमध्ये २१ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात पोलिसांना यश मिळाले. त्यात २०१५ मध्ये एका चकमकीत २ नक्षली, २०१६ मध्ये ६ चकमकीत ११ नक्षली व २०१७ मध्ये ७ चकमकीत ८ नक्षल्यांचा खात्मा करण्यात आला. १३२ नक्षली व त्यांच्या समर्थकांना अटक करण्यात आली. यात २०१५ ला २७, २०१६ ला ३८ व २०१७ मध्ये ६७ अशा वरिष्ठ नक्षली ते सदस्यांपर्यंतचा समावेश आहे.

## पोलिसांचे सोशल इंजिनिअरिंग

एकीकडे नक्षल्यांबरोबर लढण्याची आक्रमकता कायम ठेवून पोलीस सोशल इंजिनिअरिंगचा वापर करत आहेत. त्याद्वारे शासनाच्या विविध योजनांचा प्रसार व प्रचार करून, नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील स्थानिक जनतेच्या मनात शासन व पोलिसांविषयी विश्वास निर्माण करण्यात येतो. जनमानसातील नक्षलवाद्यांचा स्थानिक जनाधार संपुष्टात यावा, प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध त्यांच्या मनामध्ये विश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम पोलीस व शासनाच्या इतर विभागाच्या मदतीने राबवण्यात येत आहेत. यात आत्मसमर्पण योजना,



ग्रामभेट, जनजागरण मेळावे, आपला महाराष्ट्र सुवर्णजयंती सहल योजना, गती प्रकल्प, नोकरीपूर्व प्रशिक्षण, क्रीडा स्पर्धा, आरोग्य शिबिरे, शेतीकाम व दैनंदिन कामाकरिता उपयोगी साधनसामग्रींचे वाटप, शालेय विद्यार्थ्यांना नक्षलवादाविरोधात शपथ आदींचा समावेश आहे.

● **आत्मसमर्पण योजना :** नक्षल दलममध्ये भरकटलेल्या तरुण–तरुणींनी मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे, या उद्देशाने शासनाने २९ ऑगस्ट २००५ पासून आत्मसर्पण योजना सुरू केली. आत्मसमर्पण केलेल्यांचे अल्पावधीत शासनाकडून होणारे पुनर्वसन, त्यांना मिळणारी रक्कम, रोजगार आदी सुविधांमुळे शासनाच्या या योजनेकडे चळवळीतील नक्षलवाद्यांचा आत्मसमर्पण करण्याचा कल वाढला आहे. गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत तब्बल १२३ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये स्टेट झोनल कमेटी सदस्य, डिव्हिजनल कमेटी सदस्य, कमांडर, उपकमांडर, दलम सदस्य, क्षेत्रीय/ग्रामरक्षक दल सदस्य, संगम सदस्य यांचा समावेश आहे. गडचिरोली येथे आत्मसमर्पित नक्षलवाद्यांसाठी शासनाने 'नवजीवन' नावाची नवीन वसाहत तयार केली असून, त्यात या नक्षलवाद्यांना त्यांच्या परिवारासह सुख समाधानाने आयुष्य घालवण्यासाठी भूखंड व त्यावर घरे तयार करण्यासाठी अनुदान दिले आहे.

● **ग्रामभेट :** या उपक्रमांतर्गत जिल्हा पातळीवर विविध गावांमध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी पोलीस दलामार्फत नियमितपणे ग्रामभेटी होत असतात. गावागावांत जाऊन नागरिकांसोबत संवाद साधणे, त्यांच्या तक्रारींची नोंद घेणे. या तक्रारी ज्या शासकीय विभागाशी संबंधित असतील, त्यांना कळवून तक्रारींची पूर्तता झाली किंवा नाही, याबाबत खात्री करण्याचे काम पोलीस करीत असतात. गेल्या तीन वर्षांत आतापर्यंत पोलिसांनी १० हजार २८४ ग्रामभेटी घेतल्या आहेत.

● **जनजागरण मेळावे :** राज्य तसेच केंद्र शासनाच्या स्तरावरील विविध योजनांचा सर्वसामान्य जनतेस लाभ मिळवून देण्यासाठी व विविध शासकीय योजनांची माहिती एकाच ठिकाणी नागरिकांना मिळावी, या उद्देशाने पोलीस विभागाच्या वतीने जनजागरण मेळाव्यांचे आयोजन नियमितपणे केले जाते. मागील तीन वर्षात असे ६१३ जनजागरण मेळावे पोलिसांनी घेतले आहेत.

शासनाच्या विविध खात्यातील अधिकारी–कर्मचारी या वेळी आपापल्या विभागाची माहिती स्थानिकांना देत असतात. यादरम्यान नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

● **महाराष्ट्र दर्शन सहल :** पोलीस विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्यावतीने आपला महाराष्ट्र सुवर्णजयंती सहल योजना (महाराष्ट्र दर्शन) २०१३ पासून राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नक्षलग्रस्त आदिवासी दुर्गम भागातील शालेय विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने व राज्याची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती याशिवाय शहरांची व तेथील जनजीवन, राहणीमान आदींची ओळख व्हावी, या उद्देशाने आतापर्यंत एकूण १५ सहली आयोजित करण्यात आल्या आहेत. यात २०१५ ते २०१७ या तीन वर्षाच्या कालावधीत एकूण ६४० मुला–मुलींनी सहभाग घेतला आहे. यात नक्षलपीडित व नक्षल कुटुंबातील सदस्य यांनासुद्धा पोलीस विभागाच्या वतीने महाराष्ट्र दर्शन घडवण्यात आले आहे.

● **गती प्रकल्प :** आदिवासी युवक–युवतींना प्रशिक्षण व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, वाहनांकरिता बँकेमार्फत तत्काळ कर्जसुविधा, चालक परवाने, चालक प्रशिक्षण आदी उपलब्ध करून दिले जाते. आतापर्यंत या प्रकल्पांतर्गत ७२ जणांना गाड्यांचे वाटप करण्यात आले आहे.

● **नवजीवन योजना :** या योजनेंतर्गत पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी, चळवळीत कार्यरत असलेल्या नक्षलवाद्यांच्या कुटुंबीयांची त्यांच्या गावात जाऊन भेट घेतात. त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या घरातील नक्षल चळवळीत गेलेल्या सदस्याला शांततेचा मार्ग स्वीकारण्यासाठी परावृत्त करण्याचे कार्य करतात. शासनाच्या आत्मसमर्पण योजनेंतर्गत मिळणारे लाभ व इतर सुविधांची माहिती देतात.

● **नक्षल विरोधी अभियान :** नक्षलवाद्यांच्या अतिरेकी कारवायांना आळा घालण्यासाठी नक्षलविरोधी अभियानाची १९९१ला स्थापना करण्यात आली आहे. हे अभियान विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या अधीनस्थ असून केंद्र आणि राज्य शासन यांच्यातील दुवा म्हणून कार्य करीत असते. या अभियानाच्या माध्यमातून गडचिरोली, गोंदियासह राज्यातील विविध भागातील नक्षल घटनांवर, तसेच शहरी भागातील आघाडीच्या संघटनांवर सातत्याने लक्ष ठेवले जाते. गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यातील नक्षलविरोधी कारवाई संदर्भात पोलीस अधीक्षकांना, तसेच विशेष कृती दल यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, तसेच राज्यातील विविध जिल्ह्यातील नक्षल सेलमधील कार्यरत पोलीस अधिकारी–कर्मचारी यांना वेळोवेळी

नक्षलविषयक कारवायांसदर्भात सूचना देणे, नक्षल विषय समजावून सांगण्यासाठी त्यांच्या कार्यशाळा आयोजित करणे, केंद्र व राज्य शासनाला वेळोवेळी नक्षलविषयक माहिती देणे आदी कार्य सातत्याने केले जाते. नक्षलविरोधी प्रशिक्षणासाठी या अभियानाच्या अधीनस्थ अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, सुराबर्डी, नागपूर आणि काऊन्टर इन्सर्जन्सी अ‍ॅण्ड अ‍ॅन्टी टेररिस्ट स्कूल, सुराबर्डी, नागपूर ही दोन प्रशिक्षण केंद्र आहेत. नक्षलविरोधी अभियान राबवण्यासाठी विशेष कृती दल आहे.

● **अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र :** नक्षलवादी, समाजकंटक, तसेच देशद्रोहींच्या चळवळींना आळा घालण्यासाठी राज्य राखीव पोलीस बल, तसेच जिल्हा पोलीस दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यासाठी २२ जून १९९२ रोजी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ नागपूर येथे अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाली. १५ ऑक्टोबर २०११ पासून सुराबर्डी, नागपूर येथे हे प्रशिक्षण केंद्र स्वतंत्ररीत्या कार्यरत आहे. या केंद्रात बेसिक प्रशिक्षण, कमांडो कोर्स, अ‍ॅडव्हान्स कमांडो, रिफ्रेशर प्रशिक्षण, कॅप्सुल कोर्स असे विविध प्रशिक्षण दिले जाते. हे केंद्र अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र म्हणून शासनाने विकसित केले आहे. या प्रशिक्षण केंद्रात पोलीस शिपाई, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उपअधिक्षक, अतिरिक्त पोलीस अधिक्षक अशा एकूण १६,१८४ विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे.



● **काऊन्टर इन्सर्जन्सी अ‍ॅण्ड अ‍ॅन्टी टेररिस्ट स्कूल :** विद्रोही आणि दहशतवादी यांच्या वाढलेल्या कारवायांना आळा घालण्याच्या उद्देशाने पोलीस अधिकारी व जवानांना प्रशिक्षण देण्यासाठी या स्कूलची स्थापना करण्यात आली.

## विशेष कृती दल

नक्षलवाद्यांच्या अतिरेकी व हिंसक कारवायांचा समूळ नायनाट करण्यासाठी ७ फेब्रुवारी २००६ अन्वये या दलाची स्थापना करण्यात आली. आंध्र प्रदेश राज्यातील ग्रे हाऊंडच्या धर्तीवर राज्यात विशेष कृती दल निर्माण करण्यात आले आहे. गडचिरोली व गोंदिया या जिल्ह्यात सी ६० दलासोबत अत्याधुनिक शस्त्राद्वारे नक्षलविरोधी कारवाई करणे, गुप्त वार्तांवर आधारित अभियान राबवणे आदी कार्य केले जाते. जंगल युद्धनीतीचे प्रशिक्षणप्राप्त तरुण अधिकारी व कर्मचाऱ्यांचा या दलात सहभाग आहे.

**प्रभारी सहायक संचालक, विशेष माहिती व जनसंपर्क कक्ष,**
**विशेष पोलिस महानिरीक्षक कार्यालय, नक्षलविरोधी अभियान, नागपूर**

## गावबंदी योजना

नक्षलवाद्यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीमुळे गडचिरोली जिल्ह्यातील विकासकामांच्या गतीवर परिणाम झाला आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत नक्षलवादी सामान्य नागरिकांना शस्त्राचा धाक दाखवून शासकीय विकास कामांना विरोध करण्यास भाग पाडत होते. यावर उपाय म्हणून २००३ पासून शासनाकडून नक्षल गावबंदी योजना सुरू करण्यात आली. ही योजना अमलात आल्यामुळे नक्षलवाद्यांकडून विविध गावांमध्ये होणाऱ्या नुकसानीच्या घटनांची माहिती शासनाला प्राप्त झाली.

नक्षलवाद्यांच्या नकारात्मक भूमिकेमुळे जिल्ह्यातील विविध गावांच्या विकास कामात होणारा अडथळा, वारंवार नक्षलबंद ठेवणे आणि विकास कामे होऊ न देणे या प्रकारांना प्रकारांना कंटाळून २००३ मध्ये कोरची तालुक्यातील ३० गावांतील नागरिकांनी एकत्र येऊन नक्षल गावबंदी ठराव मंजूर केला होता. त्यात



नक्षलवाद्यांना गावात येऊ देणार नाही, त्यांना कोणत्याही प्रकारची मदत करणार नाही, नक्षल सभेत जाणार नाही, गावातील मुलामुलींना दलामध्ये जाऊ देणार नाही, गावात नक्षल संघटना स्थापन होऊ देणार नाही, शासनाच्या प्रत्येक विकास कामात सर्व गावकरी मदत करणार, नक्षलवाद्यांच्या हिंसक कृत्यांना संघटितपणे प्रतिकार करणार या ठरावांचा समावेश आहे.

जनतेने नक्षलवाद्यांच्या दहशतीला झुगारून शासनावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल, संबंधित गावाला प्रोत्साहन म्हणून; शासनाच्या वतीने ३ लक्ष रूपये देण्यात येतात. गेल्या तीन वर्षात ३४७ गावांनी नक्षल्यांना गावबंदी केली आहे.



**महाराष्ट्राच्या राजधानीला, विळखा घालू पाहणाऱ्या गुन्ह्यांपासून आणि गुन्हेगारांपासून मुंबई पोलिसांनी समर्थरीत्या वाचवले आहे. त्यांचे सामर्थ्य निर्विवाद आहे.**




# निर्विवाद समर्थ मुंबई पोलीस

**निखिल दीक्षित, विजय सामंत**



मुंबईच्या पोलिसांची तुलना जगातल्या काही अत्यंत मान्यवर अशा पोलीसदलांशी होत असते, त्याचे कारण गेल्या अनेक वर्षांपासून या दलाने केलेला गुन्हेगारी जगताचा पाठपुरावा आणि कौशल्यपूर्ण तपास हे आहे. रस्त्यावर तासन्‌तास गस्त घालत कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्या पोलीस कॉन्स्टेबलपासून पोलीसदलाला मार्गदर्शन करणाऱ्या व दिशा देणाऱ्या पोलीस आयुक्तांपर्यंत सर्वजण या श्रेयाचे मानकरी आहेत.

पण मुंबई पोलिसांचे खरे वैशिष्ट्य आहे ते हे की, भारताच्या या आर्थिक राजधानीला विळखा घालू पाहणाऱ्या गुन्ह्यांपासून आणि गुन्हेगारांपासून त्यांनी मुंबईला सदैव वाचवले आहे आणि मुंबई शहरावर आपले निर्विवाद वर्चस्व राखले आहे.

१९५० आणि ६० च्या दशकात मुंबईत हातभट्टीवाल्यांचा खूपच उपद्रव झाला होता; पण मुंबई पोलिसांनी कठोरपणे या हातभट्टीवाल्यांचा बीमोड केला. मुंबई पोलिसांचा ससेमिरा इतका जबरदस्त होता की, शेवटी हातभट्टीवाल्यांना मुंबई सोडून बाहेर जावे लागले.

त्यानंतर १९७० आणि ८० च्या दशकात मुंबईत परदेशी मालाच्या तस्करांचा सुळसुळाट झाला होता. हाजी मस्तान आणि वरदराज मुदलियार हे टोळीवाले या तस्करीच्या गुन्ह्यांचे सूत्रधार होते. त्यांचा उपद्रव असह्य झाल्यानंतर मुंबईच्या पोलिसांनी धडक मोहिमा काढून या तस्करी टोळ्यांना नेस्तनाबूत करून टाकले.

त्यानंतर मात्र मुंबई पोलिसांसमोर आजवरचे सर्वात मोठे आव्हान उभे राहिले. मुंबईत अंडरवर्ल्ड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या टोळ्यांचा मोठा उपद्रव सुरू झाला. पोलिसांसमोरचे हे आव्हान सर्वात मोठे



एवढ्याचसाठी म्हणायचे की, या आधी हातभट्टी व तस्करांच्या टोळ्यांचा सामान्य माणसाला फारसा उपद्रव होत नव्हता. तो फक्त कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न होता; पण अंडरवर्ल्डने सामान्य नागरिकांच्या सुरक्षेलाच धोका निर्माण केला होता. त्यांचे गुन्हे भर रस्त्यावर व दिवसाढवळ्या होत असत. त्यामुळे सामान्य नागरिकांत दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. हे गुन्हेगार सार्वजनिक ठिकाणी गोळीबार करून दिवसाढवळ्या प्रतिस्पर्धी टोळ्यांतील लोकांचे खून पाडीत. शिवाय व्यापारी, बिल्डर यांच्याकडून खंडणी वसूल करीत व ती न दिल्यास त्यांचे अपहरण व खून करीत. या गुन्हेगारी जगताचे मुंबईवर गुन्हेगारी टोळ्यांमार्फत राज्यच चालू होते; पण मुंबईच्या शूर पोलिसांनी या अंडरवर्ल्डचा आणि त्यांच्या टोळ्यांचा कठोरपणे बीमोड केवळ दोन दशकात केला.

त्यानंतर १९९० आणि २०००च्या दशकात मुंबई पोलिसांसमोर एक जगावेगळेच आव्हान उभे राहिले. हे आव्हान म्हणजे दहशतवाद. मुंबईत बॉम्बस्फोटांच्या मालिकाच सुरू झाल्या व त्यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांचे जीवन जोखीमपूर्ण झाले. दहशतवादी कुठे व केव्हा बॉम्बस्फोट घडवून आणतील याचा काहीच भरवसा राहिला नाही.

मुंबई शहरात बॉम्बस्फोटांची पहिली मालिका झाली ती १९९३ साली. त्यामुळे केवळ मुंबई शहरच नाही तर संपूर्ण देशच हादरून गेला. नंतर २००६ साली मुंबईची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकल रेल्वेगाड्यांमध्ये बॉम्बस्फोट झाले. त्यामुळे मुंबईचे जीवनच विस्कळीत होते की काय अशी भीती निर्माण झाली.

त्यानंतर २००८ साली पाकिस्तानातून मुंबईत समुद्रमार्गाने आलेल्या दहशतवाद्यांचा आत्मघाती हल्ला झाला. जगातला हा अशा प्रकारचा पहिलाच हल्ला होता. अशा या हल्ल्याला तोंड देण्याचा मुंबई पोलिसांना अनुभवही नव्हता आणि तशी तयारीही नव्हती. या हल्ल्यात प्रथमच मुंबई पोलिसांचे अत्यंत वरिष्ठ असे पोलीस अधिकारी मारले गेले. अजमल कसाब या दहशतवाद्याशी लढताना पोलीस कॉन्स्टेबल तुकाराम ओंबळे यांना प्राणार्पण करावे लागले. त्यांनी प्राण गमावले पण या एकमेव दहशतवाद्याला जिवंत पकडले. त्यामुळेच या हल्ल्यामागचा पाकिस्तानचा हात सिद्ध होऊ शकला. आत्मघाती दहशतवादी कधीच जिवंतपणे हाती लागत नाहीत, पण कॉन्स्टेबल ओंबळे यांनी जगात पहिल्यांदाच आत्मघाती दहशतवादी जिवंत पकडून दाखवला होता.

आता गेल्या दशकापासून मुंबई पोलिसांपुढे सायबर गुन्ह्यांचे नवे आव्हान उभे राहिले आहे. इंटरनेटचा मोठ्या प्रमाणात वापर आणि अज्ञात राहून करता येणारा गुन्हा, यामुळे मुंबई पोलिसांपुढचे आव्हान खूप गंभीर व अवघड आहे. पण मुंबई व महाराष्ट्राचे पोलीस या आव्हानाला पुरून उरतील यात काही शंका नाही.

## स्थानिक पोलीस ठाणी

मुंबईत शहरात एकंदर ९४ पोलीस ठाणी आहेत. येत्या काळात आणखी १०० पोलीस ठाणी स्थापन करण्याचे पोलीस खात्याचे उद्दिष्ट आहे. या पोलीस ठाण्याच्या दैनंदिन कारभारावर सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांचे नियंत्रण असते. या पोलीस ठाण्यांची विभागणी पाच भागात केली आहे. ते असे: दक्षिण, मध्य, पश्चिम, उत्तर पूर्व आणि पूर्व. प्रत्येक विभागाच्या प्रमुखपदी अतिरिक्त पोलीस आयुक्त (ॲडिशनल सीपी) दर्जाचा अधिकारी आहे. ॲडिशनल सीपी यांच्यावर जॉईंट सीपी हे अधिकारी असतात. हे सर्व विभाग झोनमध्ये विभागलेले आहेत व त्यावर पोलीस उपायुक्त (डीसीपी) नेमलेले आहेत. डीसीपी हे अतिरिक्त पोलीस आयुक्तांच्या (ॲडिशनल सीपी) हाताखाली काम करतात. प्रत्येक झोन हा डिव्हिजनमध्ये विभागलेला आहे व त्यावर सहायक पोलीस आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. प्रत्येक सहायक पोलीस आयुक्ताकडे २-३ पोलीस ठाण्यांचा कारभार असतो. प्रत्येक पोलीस ठाण्याचा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहायक पोलीस आयुक्ताच्या हातखाली असतो. पोलीस ठाणी त्यांच्या अखत्यारीतील विभागाच्या कायदा व सुव्यस्थेला जबाबदार असतात. सामान्य जनतेसाठी पोलीस ठाणे हाच पोलिसांचा चेहरा असतो कारण तो आपली तक्रार



घेऊन प्रथम तेथेच जातो. कोणताही गुन्हा घडल्यानंतर त्याची सर्वात प्रथम नोंद पोलीस ठाण्यात होते व तेथूनच प्रथम गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात होते.

### स्पेशल ब्रांच

हा मुंबई पोलीस दलाचा अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. याला पोलीस दलाचे नाक, कान व डोळे समजले जाते कारण सर्व गुप्त माहिती मिळविण्याचे काम या विभागाकडे असते. याच विभागाकडून पासपोर्टसाठी प्रमाणपत्र मिळवावे लागते, तसेच चारित्र्य आणि अन्य प्रमाणपत्रे हाच विभाग देतो.

## श्वानपथक

मुंबई पोलिसांचे श्वानपथक हे देशातील सर्वोत्कृष्ट श्वान पथक समजले जाते. ज़ंजीर नावाच्या लॅब्रॉडर रिट्रायव्हर श्वानामुळे हे पथक विशेष प्रसिद्धीस आले. १९९३ साली मुंबईत बॉम्बस्फोट झाले तेव्हा जंजीर हा श्वानपथकातले सर्वात तरुण श्वान होते. स्फोटके शोधण्याचे अद्वितीय कौशल्य ज़ंजीरकडे होते. त्याच्यामुळे किमान तीन मोठे बॉम्बस्फोट नंतरच्या काळात टाळता आले. ज़ंजीरने ११ लष्करी बॉम्ब, ५७ गावठी बॉम्ब, १७५ पेट्रोल बॉम्ब, ६०० स्फोटके आपल्या तीव्र घ्राणेंद्रियांच्या साहाय्याने शोधून काढली. २००० साली त्याचा मृत्यू झाला तेव्हा त्याचा अंत्यविधी सरकारी इतमामात पार पाडण्यात आला. २६/११ स्फोटाच्या काळात श्वान पथकातल्या अन्य श्वानांनीही स्फोटके शोधण्याची कामगिरी पार पाडली होती. त्यामुळे शहराची मोठी हानी टळली होती.




### क्राइम ब्रांच

मुंबई पोलीस दलाचा हा सर्वाधिक चर्चेत असलेला विभाग आहे, कारण सर्व गंभीर गुन्हे, गँगवॉर, अंडरवर्ल्ड यांचा तपास याच विभागाकडून केला जातो. या विभागाने अल्पावधीत मुंबईच्या अंडरवर्ल्डचे कंबरडे मोडण्याचा लौकिक मिळवला आहे. मुंबईतल्या अनेक गाजलेल्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास या विभागाच्या नावावर आहे.

### आर्थिक गुन्हे विभाग

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, त्यामुळे येथे अनेक आर्थिक घोटाळे अथवा आर्थिक गुन्हे घडत असतात, हे लक्षात घेऊन हा विभाग स्थापण्यात आला आहे. पूर्वी हा विभाग क्राइम ब्रांचचाच भाग होता पण नंतर आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण व गांभीर्य वाढू लागल्यानंतर त्याला स्वतंत्र स्थान देऊन त्यावर जॉईंट कमिशनर दर्जाचा अधिकारी नेमण्यात आला. तीन कोटींपेक्षा अधिक रकमेच्या घोटाळ्यांचा तपास या विभागाकडून केला जातो. सध्या ऑनलाईन आर्थिक घोटाळ्यांचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे या विभागाचा स्वतंत्र सायबर सेल आहे.

### सायबर सेल

मुंबई पोलीस दलातला हा सर्वात नवा विभाग आहे. सध्या जगभर ऑनलाइन व्यवहार सुरू झाले आहेत, त्यामुळे ऑनलाइन आर्थिक व इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. इंटरनेटचा वापर करून धमक्या देणे, स्त्रियांची छेड काढणे आदी प्रकार सुरू झाले आहेत. अशा प्रकारे घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास लावणे हे अवघड काम असते व त्यासाठी विशेष अशा तांत्रिक क्षमतेची व ज्ञानाची गरज असते. त्यामुळे मुंबई पोलीसने खास सायबर पोलीस ठाणे वांद्रे कुर्ला परिसरात उघडले आहे. सायबर सेलचे दोन विभाग आहेत. एक ऑनलाइन आर्थिक गुन्हे विभाग– जो आर्थिक गुन्हे विभागांतर्गत काम करतो तर दुसरा इंटरनेटवरून होणाऱ्या गुन्ह्यांचा तपास विभाग– जो सायबर पोलीस ठाण्यांतर्गत काम करतो. सायबर सेलच्या प्रमुखपदी पोलीस उपायुक्त दर्जाचा अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे.

### वाहतूक पोलीस

वाहतूक विभाग हा सर्वाधिक लोकप्रिय विभाग म्हणावा लागेल, कारण सामान्य माणसांचा या विभागाशी सतत व रोज संपर्क येत असतो. मुंबईसारख्या महानगरात दररोजची वाहतूक सांभाळणे व नियंत्रित करणे हे फार अवघड काम आहे. शहरातील अनेक मोठे

रस्ते व त्यावरील अफाट वाहतूक यांचे नियंत्रण करण्यासाठी कार्यक्षम वाहतूक व्यवस्थापनाची गरज आहे, हे लक्षात घेऊन हा विभाग स्थापन करण्यात आला आहे. हा मुंबई पोलिसांचा एक कार्यक्षम विभाग समजला जातो. या विभागात ४००० कर्मचारी आहेत. दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांना आवर घालणे हे या विभागापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यासाठी या विभागाने एक मोठी मोहीम हाती घेऊन ती यशस्वी केली आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी मद्यपान करून वाहन चालवत अपघात होण्याचे प्रमाण बरेच खाली आले आहे.

### प्रशासकीय विभाग

पोलिसांना वेतन देणे, त्यांची घराची समस्या सोडवणे, पोलीस ठाण्यांची देखभाल करणे व अन्य प्रशासकीय बाबी या विभागांतर्गत येतात. या विभागावर जॉईंट कमिशनर दर्जाचा अधिकारी आहे.

### अमली पदार्थ विरोधी विभाग

उप पोलीस आयुक्तांच्या अधिकाराखालील हा विभाग अमली पदार्थांची वाहतूक थांबवणे तसेच अमली पदार्थांचा व्यापार व वापर याला आळा घालण्यासाठी काम करतो. अमली पदार्थांचा व्यापार हा जगभर होणारा गुन्हा आहे. त्यामुळे या विभागाला लक्षपूर्वक काम करावे लागते व त्यात हा विभाग खूप यशस्वी ठरला आहे.

### सशस्त्र विभाग

या विभागाकडे पोलिसांची सर्व शस्त्रे, रायफली व दारूगोळ्याचा साठा असतो. या विभागाचा प्रमुख अतिरिक्त पोलीस आयुक्त दर्जाचा अधिकारी असून, पोलीस ठाण्यांनतर याच विभागाकडे सर्वाधिक मनुष्यबळ आहे. या विभागातील पोलिसांना शस्त्रे हाताळावी लागतात व नेमबाजीचा सतत सरावही करावा लागतो. या विभागातल्या प्रत्येक कर्मचाऱ्यास त्याच्या अधिकारपदानुसार ठराविक संख्येत काडतुसे मिळतात. त्याचा त्यांना नेमबाजीच्या सरावासाठी वापर करावा लागतो. तसेच या काडतुसांचा हिशेबही ठेवावा लागतो.

### गुन्हे पद्धतीची नोंद ठेवणारा विभाग

पोलिसांकडे नोंदवण्यात आलेल्या सर्व गुन्ह्यांच्या कार्यपद्धतीची नोंद ठेवणे हे या विभागाचे काम आहे. पाकीटमारीपासून खुनापर्यंतचे सर्व गुन्हे कसे व कोणत्या पद्धतीने घडले याच्या नोंदी हा विभाग ठेवतो. यामुळे कोणताही नवा गुन्हा घडला की, त्याचे पूर्वीच्या कोणत्या पद्धतीशी साम्य आहे का, हे ताडून पाहिले जाते व तसे साम्य आढळले तर नेमक्या कोणत्या गुन्हेगाराने अथवा टोळीने हा गुन्हा केला असावा याचा तर्क बांधता येतो. त्यामुळे गुन्हेगार पकडण्याचे काम सोपे होते. अशा प्रकारचा हा देशातला एकमेव विभाग असावा. मुंबई पोलिसातला हा सर्वात जुना विभाग आहे व त्याच्याकडे १९५० सालापासूनच्या नोंदी आहेत.

### हरवलेल्या व्यक्ती विभाग

हरवलेल्या सर्व लोकांच्या नोंदी या विभागाकडे असतात. मुंबई हे अफाट मोठे शहर आहे, जगभरातून येथे लोक येत असतात. त्यातले काही रस्ता चुकतात व हरवतात, काही लोक घर सोडून येथे पळून येतात, काही पळवले जातात, काही अपघातात सापडतात व त्यांची ओळख न पटल्याने ते बेपत्ता ठरतात. अशा सर्व लोकांच्या नोंदी या विभागाकडे असतात. आता या नोंदी ऑनलाइन उपलब्ध आहेत, त्यामुळे कुणीही या नोंदी पाहून आपल्या ओळखीच्या बेपत्ता व्यक्तीची माहिती मिळवू शकतो.

### शीघ्र प्रतिसाद विभाग (Quick Response Team)

हे मुंबई पोलिसांचे कमांडो दल आहे. अत्यंत सुदृढ व कणखर पोलिसांची निवड करून त्यांना दहशतवाद्यांविरुद्ध लढण्याचे जागतिक दर्जाचे प्रशिक्षण दिले जाते. २६ नोव्हेंबर २००८ साली मुंबईवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर हे पथक स्थापण्याची आवश्यकता निर्माण झाली.



### व्यक्तिगत सुरक्षा व संरक्षण

हा विभाग शहरातली महत्त्वाची ठिकाणे व महत्त्वाच्या व्यक्ती यांना सुरक्षा व संरक्षण पुरवतो. अतिरिक्त पोलीस आयुक्त दर्जाचा अधिकारी या विभागाचा प्रमुख आहे. ज्या लोकांना आपल्या जीवास धोका आहे, असे वाटते त्यांनाही हा विभाग सुरक्षा पुरवतो. शहरातील संवेदनशील ठिकाणे, परदेशी दूतावास यांनाही हा विभाग सुरक्षा पुरवतो. शहरात अतिमहत्त्वाच्या व्यक्ती आल्या तर त्यांना सुरक्षा पुरवण्याची जबाबदारी या विभागाची असते.

सुधाकर खजे


केंद्र व राज्य सरकारच्या योजनांमुळे नागपूर शहराचा विकास झपाट्याने होत आहे. परराज्यातून कामाच्या शोधात नागपूर येथे स्थायिक होणाऱ्या नागरिकांचे प्रमाण भरपूर आहे. त्यामुळे शहराची ओळख बहुभाषिक व बहुसांस्कृतिक झाली आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबर वाढती गुन्हेगारी हे पोलिसांसमोरील मोठे आव्हान होते. या आव्हानाचा नागपूर शहर पोलीस अतिशय प्रभावीपणे सामना करत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दल विश्वासाची भावना निर्माण झाली आहे.

# विश्वास वाढला...

## प्रगतिपत्र

### नागपूर शहर पोलीस २०१७

| विषय | २०१४ गुण | २०१७ गुण | बदल |
|---|---|---|---|
| जागरूकता | ३३% | ४५% | ३६% वाढ |
| पोलिसांना पाठिंबा देण्याची तयारी | ३४% | ६३% | ८५% वाढ |
| संपर्क क्षमता | २४% | ५०% | १०८% वाढ |
| कार्यात्मक परिणामकारकता | २०% | ४७% | १३५% वाढ |
| पोलिसांची वागणूक | १७% | ४२% | १४७% वाढ |
| पोलिसांची जनसामान्यातील प्रतिमा | १९% | ४९% | १५७% वाढ |



**काही वर्षापूर्वी नागपूर शहरात वाढलेल्या गुन्हेगारीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. नागरिकांच्या मनात पोलिसांच्या कार्यशैलीबाबत अविश्वासाची भावना निर्माण झाली होती. त्यामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवणे, कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करणे आणि नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वासाची भावना तयार करणे; हे सर्वात मोठे आव्हान होते. हे आव्हान स्वीकारून धडक मोहिमा व बेसिक पोलिसिंगच्या माध्यमातून गुन्हेगारीचे कंबरडे मोडण्यात आले. कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करून, शहरातील वातावरण भयमुक्त करण्यात आले. त्यामुळे नागरिकांच्या मनात पोलिसांबद्दल विश्वासाची भावना निर्माण झाली.**

### प्रभावी कार्याचा ठसा

नागपूर शहर पोलिसांच्या प्रभावी कार्याचा ठसा विविध संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून दिसून आला आहे. व्यवस्थापन क्षेत्रातील नामांकीत 'तिरपुडे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एज्युकेशन' या महाविद्यालयातील तज्ज्ञांनी व विद्यार्थ्यांनी शहरातील सर्व स्तरातील नागरिकांमध्ये जाऊन 'नागपूर शहरातील प्रभावी पोलीस प्रशासनाबद्दलच्या अपेक्षा आणि आकलनाबाबतचे सर्वेक्षण' केले. नागपूर शहर पोलिसांनी मागील तीन वर्षात केलेल्या परिश्रमाचे यश अशा विविध सर्वेक्षणातून समोर आले आहे.

### नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती

नागपूर शहरामध्ये २०१४ पूर्वी २३ पोलीस ठाणी कार्यरत होती. वाढलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मागील तीन वर्षात ७ नवीन पोलीस ठाणी निर्माण करण्यात आली.

### स्मार्ट पोलीस ठाणे

शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे रूपांतर स्मार्ट पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आले आहे. कोणत्याही कार्पोरेट ऑफिसपेक्षा या पोलीस ठाण्यांच्या इमारतीचा दर्जा उच्च आहे. अत्याधुनिक संनियंत्रण करणारे नियंत्रण कक्ष उभारण्यात येणार आहेत. २००० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे शहरात लावण्यात येणार आहे.

### बेसिक पोलिसिंगवर भर

शहर पोलिसांनी बेसिक पोलिसिंगवर भर देऊन बिट सिस्टीम पुनर्जीवित केली. प्रत्येक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करून बिटमध्ये घडणाऱ्या गुन्ह्यांवर व गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवले. सर्व बिटमध्ये पोलीस चौक्या निर्माण करून बिट मीटिंगच्या माध्यमातून जनमानसात पोलिसांबद्दल विश्वास निर्माण करण्यात आला. सराईत गुन्हेगारावर नजर ठेवून गुन्हेगारी कमी केली.

### भूमाफियाविरुद्ध कार्यवाही

भूमाफियाविरुद्ध कार्यवाहीची मोहीम शहरात राबवण्यात आली. त्या अनुषंगाने पहिल्यांदाच एसआयटीची स्थापना केली. एसआयटीकडे २००० पेक्षा जास्त तक्रारी प्राप्त झाल्या. तक्रारींचा तपास करून १५०० पेक्षा अधिक तक्रारदारांना त्यांचे भूखंड भूमाफियांच्या तावडीतून परत मिळवून देण्यात एसआयटीने मदत केली आहे.

### सुरळीत वाहतूक व्यवस्था

शहरातील वाहतूक सुधारण्यासाठी वाहतूक नियमांची शिस्त

लावली. सध्या ९०% दुचाकीस्वार हेल्मेट वापरतात. शून्य गुंतवणुकीचा ई–चालान प्रकल्प सुरू केला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांचे फोटो स्मार्ट फोनद्वारे काढून ई–चालन पोस्टामार्फत संबंधिताच्या घरी पाठवण्यात येतात. नागरिकांना चालन भरण्याची सुविधा पोस्ट आणि बँकेच्या शाखेत केली आहे. शहरातील अतिक्रमणे हटवून रस्ते स्वच्छ केले. नागरिकांकडून सुचना प्राप्त करण्यासाठी एन–ट्रॅक्स या ट्रॅफिक क्लबमार्फत २००० नागरिक व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून वाहतूक विभागाशी जोडले असून, त्यांच्या प्राप्त सूचनांनुसार ७०० पेक्षा जास्त वाहतुकीचे प्रश्न सोडवण्यात आले. अखिल भारतीय स्तरावर मारुती सुझुकी या संस्थेने केलेल्या २०१७ च्या सर्वेक्षणातून भारतामध्ये सर्वात जास्त नागपूर शहरातील ९०% वाहनचालक सिटबेल्ट वापर असल्याचे सर्वेक्षणात नमूद केले आहे.

## सायबर तक्रार निवारण केंद्र

सायबर संबंधित गुन्हे स्वतंत्रपणे हाताळण्यासाठी सायबर तक्रार कक्षाची निर्मिती केली. यामार्फत विविध सायबर गुन्हे उघडकीस आणून फसवणूक झालेल्या ७६ तक्रारदारांचे १५,९८,८३३ रुपये परत मिळवून दिले.

## एन–कॉप्स एक्सलेन्स सेंटर

कार्यरत पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी नागपूर सेंटर ऑफ पोलीस सर्व्हिस एक्सलेन्सची स्थापना करण्यात आली. आतापर्यंत ५५०० पोलिसांना व कोराडी पॉवर प्लॉटच्या ७०० सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले.

## बडी–कॉप्स

नागपूर शहरातील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या मुलींना सुरक्षा प्रदान करण्यासाठी बडी कॉप्स उपक्रम राबवण्यात येत आहे. शहरातील १२२ वसतिगृहांतील ८००० पेक्षा जास्त तरुणी व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून बडी कॉप्ससोबत (महिला पोलिसांशी) जुळल्या आहेत.

## अमली पदार्थ मुक्ती

'ड्रग फ्री' नागपूर ही मोहीम राबवण्यात येत आहे. यामार्फत अंमली पदार्थ तस्करांवर कठोर कार्यवाही करून आतापर्यंत १.२० कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

**आपले पोलीस, आपली अस्मिता**

## भिक्षेकरी मुक्ती

शहरात भीक्षा मागणाऱ्या बालकांविरुद्ध मोहीम राबवून मानवी तस्करांचे जाळे उद्ध्वस्त करण्यात आले. पीडित बालकांचे शाळेमध्ये पुनर्वसन करण्यात आले. हजारो बालकांना नागपूर शहर पोलिसांनी पुनर्वसित केले आहे.

## शहर पोलीस आयुक्तालयाचे उपक्रम

■ पोलीस मॅरेथॉन स्पर्धाचे आयोजन, ६००० पेक्षा जास्त स्पर्धक सहभागी. ■ टेक एक्स्पो तंत्रज्ञान विषयक मेळावा, ८००० पेक्षा जास्त नागरिकांनी भेट दिली. ■ पोलीस पथनाट्य महाकरंडक, १९०० विद्यार्थी, ८२ महाविद्यालय सहभागी. ■ अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या धरतीवर, नागपूर शहर पोलीस कर्तव्य मेळाव्याचे आयोजन. ■ राज्यस्तरीय सायबर क्राईम परिषद, आंतरराज्यीय गुन्हे परिषद, राष्ट्रीय अमली पदार्थविरोधी परिषद.

## कल्याणकारी उपक्रम

■ पोलीस पाल्यांसाठी अद्ययावत व वातानुकूलित ४०० आसन क्षमता असलेल्या मोफत अध्ययन कक्षाची निर्मिती. ■ सर्व सुविधा मोफत असणाऱ्या अद्ययावत पॉलिक्लिनीकची स्थापना. ■ पोलीस कॅन्टीनमार्फत धान्य व किराणा स्वस्त दरात उपलब्ध, दुचाकी/चारचाकी वाहने व घरे स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यात आले. ■ १६०० पेक्षा जास्त पोलीस निवासस्थानाची निर्मिती अंतिम टप्प्यात. ■ पोलीस पाल्यांसाठी अद्ययावत पाळणाघर.

नागपूर शहराची कायदा व सुव्यवस्था सुधारण्यामध्ये योगदान देणाऱ्या पोलिसांचे मुख्यमंत्र्यांनी प्रशस्तिपत्र देऊन अभिनंदन केले आहे. पोलीस व्यवस्थेत शहराची ओळख 'प्राईड कॅपिटल ऑफ महाराष्ट्र', अशी झाली आहे.

**पोलीस उपनिरीक्षक, जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, नागपूर**

## भरोसा सेल

समाजातील अत्याचारग्रस्त व संवेदनशील घटक महिला व ज्येष्ठ नागरिकांना मानसिक बळ देऊन, अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी एका छताखाली पोलीस मदत, संरक्षण अधिकारी, कायदेशीर सल्ला, व्यसनमुक्ती समुपदेशन, वैद्यकीय सेवा, लैंगिक समुपदेशन व पुनर्वसन इत्यादी सेवा 'भरोसा सेल'च्या माध्यमातून देण्यात येतात. चार दामिनी पथकांमार्फत शहरातील शाळा कॉलेज बागबगिचे इत्यादी ठिकाणी प्रभावी गस्त करून, शहर भयमुक्त केले. दामिनी पथकाने या वर्षात आतापर्यंत ३२५८ टवाळखोरांवर कार्यवाही केली आहे. जानेवारी २०१७ पासून नोव्हेंबर २०१७ पर्यंत भरोसा सेल येथे एकूण २०९० प्रकरणे दाखल झाली त्यापैकी १४२२ प्रकरणांमध्ये समझोता घडवण्यात आला.





**पुणे शहरातील कायदा व सुव्यवस्था उत्तम राहण्यासाठी आणि नागरिकांना तत्काळ सुरक्षा उपलब्ध करून देण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यामध्ये बडीकॉप, पोलीस काका, सिटी सेफ, ज्येष्ठ नागरिक सुरक्षा समिती, महिला बीट मार्शल, सॅपिअन्स ॲप यांचा समावेश आहे.**

# बडी कॉप आणि पोलीस काका

**राधिका फडके**

पुणे शहरातील शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करून संकटकाळात प्रभावी प्रतिसाद देण्याकरिता 'पोलीस काका' हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

पुणे शहरामध्ये सुमारे ११८० शाळा व महाविद्यालये आहेत. त्यामध्ये दहा लाखपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. बऱ्याचदा त्यांना छेडछाड, दादागीरी, रॅगिंग अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. कधी-कधी शाळा कॉलेज परिसरात अंमली पदार्थांची विक्री केली जाते. स्मार्ट फोन व इंटरनेटच्या वाढत्या वापरासोबत विद्यार्थ्यांना काही वेळा सायबर क्राईमचा सामना करावा लागतो अशा प्रसंगामध्ये विद्यार्थी-विद्यार्थीनींना पोलिसांची तत्काळ मदत मिळावी म्हणून पोलीस काका हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमाचे घोषवाक्य 'विद्यार्थ्यांनो भिऊ नका पाठीशी आहेत पोलीस काका' हे आहे. सुरक्षित पुणे बनवण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे.

'पोलीस काका' म्हणून प्रत्येक शाळेकरिता एक वरिष्ठ पोलीस कर्मचारी नेमून देण्यात येईल. त्यांचा मोबाइल क्रमांक व छायाचित्र शाळेच्या दर्शनी भगात लावण्यात येईल. प्रत्येक शाळेमध्ये पोलीस काका व विद्यार्थी यांची ओळख करून देण्यात येईल. 'पोलीस काकांची' कोणत्या परिस्थितीत कशाप्रकारे मदत मिळवायची याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. आतापर्यंत सुमारे १९५ पोलीस कर्मचारी यांची 'पोलीस काका'करिता निवड करण्यात आली आहे.

कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी विद्यार्थ्यांचा फोन आल्यास पोलीस काका त्यास मार्गदर्शन व मदत करतील. आवश्यकता असल्यास व्यक्तीश: अगर बिट मार्शल किंवा पोलीस स्टाफसह मदतीस धावून जातील. वेळोवेळी शाळा व महाविद्यालय यांना भेटी देऊन विद्यार्थ्यांशी मैत्रीपूर्ण संबध निर्माण करतील. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पोलीस काकांच्या कामाची देखरेख करण्यासाठी एक सहायक पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी नोडल ऑफिसर म्हणून कामकाज पाहील. त्यांच्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे थेट नियंत्रण राहील. शाळा किंवा महाविद्यालयाकडूनही एक शिक्षक अगर प्राध्यापक नोडल ऑफिसर म्हणून राहतील. संबंधित विभागाचे सहायक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त त्यांच्या कार्यक्षेत्रात हा उपक्रम प्रभावीरीत्या राबवून घेतील.

## बडीकॉप

आजच्या युगामध्ये महिला सक्षमीकरण झाले असले तरी महिलांचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा देऊन महिला महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. तरी देखील महिलांवरील अत्याचाराच्या बातम्या दैनंदिन जीवनामध्ये आपणास ऐकण्यास मिळतात. अशा घटना भविष्यात घडू नये म्हणून पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला यांनी पूणे पोलिसांद्वारे 'बडीकॉप' हा उपक्रम हाती घेण्याचे ठरवले. ७ फेब्रुवारी २०१७ रोजी ही संकल्पना राजीव गांधी इन्फोटेक पार्क हिंजवडी येथे आयोजित 'वॉक वुईथ सीपी' या कार्यक्रमात उदयास आली. प्रायोगिक तत्वावर परिमंडळ-३ व ४ मधील आयटी हब असलेल्या पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या २० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. आतापर्यंत 'बडी कॉप'चे ७५० व्हॉट्सॲप ग्रुप तयार केले असून यामध्ये १,९२,००० नोकरदार महिलांनी नोंदणी केली आहे. पुणे शहरात बडी कॉपच्या माध्यामातून संवाद साधण्यासाठी ३२० सुसंवाद सुत्रे आयोजित केली आहेत. या उपक्रमास फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री या संस्थेचे प्रथम

पारितोषिक पुणे शहर पोलीस दलास मिळाले आहे.

### कर्तव्य पद्धती

संकटात सापडलेल्या महिला त्यांच्यासाठी नेमून दिलेल्या 'बडीकॉप' यांना व्हॉट्सअॅप नंबर, ई-मेल किंवा फोनद्वारे संपर्क साधतात. प्राप्त होणाऱ्या संदेशाची तीव्रता लक्षात घेऊन तो संदेश एक तक्रार आहे की तातडीची मदत याचा निर्णय बडीकॉप घेतात. अतीतातडीच्या संदेशाच्या वेळी पोलीस यंत्रणा आपल्या स्टाफसह (गरज पडल्यास) बडीकॉप यांच्या मदतीला घटनास्थळी रवाना होतात. जेव्हा अतीतातडीचा संदेश असेल तेव्हा बडीकॉप हे पोलीस अधिकाऱ्यांशी संपर्क साधतील. संबंधित संकटग्रस्त महिलेस पोलीस ठाण्यात नेऊन तक्रार दाखल करण्यास मदत करतात.



### कामाचे ध्येय्य

- कामास जाणाऱ्या महिलांना सुरक्षित व निर्भय वातावरण उपलब्ध करून देणे.
- वाईट कृत्ये करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कर्तव्यावर असणाऱ्या महिलांना तक्रार दाखल करण्यास प्रोत्साहन देऊन; पोलीस यंत्रणा त्यांच्या मदतीसाठी २४ तास सेवेत आहे असे जाणवून देणे.
- कोणत्याही प्रकारचे घातपाताचे प्रकार हे भविष्यात घडू नयेत तसेच पुण्यात काम करणाऱ्या महिलांना कामाच्या ठिकाणांची विश्वासार्हता अबाधित राखणे.

## महिला बीट मार्शल



महिलांच्या सुरक्षिततेकरिता महिला बीट मार्शल यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सध्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक, महिला साहाय्य कक्ष, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचे देखरेखीखाली १ पोलीस उप निरीक्षक व ३० महिला पोलीस कर्मचारी या बीट मार्शल म्हणून कार्यरत आहेत. या बीट मार्शलला लोकसहभागातून १९ टू-व्हीलर गाड्या भेट म्हणून देण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांना रिव्हॉल्वर चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

दोन ते तीन पोलीस ठाण्याची जबाबदारी दोन महिला बीट मार्शल त्यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. अशा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाळा, कॉलेज, चेन स्नॅचिंग पॉईंट, उद्याने, तसेच गर्दीच्या ठिकाणी गस्त घालण्याबाबत त्यांना आदेश देण्यात आले आहेत.

### सिटीसेफ

महिलांविरूद्धच्या वाढत्या गुन्ह्यांची संख्या पाहता त्यावर उपाययोजना म्हणून पुणे पोलिसांच्या वतीने 'सिटीसेफ' हे मोबाइल अॅप बनवण्यात आले आहे. या अॅपमध्ये एसओएस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. बटण दाबताच संकटात असलेल्या व्यक्तीला तत्काळ मदत पोहोचवली जाते. आजूबाजूच्या घडणाऱ्या गोष्टींवर लक्ष ठेवले जाते. या अॅपकरिता इंटरनेट जोडणीची आवश्यकता नाही. नियंत्रण कक्षातील अधिकारी या अॅपच्या मदतीने संबंधित पोलीस ठाण्यास तत्काळ संपर्क करून माहिती देऊ शकतात.

### सॅपिअन्स अॅप (मॉनिटरिंग सिस्टिम)

पुणे शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभुमीवर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्यांतर्गत असणाऱ्या बीट मार्शल यांच्या गस्तीबाबत कार्यक्षमता वाढवण्यासाठी, वाढत्या गुन्हेगारीला आळा बसवण्याकामी सॅपिअन्स अॅप कार्यान्वित करण्यात आले आहे. प्रायोगिक तत्त्वावर हिंजवडी, हडपसर, येरवडा व विमानतळ या आयटी हब असलेल्या पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या अॅपच्या मदतीने पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बीट मार्शल यांना काम कधी दिले, घटनास्थळी पोहोचण्याचा वेळ, कामाची पूर्तता करण्याचा वेळ यांचे संनियंत्रण करणे सोयीचे व वेळेचा अपव्यय टाळणारे ठरणार आहे.

### ज्येष्ठ नागरिक सुरक्षा समिती

पोलीस आयुक्तालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुसह्य होण्यास मदत झाली आहे. नातेवाइकांकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांना दाद मागणे सोयीचे झाले आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी १०९० ही हेल्पलाइन २४ तास चालू करण्यात आली आहे. या कक्षामध्ये नोडल अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस ठाणे पातळीवर ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नागरिक सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे.

**महिला पोलीस निरीक्षक, सायबर क्राइम सेल, पुणे**

रेल्वेने प्रवास करणाऱ्या मुंबईकरांच्या सुरक्षिततेसाठी मुंबई लोहमार्ग पोलीस पथक परिश्रम करत असते. या पोलिसांमार्फत रेल्वे अपघातात जखमी वा मृत किंवा हरवलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांना दिलासा दिला जातो. हरवलेल्या मुलांचा शोध घेऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते.



# शोध आणि मुस्कान

**विनय गाडगीळ**

मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाची स्थापना २ ऑक्टोबर १९९९ रोजी करण्यात आली. त्यात छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते कर्जत व कसारा असा मध्य रेल्वे, तसेच सीएसएमटी ते पनवेल हार्बर रेल्वे, तसेच चर्चगेट ते डहाणू असा पश्चिम रेल्वेचा एकूण जवळपास ४७५ कि.मी. अंतराचा रेल्वे भाग या आयुक्तालय हद्दीत येतो. त्यात एकूण ६ रेल्वे टर्मिनस व १३१ रेल्वे स्टेशन आहेत. रेल्वेची सुरक्षा करण्यासाठी रेल्वे पोलीस व रेल्वे सुरक्षा बल असे दोन विभाग आहेत.

## बॉम्बस्फोट व दहशतवादी हल्ले

१९९९ ते २००६ या कालावधीत बॉम्बस्फोटाच्या एकूण २६ घटना या आयुक्तालय परिसरात घडल्या आहेत. २६ नोव्हेंबर २००८ रोजी सीएसटी रेल्वे स्थानकावर दहशतवादी हल्लासुद्धा झाला आहे. दहशतवादी हल्ले रोखण्याचे दृष्टीने रेल्वे स्थानकांच्या प्रवेशद्वारांवर सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या यंत्रणांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, जलद प्रतिसाद रेल्वे पोलीस व रेल्वे सुरक्षा बल यांचा समावेश आहे.

## नैसर्गिक आपत्ती

मुंबईमध्ये इतर भागांच्या तुलनेत अधिक पाऊस पडतो. त्यामुळे पावसाळ्यात रेल्वे वाहतूक विस्कळीत होण्याच्या घटना घडतात. अशा वेळी रेल्वेमध्ये व स्थानकांवर प्रवाशी अडकून पडतात. त्यांना इतर मार्गाने घरी पोहोचवण्याचे/पाठवण्याचे कामसुद्धा रेल्वे पोलीस; हे रेल्वे सुरक्षा बल, अग्निशमन दल, रेल्वे प्रशासन संबंधित महानगरपालिका यांच्या मदतीने करतात. २६ जुलै २००५ रोजी पडलेल्या प्रचंड पावसामुळे जवळवास सात दिवस उपनगरीय रेल्वे गाड्यांची वाहतूक विस्कळीत झाली होती. तेव्हा रेल्वे पोलिसांनी नागरिकांना दिलासा देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.



## रेल्वे स्थानकांवरील गुन्हे

रेल्वे प्रवाशांचे मोबाइल फोन, सोनसाखळ्या, मंगळसूत्र, पाकीट व इतर सामानांच्या चोरीचे गुन्हे सर्वसाधारणपणे घडतात. त्यातील आरोपीना प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, सीसीटीव्ही फूटेज, मोबाइल कॉल डेटा रेकॉर्ड्स (सीडीआर) या मदतीने अटक करून, मुद्देमाल पकडण्याचे काम रेल्वे पोलिसांकडून केले जाते. मुंबई लोहमार्ग पोलिसांचे अपराधसिद्धीचे प्रमाण ७५% ते ८०% असे उल्लेखनीय आहे.

## अपघात, जखमी व मृत्यू

मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालय परिसरात दररोज जवळपास रेल्वे अपघातात १० जणाचा मृत्यू व ११ जखमी होतात. ट्रॅक क्रॉस करणे, धावत्या रेल्वे गाडीतून पडणे, रेल्वे व फलाट यांच्या गॅपमध्ये पडणे ही रेल्वे अपघाताची कारणे आहेत. २०१७ मध्ये सर्व रेल्वे स्थानके व त्यामधील ट्रॅक यांचा अभ्यास करून सुरक्षा आढावा घेण्यात आला आहे. रेल्वे अपघातातील जखमींना तत्काळ औषधोपचार मिळावा, याकरिता रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे पोलिसांना आवश्यक ती मदत दिली जाते. जखमींना दवाख्यान्यात घेऊन जाण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या आहेत. महत्त्वाच्या स्थानकांमध्ये रेल्वे प्रशासनाने प्राथमिक वैद्यकीय केंद्रे उभारले आहेत.

## ठोस उपाययोजना

- रात्रीच्या वेळी उपनगरीय रेल्वे गाड्यांच्या महिलांच्या डब्यामध्ये सुरक्षा पुरवली जाते. यासाठी एकूण ६३० पोलीस कर्मचारी नेमण्यात आले आहेत. याशिवाय ५०० गृहरक्षक व महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या २०० कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाते.
- प्रत्येकी १० महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर किमान स्वीकृत सुरक्षा प्रमाणकानुसार सुरक्षा देण्यात येते.

- अडचणीच्या वेळेला तत्काळ पोलीस मदत मिळावी, या दृष्टीने १५१२ ही हेल्पलाइन सुरू केली आहे.
- अचानकपणे १ किंवा २ रेल्वे स्थानकांवर रेल्वे गाड्या तपासण्यासाठी Massive Flash Checking हा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला आहे.
- महिला प्रवाशांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महिला कक्ष स्थापन करण्यात आला असून दिवसा महिला राखीव डब्यात महिला पोलिसांचे निर्भया पथक नेमण्यात आले आहे.



## ऑपरेशन मुस्कान

या आयुक्तालय परिसरात २०१५, २०१६ व २०१७ मध्ये राबवण्यात आलेले ऑपरेशन मुस्कान, ऑपरेशन स्माईल, ऑपरेशन महाराष्ट्र मुस्कान राबवण्यात आले. याद्वारे हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यात आला. या मोहिमेमध्ये एकूण ४९८७ मुले व १९८१ मुली पालकांशिवाय आढळल्या. त्यापैकी ४६४ मुले व १०५ मुली बालगृहात ठेवण्यात आल्या. ४५२३ मुले व १८७६ मुलींना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

या मोहिमेमध्ये काही मुले / मुली हे महाराष्ट्राबाहेरील बिहार, उत्तरप्रदेश, मध्य प्रदेशमधील असल्याचे आढळून आले. ही मुले / मुली मुंबईचे आकर्षण म्हणून मुंबई फिरण्यासाठी, घरातील भांडण झाल्यामुळे तसेच कामासाठी गुजरात, राजस्थान, पश्चिम बंगाल, झारखंड, कर्नाटक, तामिळनाडू, छत्तीसगड, आसाम व दिल्ली येथून ही मुले/मुली आली आहेत.

## शोध

रेल्वे ही मुंबईची 'लाईफ लाइन' आहे. दररोज लाखोंच्या संख्येने प्रवाशी प्रवास करीत असतात. गंतव्यस्थानी वेळेत पोहोचण्याच्या लगबगीत प्रवाशांकडून अनेकवेळा सुरक्षा नियमांना बगल दिली जाते. त्यातून रेल्वे रुळ ओलांडणे, गर्दीने भरलेल्या लोकलच्या डब्यास बाहेरून लटकून प्रवास करणे, रेल्वे डब्यांच्या दरवाज्यात लटकून प्रवास करणे, रेल्वेच्या टपावरून प्रवास करणे अशा मार्गांचा अवलंब केला जातो. त्यामुळे अपघात होतात. दरवर्षी अपघातात मृत्यू पावणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण ३००० ते ३५०० असून जखमीचे प्रमाण ३५०० ते ४००० असे आहे. ओळख न पटणाऱ्या मयत व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. आत्महत्येसाठी सहज उपलब्ध साधन म्हणूनदेखील काही प्रकरणात रेल्वेचा वापर केला जातो. अपघातात मृत झालेली व्यक्ती जर घरातील कर्तापुरुष अथवा स्त्री असल्यास त्याच्या मृत्यूने त्यांचे संपूर्ण घर उद्ध्वस्त होते. त्यामुळे अशा मृत व्यक्तीची ओळख न पटणे किंवा त्यांचे वारस न मिळणे या बाबी रेल्वे पोलिसांकरिता चिंतेच्या झाल्या आहेत.

व्यक्ती हरवल्याच्या पार्श्वभूमीवर मृत/जखमी व्यक्तींचा शोध कुटुंबीयांकडून घेतला जातो. स्थानिक परिसरातील शोध मोहीम पूर्ण झाल्यानंतर ते रेल्वे हद्दीत शोध सुरू करतात. परंतु रेल्वेचे व्यापक क्षेत्रफळ व १७ पोलीस ठाणे यांचा विचार करता प्रत्येक पोलीस ठाण्यास भेट देऊन हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेणे जिकिरीचे बनते. हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेताना कुटुंबीयांची होणारी मानसिक परवड, शारीरिक कष्ट लक्षात घेता यास कुठलातरी पर्याय उपलब्ध होऊ शकतो काय? याचा साकल्याने विचार करून,'शोध' या संकल्पनेने जन्म घेतला.

संगणक, इंटरनेट वापरण्याचे वाढलेले प्रमाण, स्मार्ट मोबाइल फोन वापरणाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ ह्या गोष्टी लक्षात घेता 'शोध' डिजिटल स्वरूपात तयार करण्याचे निश्चित झाले. 'अन्विष्यन् लभते ' म्हणजेच 'शोधणार त्यांला सापडणार', हे ब्रीदवाक्य घेऊन शोध ही संगणकीय प्रणाली www.shodh.gov.in या पोर्टलवर सुरू करण्यात आली आहे.

शोध प्रणालीत दैनंदिन माहिती अद्ययावत स्वरूपात ठेवण्यात येते. यामध्ये इसमाचे नाव, वय, लिंग, वर्णन, गोंदण, ओळखीचे चिन्ह संक्षिप्त माहितीवरून संगणकीय माहितीसाठी (डाटाबेस)मधील मयत/जखमी/हरवलेली/मिळून आलेल्या व्यक्तींचे छायाचित्रे, माहिती तसेच मृत व्यक्तीने घटनेच्या दिवशी परिधान केलेली वस्त्रे यांचे नमुने त्वरित उपलब्ध होतात. त्यामुळे घरबसल्या किंवा या कार्यालयातून मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयातील मृत किंवा जखमी किंवा हरवलेल्या व्यक्तीची माहिती प्राप्त होते. 'शोध' या प्रणालीवर मयत व्यक्ती, जखमी व्यक्ती, हरवलेल्या व्यक्ती, मिळून आलेल्या व्यक्ती यांच्या नातेवाइकांना ऑनलाइन भरपाई मागण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या पोर्टलद्वारे मासिक, तिमाही, सहामाही, वार्षिक असे अहवाल प्राप्त करता येतात. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या या उपक्रमास महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

शोध ॥अन्विष्यन् लभते॥

**सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),**
**पोलीस आयुक्तालय, लोहमार्ग, मुंबई**

मीनल जोगळेकर

दारूच्या व्यसनामुळे व्यसनी व्यक्तीचे वैयक्तिक, कौटुंबिक तसेच सामाजिक नुकसान होत असते. अपघात, खून, भांडणे, कौटुंबिक हिंसाचार, आत्महत्या तसेच अनेक गुन्ह्यांमागे दारू हा महत्त्वाचा घटक असल्याचे दिसून येते. अवैध दारूनिर्मिती व विक्रीमुळे राज्याचे आर्थिक नुकसान तर होतेच शिवाय अनेकदा अशा अवैध दारूनिर्मिती कारखान्यांत दारूमध्ये केल्या जाणाऱ्या भेसळीमुळे अनेकांना प्राण गमवावे लागतात.

# धडक कारवाई आणि प्रतिबंध



**राज्यात अवैध दारूनिर्मिती व विक्री करणाऱ्यांवर २०१७ मध्ये पोलिसांनी वेळोवेळी केलेल्या कारवायांमध्ये नोव्हेंबर अखेरीस ९७,१४९ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामुळे गुन्हेगारीवर प्रतिबंध ठेवण्यास मदत होत आहे.**

## धडक मोहीम

अवैध दारूनिर्मिती व विक्री तसेच विनापरवाना दारू पिणे, दारू पिऊन सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणे, वाहन चालवणे हे प्रकार शिक्षेस पात्र आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी राज्याची पोलीस यंत्रणा धडक मोहिमा घेऊन कारवाई करत असते. वर्ष २०१७ मध्ये एप्रिल, जून व नोव्हेंबर या तीन महिन्यात पोलिसांनी धडक कारवाई करून नोव्हेंबर अखेर एकूण ९७, १४९ गुन्हे दाखल केले असून, त्यापैकी २०१ गुन्हे संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत दाखल करण्यात आले आहेत.

त्याशिवाय फौजदारी प्रक्रिया संहिता (क्रिमिनल प्रोसिजर कोड) क्र. १०७, १०९ व ११०, मुंबई पोलीस कायदा–५५/५७, १२२ व १२४ अन्वये तसेच मुंबई दारूबंदी कायदा–९३ (ब), राष्ट्रीय सुरक्षा कायदा, मुंबई सराईत गुन्हेगारी कायदा व एम.पी.डी.ए. (संघटीत गुन्हेगारी कायदा) अन्वये गुन्हे दाखल करण्यात येतात.

गेल्या तीन वर्षांची तुलनात्मक आकडेवारी बघितल्यास अशा प्रकरणांमध्ये दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा आकडा सातत्याने वाढताना दिसून येतो.

## व्यापक लोकचळवळ

राज्यात वर्धा, गडचिरोली व चंद्रपूर येथे दारूबंदी झाली असली तरीही या जिल्ह्यांमध्ये अवैध दारूनिर्मिती व विक्रीचे प्रमाण मोठे असल्याचे

| अ.क्र. | वर्ष | दारूबंदी कायद्यान्वये दाखल गुन्हे |
|---|---|---|
| १ | २०१४ | ६२७७३ |
| २ | २०१५ | ६५०७७ |
| ३ | २०१६ | ७१११९ |
| ४ | २०१७ नोव्हेंबर अखेरीस | ९७१४९ |

### अवैध दारूनिर्मिती व विक्री धंद्यावर केलेली धडक कारवाई

| महिना | एकूण दाखल केलेले गुन्हे | जप्त मुद्देमाल (लीटरमध्ये) | नाश केलेला मुद्देमाल (लीटरमध्ये) | जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत | नाश केलेल्या मुद्देमालाची किंमत | आरोपी अटक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल, २०१७ | १२५९८ | ३०३९०४५ | ७९८९५१.१ | १०१२८०१११ | ४३४९७९८२ | ९८८९ |
| जून, २०१७ | १००४० | ५१४०५९.००९ | ३७९०३३.३३९ | ७०२८५४८५.३६ | २७५९७६८९.७५ | ५८०२ |
| नोव्हेंबर, २०१७ | ११३६७ | ११२९१६८.५९ | ८२६७७६.३०८ | ७३७४११४५.६१ | २७८३४६५४.४८ | ६७५९ |
| **एकूण** | **३४००५** | **४६८२२७२.६** | **२००४७६१.७४७** | **२४५३०६७४१.९७** | **९८९३०३२६.२३** | **२२४५०** |

या संपूर्ण कारवाईदरम्यान दिसून आले आहे. शासनाने दारूबंदी केली असली तरी त्याचे परिणाम खऱ्या अर्थाने दिसून येण्यासाठी व्यापक लोकचळवळीची आवश्यकता आहे.

### महत्त्वाची भूमिका

स्थानिक नागरिकांची महत्त्वाची भूमिका असून, त्यांनी अशा ठिकाणांची व व्यक्तींची खबर जवळच्या पोलीस ठाण्यात वेळीच दिल्यास; पोलीस कारवाई त्वरेने होऊ शकते. त्यासाठी त्यांना पोलिसांच्या १०० या क्रमांकावर दूरध्वनीवरून किंवा पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष तक्रार देता येते. गावातील महिलांनी एकत्र येऊन विरोध केल्यास, तसेच ग्रामसभेने साध्या बहुमताने ठराव केल्यास, दारूच्या दुकानांना गावाच्या वेशीबाहेर ढकलणे शक्य आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षकांनी एक व्हॉट्सअॅप नंबर उपलब्ध करून दिला असून त्यावर अवैध दारूधंद्याबद्दल नागरिकांना तक्रार करता येते. त्याआधारे पोलीस कारवाई होत आहे. पोलीस कारवाईद्वारे अशा प्रकारे प्रयत्न होत असताना समाजानेही व्यसनमुक्तीचा संकल्प करून; तो अमलात आणल्यास समाजातील व्यसनाधीनता व त्यामुळे होणारी गुन्हेगारी कमी व्हायला मदत होईल, एवढे नक्की.

आपले पोलीस, आपली अस्मिता

**वरिष्ठ सहायक संचलाक (प्रकाशने)**

# पोलिसांना उच्च शिक्षणाची संधी

**संतोष साबळे**

नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत असताना या प्रक्रियेत पोलीस कर्मचारी कुठेही मागे राहू नये आणि दैनंदिन जीवनात सामोरे जाव्या लागणाऱ्या सामाजिक, आर्थिक, औद्योगिकीकरण विषयात त्यांचे ज्ञान वाढावे, या उद्देशाने महाराष्ट्र पोलिसांसाठी आता नोकरीच्या जागीच पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या उच्च शिक्षणाची प्रकाशवाट खुली करून देण्यात आली आहे.

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने राज्यातील पोलिसांसाठी विशेष दूरशिक्षण शिक्षणक्रम विकसित केला असून, महाराष्ट्र पोलीस आणि मुक्त विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य कराराच्या अंतर्गत बी.ए. (पोलीस प्रशासन) हा शिक्षणक्रम पोलीस शिपायांसाठी उपलब्ध करून देण्यात आला असून, या शैक्षणिक वर्षातही यासाठी प्रवेश घेता यावा यासाठी विद्यापीठाने परवानगी दिली आहे. पोलीस शिपाई व सहायक पोलीस उपनिरीक्षकांचा अनेकदा नोकरीमुळे शिक्षणात खंड पडतो. अशा इच्छुकांना आता बी.ए. (पोलीस प्रशासन) हा शिक्षणक्रम करणे शक्य होणार आहे. विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेच्या अंतर्गत हा शिक्षणक्रम असून, शिक्षणाच्या प्रवाहापासून दुरावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना यामुळे शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.



पोलीस दलात काम करताना उपयोगी पडेल असे ज्ञान देणाऱ्या मानवी विनिमय, सामाजिक परिवर्तन व चळवळ, मानवी हक्क व मूलभूत संकल्पना, ग्राहक संरक्षण, भारतीय समाज, लोकप्रशासन आदी अभ्यासक्रमांचा या शिक्षणक्रमात समावेश करण्यात आला आहे. पोलिसांची कार्यनिपुणता आणि बुद्धिकौशल्यात वाढ करतानाच सकारात्मक बदल घडवून दल अधिकाधिक कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

या शिक्षणक्रमाची वैशिष्ट्ये म्हणजे कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत घ्याव्या लागणाऱ्या प्रशिक्षणातील पाच अभ्यासक्रमांचे श्रेय त्यांना मिळणार आहे. हा शिक्षणक्रम हवालदार, पोलीस नायक, पोलीस हवालदार यांच्यासाठी साहाय्यभूत ठरणार आहे. जिल्हा पोलीस मुख्यालय, पोलीस आयुक्तालय, बिनतारी संदेश अशा विविध विभागांत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हा शिक्षणक्रम विकसित करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पोलिसांच्या सहकार्याने माफक शुल्कात हा शिक्षणक्रम पोलीस कर्मचाऱ्यांना उपलब्ध होणार आहे. दरम्यान भविष्यात पोलीस अधिकाऱ्यांसाठी एम.बी.ए. शिक्षणक्रम तसेच पोलीसांच्या कुटुंबियासाठी काही कौशल्याधारित शिक्षणक्रम सुरू करण्याचा प्रयत्न देखील या करारांतर्गत करण्यात येणार आहे.

### राज्यभर अभ्यासकेंद्रे

महाराष्ट्रातील पोलीस आयुक्तालय, पोलीस मुख्यालय, पोलीस प्रशिक्षण केंद्रे, राज्य राखीव दल, आणि बिनतारी प्रशिक्षण केंद्र, पुणे अशा विविध ठिकाणी अभ्यासकेंद्रे सुरू करण्यात येणार आहेत.

**प्रभारी प्रमुख, जनसंपर्क विभाग, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**



# महाराष्ट्राची दुर्गाशक्ती



महाराष्ट्र पोलीस दलातील महिला पोलीस
कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी अत्यंत महत्त्वाची
भूमिका बजावत आहेत. त्यांच्या शक्तीचा आणि शौर्याचा
परिचय वेळोवेळी महाराष्ट्राला मिळाला आहे.

छायाचित्र: विरेंद्र धुरी



**प्रत्येक वाहनचालकाने रस्त्यावर दक्ष राहणे आवश्यक आहे. अपघात होण्याची कारणे लक्षात ठेवावीत. त्यामुळे अपघात टळू शकतात. अशी दक्षता घेतल्यास रस्ते अपघातातील मृत्यू कमी होऊन देशाचे, समाजाचे होणारे नुकसान टाळता येईल.**

# तुमची सुरक्षा, तुमचे हित...

**रमेश प . भामे**

आपल्या देशामध्ये दहशतवादी हल्ले, साथीचे रोग यामधून मृत्युमुखी पडणाऱ्यांच्या संख्येपेक्षा; रस्ते अपघातामध्ये मृत्यू पावणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात आहे. याबाबत नागरिकांनी वाहन चालवताना दक्षता न घेतल्याने अनेक कुटुंबाचे आधारस्तंभ गमावले जातात. अनेक तरुण आपले ध्येय गाठण्यापूर्वीच जगाचा निरोप घेतात. काही जण अपंग होऊन असाहाय्य जीवन कंठत राहतात. रस्ते अपघाताची कारणे आपण समजून घेतली पाहिजेत.

**अति वेगाने वाहन चालवणे :** बहुतेक अपघातांमध्ये अतिवेगाने गाडी चालविणे हे अपघाताचे प्रमुख कारण आहे. वाहन किती अंतरामध्ये थांबवण्याची क्षमता आहे. हे विचारात घेऊनच चालकाने वाहन चालवले पाहिजे.

**धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक करणे :** डाव्या बाजूने वाहन ओव्हरटेक करणे धोकादायक ठरू शकते. पुढील वाहनास ओव्हरटेक करत असताना हॉर्न वाजवून अथवा लाईटचा डिप्पर देऊन सूचना देणे आवश्यक आहे. अन्यथा अशी कृती बऱ्याच वाहनचालकांना महाग पडते.

**असुरक्षित मार्गिका ओलांडणे :** मार्गिका ओलांडताना प्रथम डावीकडे अथवा उजवीकडे वळण्याचे संकेत (सिग्नल) द्यावे. त्यानंतर आरशात पाहून मार्गिका ओलांडावी.

**वाहतूक संकेत व नियम न पाळणे :** रस्त्यावर चौकांमध्ये वाहतूक संकेत दिवे (सिग्नल) चालू असताना मध्येच वाहन घातल्याने अपघात होऊन जीवितहानी होते.
वाहनांच्या डाव्या बाजुने ओव्हरटेक करू नये. वाहन चालवण्यापूर्वी सुरक्षित साधने (हेल्मेट, सेफ्टी बेल्ट) यांचा वापर न केल्याने डोक्यास मार लागून गंभीर दुखापत होते. त्यामुळे बरेच चालक मृत्युमुखी पडतात. अशा अपघाताचे प्रमाण ८० टक्के आहे.

२०१६ मध्ये ४, ८०,६५२ अपघात झाले. त्यामध्ये १,५०,७८५ लोक मृत्युमुखी पडले. तर ४,९४,६२४ लोक गंभीर जखमी झाले. यावरून भारतात दररोज रस्ते अपघातात सुमारे ४०० लोक मरण पावतात. दर तासाला सुमारे ५५ अपघात घडतात. तर १७ लोकांचा बळी जातो. ४६.३ टक्के लोक हे १८ ते ३५ वयोगटातील असतात. हेच कुटुंबाचे पोषणकर्ते असतात.

**रस्त्यावर लहान मूल/पादचारी अथवा जनावरांचे अचानक येणे :** रस्त्यावरील जनावरे वाहन बघितल्यावर विचित्रपणे आपल्या वाहनासमोर येऊ शकतात. अशा वेळी अचानक ब्रेक दाबल्यास पाठीमागचे वाहन धडकू शकते. आपल्या वाहनाची धडक पादचारी मूल, जनावरास लागून त्याला व आपल्याला इजा होऊ शकते. त्यामुळे वाहन चालवताना रस्ता व त्यांच्या आजूबाजूची परिस्थिती यावर सतत नजर ठेवली पाहिजे.

**वाहनचालकाचे लक्ष विचलित होणे :** चालक वाहन चालवण्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करीत नाहीत. रस्त्यावरील सुंदर निसर्गचित्रे , बोर्ड पाहत राहतात व समोर लक्ष देत नाहीत. गाडीतील प्रवाशांशी पाठीमागे वळून बोलत राहतात. कधी कधी भांडतात. एफएम रेडिओ लावणे, व्हिडिओवर चित्रपट पाहणे असे प्रकार चालक करतात. त्यामुळे आपण स्वत:चा व इतरांचाही जीव धोक्यात घालतो. गाडी चालवताना मोबाइलचा वापर केल्यामुळे लक्ष विचलित होऊ शकते. चालकास झोप आल्यास सुरक्षित ठिकाणी रस्त्याचे बाजूला वाहन उभे करून पुरेशी झोप घ्यावी. झोपेतच वाहन चालवण्याचा अट्टाहास करू नये. मद्यपान करून वाहन चालवू नये. रस्त्यावरील वाहतूक चिन्हे, सूचना फलक याकडे दुर्लक्ष करू नये.

**पोलीस निरीक्षक वाहतूक उपविभाग**
**नारपोली, भिवंडी ठाणे पोलीस आयुक्तालय**



# आपत्स्य सर्व सेवा कालम

आपले पोलीस, आपली अस्मिता

राज्यामध्ये होणाऱ्या नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या धर्तीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्या निर्माण करण्यात आल्या आहेत. या कंपन्यांपैकी एक नागपूर येथे तर दुसरी धुळे येथे आहे. या पथकास पावसाळ्यामध्ये निर्माण होणारी पूर परिस्थिती, भूकंप, डोंगर वा इमारत कोसळल्यास अथवा नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकलेल्या नागरिकांना प्राधान्याने वाचवण्याचे काम करावे लागते. या दलाचे



'आपत्स्य सर्व सेवा कालम' हे ब्रीदवाक्य आहे. म्हणजेच कोणत्याही प्रकारच्या आपत्ती निवारणासाठी कायम तत्पर, असा याचा अर्थ आहे.

या दलामध्ये सर्वसाधारणपणे पोलीस अधिकारी, कर्मचारी, श्वान हस्तक, सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता, आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, पशुसंवर्धन विभागातील पर्यवेक्षक, अशा व्यक्तींचा समावेश आहे. या दलाच्या नागपूर येथील कंपनीमध्ये १६६ तर धुळे येथील कंपनीमध्ये १५५ पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. या दलास तळेगाव (पुणे) स्थित राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकाकडून आपत्ती निवारणाच्या कामकाज करण्याबाबतचे ४५ दिवसांचे विशेष मूलभूत प्रशिक्षण देण्यात आले आहे. यामध्ये शारीरिक क्षमता उत्तम प्रकारे ठेवणे, मानसिकता कणखर बनवणे यावर भर दिला जातो. या प्रशिक्षणामध्ये कोसळलेल्या मलब्यातून शोध आणि सुटका, प्रथम वैद्यकीय प्रतिसाद, पुरातून सुटका, रासायनिक, जैविक, आण्विक आपत्तीतून सुटका, अतिउंच इमारतींतून सुटका आदी बाबींचा समावेश करण्यात आला आहे. याचे नियमितरीत्या प्रात्यक्षिक व सराव घेण्यात येतो. या पथकासाठी आपत्ती निवारणासाठी उपयुक्त ठरणारी १९० प्रकारची विविध साधनसामग्री खरेदी करण्यात येणार आहे. नागपूर व धुळे पथकाने खालीलप्रमाणे आपली कामगिरी बजावली आहे.

धुळे पथकाने धुळे शहरातील नकाणे तलाव, पाडळदे येथील तलाव, बिलाडी येथील तलाव, आकडशे येथील तापी नदी प्रवाहामध्ये बुडालेले इसम, कुसुंबा धुळे येथील विहिरीत बुडालेले इसम, मुंढेवाडी जि सोलापूर येथील नदीपात्रात वाहून गेलेल्या इसमांचे मृतदेह, डोंगरगाव तलाव, कुसडगाव (जि. अहमदनगर), राहुरी (जि. अहमदनगर) या विविध ठिकाणी वेगवेगळ्या घटनांमध्ये बुडालेल्या, वाहून गेलेल्या इसमांचे मृतदेह शोधून काढण्याचे तसेच बचावकार्य केले आहे.

भागवान गड दसरा मेळावा, हत्तीडोह तलावावरील गणपती विसर्जन, नाशिक येथील कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त, नंदुरबार येथील नर्मदा बचाव जलसमाधी आंदोलन, सरदार सरोवर प्रकल्प पुनर्वसन केले आहे. नागपूर पथकाने कळमेश्वर तालुक्यातील वेण्णा तलावावरील नाव उलटून मृत्युमुखी पडलेल्या ७ नागरिकांचे मृतदेह अथक परिश्रम करून बाहेर काढले. सावनेर (जि. नागपूर) येथील वाकी तलावामध्ये, सिरोंचा (जि. गडचिरोली), उमरेड (जि. नागपूर), अंबाझरी तलाव नागपूर येथे बुडालेल्या इसमांचे मृतदेह बाहेर काढणे व बचावकार्य पार पाडले आहे.



**न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय हे राज्य शासनाच्या आधिपत्याखालील गुन्हा विश्लेषणास मदत करणारी अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा आहे. देशातील अग्रगण्य प्रयोगशाळांमध्ये तिचा समावेश होतो. या प्रयोगशाळेमार्फत विश्लेषण अहवाल अतिशय कमी वेळात उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे तपास यंत्रणेच्या कामाला गती प्राप्त होत आहे.**

# गुन्हेसिद्धीचे शास्त्रीय तंत्र

**डॉ. कृष्णा कुलकर्णी**

न्यायसहायक विज्ञानामध्ये बिनचूक पुरावा न्यायप्रणालीला पुरवण्याची अजोड ताकद आहे. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा या निरनिराळ्या शास्त्रीय शाखांचा अत्यंत बिनचूक व बिनतोड वापर विश्लेषणात्माक कार्य करणाऱ्या संस्था आहेत. या प्रयोगशाळांचे कर्तव्य म्हणजे न्यायप्रणालीला तपासी अधिकाऱ्यांमार्फत पूर्वग्रहविरहित असा शास्त्रोक्त पुरावा उपलब्ध करून देणे हे होय.

## प्रयोगशाळा

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळासंचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारीत मुंबई येथे मुख्यालय आणि नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नांदेड व कोल्हापूर अशा ८ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. नव्याने लवकरच पाच लघु प्रयोगशाळा ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, धुळे व चंद्रपूर येथे स्थापन करण्याचे नियोजित आहे.

भारतीय दंडविधान, फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय क्षेपणास्त्र विषयक कायदा, अमली व गुंगीकारक पदार्थविषयक कायदा, स्फोटक पदार्थविषयक कायदा, पेट्रोलियम पदार्थविषयक कायदा, मुंबई पोलीस कायदा, दारूबंदी कायदा, जीवनावश्यक वस्तूविषयक कायदा, मोटर वाहन कायदा, लाचलुचपत विरोधी कायदा, वाहन अपघात कायदे, वन्य प्राणी संरक्षण कायदा इ. विविध कायद्यांच्या निरनिराळ्या कलमांखाली दाखल गुन्ह्यांमधील जप्त नमुन्यांचे विश्लेषण करून शास्त्रोक्त पुरावा उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण काम या प्रयोगशाळा करतात.

## कार्यपद्धती

शास्त्रीय विश्लेषणाद्वारा देण्यात येणारा परिस्थितीजान्य पुरावा हा न्यायालयामध्ये भक्कम पुरावा म्हणून ग्राह्य धरला जात असून, निरापराध्याची सुटका व अपराध्यास शिक्षा या न्यायप्रणाली तत्त्वाचे पालन होण्यास मदत होत आहे. अलीकडच्या काळात गुन्हेगाराकडून गुन्हे करताना अत्याधुनिक सामग्रीचा व पद्धतीचा वापर होत असून, त्या प्रवृतींना विफल करण्यासाठी दाखल मुद्यमालावर रासायनिक विश्लेषण केले जाते. अतिसंवेदनशील महत्त्वाचा वैज्ञानिक पुरावा म्हणून; न्यायालयात आरोपीविरुद्ध दाखल करण्याच्या दृष्टीने, संबंधित पोलीस स्टेशन व वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवला जातो. अचानक उद्‌भवलेल्या संवेदनशील अतिमहत्त्वाच्या प्रसंगी प्रयोगशाळेतील अधिकारी/कर्मचारी घटनास्थळी तातडीने जाऊन महत्त्वाचे पुरावे जमा करतात. त्याबाबतचा रासायनिक विश्लेषक अहवाल तयार करून तो प्रतिवेदित करणे आवश्यक ठरते. सर्व संबंधित तज्ज्ञांना योग्य प्रशिक्षणाद्वारे सुसज्ज करण्यात येते. राष्ट्रीय पातळीवर तयार करण्यात आलेल्या कार्यपद्धती नियमपुस्तिका (Procedural Manual) द्वारा आधुनिक पद्धतीचा वापर करून गुन्ह्यातील जप्त नुमन्यांच्या विश्लेषणाचे काम करण्यात येते.



न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये तांत्रिक स्वरूपाची कामे न्यायदानाशी संबंधित आहेत. गुन्हा प्रकरणातील जप्त मुद्देमालाचे रासायनिक विश्लेषण करून; अहवाल पाठवण्याचे काम प्रयोगशाळा केले जाते.

## प्रयोगशाळेतील कार्य

- **विषशास्त्र विभाग** : या विभागामध्ये परघात, आत्मघात अथवा अपघाती विषबाधेच्या प्रकरणात वैद्यकीय व पोलीस अधिकारी यांनी पाठविलेल्या उलटी, शरीरांतर्गत इंद्रिये. शवच्छिेदनानंतर (Viscera) रक्त, लघवी आणि घटनास्थळावरील पदार्थ इत्यादींमध्ये विषाची तपासणी केली जाते. याशिवाय पशुपक्ष्यांबाबत घडणाऱ्या विषप्रयोगाच्या गुन्ह्यामध्येही अशा प्रकरची तपासणी केली जाते.
- **जीवशास्त्र, रक्तजल शास्त्र व डी. एन. ए.विभाग** : हत्या, प्राणघातक हल्ला आणि बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये रक्त, वीर्य इतर डागाची प्राणिजाती आणि रक्तगटासंबधी तपासणी केली जाते. केस, वनस्पती पदार्थ, लाकूड इत्यादी जैविक पदार्थाची तपासणीदेखील केली जाते. हा विभाग त्याला लागणारी जैविक क्रियाकारके स्वत:

बनवतो. त्यासाठी मुंबई येथे प्रयोगशाळेचे स्वतंत्र प्राणिगृह आहे.

अत्यंत विश्वासार्ह शास्त्रीय पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाणारे डी.एन.ए. चाचणीचे तंत्रज्ञान मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद व नासिक या प्रयोगशाळेत उपलब्ध असणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. बलात्कार, हत्या, मुलाचे पालकत्व, या संदर्भातील वाद तसेच मोठ्या दुर्घटना उदा. बॉम्बस्फोट, विमान/रेल्वे दुर्घटना, सुनामी/भूकंपामधील बळीची ओळख पटावे यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

■ **सामान्य विश्लेषण व उपकरणीय विभाग :** या विभागात खून, जाळपोळ, बॉम्बस्फोट, चोऱ्या आणि फसवणूक इत्यादींमध्ये जप्त केलेल्या पेट्रोलजन्य पदार्थ, अमली पदार्थ, बॉम्बस्फोटाचे अवशेष, रंग, तेल, औषधी पदार्थ व औद्योगिक रसायने इत्यादी पदार्थांची आणि त्यांच्या अवशेषांची रासायनिक तपासणी केली जाते, अल्ट्रा व्हॉयोलेट व इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कोपीची तसेच गॅस व लिक्विड क्रोमॅटोग्राफी इत्यादी उपकरणांचा विश्लेषणासाठी उपयोग केला जातो.



■ **भौतिकशास्त्र विभाग :** या विभागात मातीचे परीक्षण, काच, रंग (Paint), धातू, कपडे, तंतू, दोरी, बनावट नोटा, संशयित दस्तऐवज इ. अशा वेगवेगळ्या कागदपत्रांचे विश्लेषण केले जाते. व्हिडिओ स्पेक्ट्रल कॉम्पॅरेटरद्वारे प्रश्नांकित कागदपत्रांचे विश्लेषण केले जाते. केमिकल रेस्टॉरेशन मेथडद्वारे वाहनांचे इंजिन नंबर, चेसिज नंबर, रजिस्ट्रेशन नंबरची तपासणी करून अहवाल दिला जातो.

■ **क्षेपणास्त्र विभाग :** हत्येसाठी वापरलेले पिस्तुले, बंदुका आणि शस्त्र कायद्यान्वये बेकायदेशीरपणे हत्यारे बाळगण्याबाबतच्या गुन्ह्यामध्ये, पिस्तुले, बंदुका, दारूगोळा, बंदुकीतून उडवलेल्या गोळ्या, काडतुसांची टोपणे, गोळी लागल्याने कापडाला पडलेली छिद्रे, उडवलेल्या दारुगोळ्यांचे अवशेष, गोळी किती अंतरावरून उडवली त्याची परिणामकारकता इत्यादी परिक्षणे केली जातात.

■ **दारूबंदी व उत्पादन शुल्क विभाग :** बेकायदा दारूचे नमुने, वॉश, रक्तातील अल्कोहोल आणि उत्पादन शुल्कविषयक नमुने इत्यादीचे सविस्तर परीक्षण केले जाते.

■ **मानसशास्त्र विभाग :** या विभागांतर्गत सायकॉलॉजिकल प्रोफायलिंग, पॉलिग्राफ, ब्रेन इलेक्ट्रिकल ऑसिलेशन सिग्नेचर प्रोफायलिंग आणि नार्को-ॲनासिसिस या चाचण्या केल्या जातात. या चाचण्या गुन्ह्यासंबंधातील लोकांवर केल्या जातात. गुन्ह्यासंबंधातील व्यक्तींचा गुन्ह्यामध्ये समावेश आहे की नाही, हे पाहण्यासाठी या चाचण्यांचा उपयोग होतो.

**सायकॉलॉजिकल प्रोफायलिंग –** यामध्ये वैयक्तिक माहिती घेतली जाते. उदा. कुटुंब, बालपण, वैवाहिक, मेडिकल आणि व्यक्तिमत्वाचे घटक अभ्यासले जातात.

■ **टेप ऑथेंटिकेशन / स्पीकर आयडेंटिफिकेशन :** या विभागात प्रामुख्याने लाच, धमकी, खंडणी, अपहरण, जुगार, दहशतवाद व चित्रफिती यांसारख्या गुन्ह्यांमधील प्रदर्शिते विश्लेषणासाठी दाखल केली जातात. तसेच या विभागात विविध गुन्ह्यांमधील प्रदर्शित चित्रफिती / ध्वनी, सी.डी., मेमरी कार्ड्स, डिजिटल रेकॉर्ड्स, ऑडिओ/मायक्रो कॅसेटस, सीसीटीव्ही/स्पाय गॉगल कॅमेरा रेकॉर्डिंग, मोबाइल फोन या माध्यमातून विश्लेषणासाठी दाखल केली जातात.

या विभागामध्ये खालील विभागांमधून विश्लेषणाकरिता प्रकरणे दाखल केली जातात.

■ **संगणक गुन्हे शास्त्र विभाग :** संगणक गुन्हे शास्त्रामध्ये हॅकिंग, बनावट सॉफ्टवेअर, संगीत चित्रपटाच्या बनावट सीडी, लहान मुलांचे अश्लील चित्रीकरण, अश्लील छायाचित्रे, एटीएम कार्ड, डेबिट कार्डसंबंधी गुन्हे, बनावट ई-मेलद्वारे फसवणूक, धमकावणे, बनावट इंटरनेट प्रोफाईलद्वारे बदनामी करणे, सायबर जगताद्वारे लक्ष ठेवणे, माहितीची चोरी, आर्थिक गुन्हे इ. चा समावेश होतो. या विभागात खून, बलात्कार, बॉम्बस्फोट या प्रकारच्या गुन्ह्यांच्या संबंधाने देखील मुद्देमाल जमा करण्यात येतो.

■ **गुन्हास्थळांना भेटी :** सध्या राज्यामध्ये ४५ मोबाइल फिरत्या न्यायहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा (मोबाइल फॉरेन्सिक सपोर्ट युनिट) कार्यरत आहे. जिल्ह्याचे पोलीस मुख्यालय व पोलीस आयुक्तालयाशी त्या संलग्न असून गुन्हास्थळांना त्या भेटी देतात. गुन्हास्थळांवरून मुद्देमाल गोळा केल्यानंतर त्यावर प्राथमिक तपासणी करून, आवश्यक मुद्देमाल प्रयोगशाळेत पाठवण्याचे महत्त्वाचे कार्य या युनिटद्वारे केले जाते.

## अद्ययावत ट्रेनिंग सेंटर

मुंबई येथील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा परिसरात अद्ययावत ट्रेनिंग सेंटर बांधण्यात आले आहे. त्याद्वारे न्यायप्रणालीत काम करणारे अधिकारी (प्रशिक्षणार्थी न्यायाधीश), वैद्यकीय अधिकारी, पोलीस अधिकारी/कर्मचारी, प्रयोगशाळेच्या कामाशी संबंधित सर्व अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले जाते. राज्यामधील मोबाइल फिरत्या न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या कामामध्ये मदत व्हावी यासाठी, पोलीस दलातील विज्ञान पदवी/पदविका प्राप्त १०० पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**प्रभारी संचालक, न्याय सहायक, वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, मुंबई**

**सीसीटीएनएस (क्राईम अॅण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अॅण्ड सिस्टिम) हा केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या माध्यमातून गुन्ह्यांची उकल व गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी गुन्हे, गुन्हेगार, गुन्ह्यांचा तपास याबाबतची सर्व माहिती डिजिटल प्रणालीद्वारे उपलब्ध केली जाते.**

## सीसीटीएनएस:

# डिजिटल तपासाची स्मार्ट दिशा



**संजीव कुमार सिंघल**

सीसीटीएनएस प्रकल्पाचा मुख्य उद्देश संगणकाच्या मदतीने पोलीस तपास कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल करणे हा आहे. याद्वारे पोलीस तपासामध्ये पारदर्शकता आणणे, पोलिसांचे तपास कौशल्य / कार्यक्षमता वाढवणे, गुन्हे वा गुन्हेगारांची माहिती राज्य व राष्ट्रीय पातळीवर अल्पावधीत उपलब्ध करून देणे शक्य होईल. गुन्हेगारांचा माग घेणे व गुन्ह्यांचा तपास करणे, राज्य व राष्ट्रीय स्तरावर गुन्हेविषयक माहितीची देवाणघेवाण करणे अधिक सुलभ होणार आहे.

सीसीटीएनएसमधून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पर्यवेक्षणासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध होते. गुन्हे अभिलेख डिजिटल स्वरूपात जतन करणे शक्य झाल्याने, पोलिसांना तपास कामास पुरेसा वेळ मिळत आहे. त्यामुळे मनुष्यबळ, वेळ, श्रम व पैशाची बचत होऊन, पोलिसांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होत आहे. त्याचप्रमाणे सामान्य नागरिकांसाठीही सीसीटीएनएसमधून विविध स्वरूपाच्या सुविधा उपलब्ध असल्याने नागरिक संगणकाचा वापर करून घरबसल्या तक्रार नोंदवू शकतात. वेगवेगळ्या स्वरूपाच्या परवानग्या प्राप्त करू शकतात. सीसीटीएनएस प्रकल्प अंमलबजावणीची

सुरुवात नोव्हेंबर – २०१० मध्ये झाली. राज्यात २०१७ अखेरपर्यंत करण्यात आलेल्या प्रकल्पाच्या कालबद्ध अंमलबजावणीमुळे, राष्ट्रीय पातळीवर अग्रणी असलेल्या राज्यांपैकी महाराष्ट्र एक राज्य आहे. महाराष्टातील ११९८ पोलीस ठाणी व ६३७ वरिष्ठ पोलीस अधिकारी कार्यालये या प्रकल्पामुळे आपापसात जोडली गेली आहेत.

### स्टेट डेटा सेंटर

सीसीटीएनएस प्रकल्पातील राज्यस्तरावरील एकत्रित माहितीचे संकलन, साठवणूक व व्यवस्थापनाकरिता स्टेट डेटा सेंटर (एसडीसी) ची उभारणी मुंबई येथे करण्यात आली असून, त्यामध्ये १९९८ पासून आजपर्यंतची माहिती जतन करण्यात आली आहे. एसडीसीमधून काही उपयुक्त माहिती नेशनल डेटा सेंटर (एनडीसी), नवी दिल्ली येथे जतन केली जाते. आपत्कालीन व्यवस्थापनाकरिता डिझास्टर रिकव्हरी सेंटरची (डीआरसी) स्थापना नवी दिल्ली येथे करण्यात आली आहे. सुरुवातीस सीसीटीएनएससाठी महाराष्ट्रात 'कॅस' (कोअर ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर) ३.० हे सॉफ्टवेअर वापरण्यात येत होते. जुलै २०१७ पासून सुधारित व जास्त सुविधा उपलब्ध असणारे कॅस ४.५ हे सॉफ्टवेअर वापरण्यात येत आहे. सुरुवातीस पोलीस ठाणी तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी कार्यालये ही ५१२ केबीपीएस इतक्या वेगाने एसडीसीशी जोडण्यात आली होती. जुलै २०१७ पासून पोलीस ठाणी तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी कार्यालये २ एमबीपीएस इतक्या वेगाने एसडीसीशी जोडण्यात आली आहेत. त्यामुळे अधिक वेगाने माहितीची देवाणघेवाण होत आहे.

### पोलिसांना प्रशिक्षण

सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत १ लाख १० हजार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले.

कोअर ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरमार्फत सीसीटीएनएसमध्ये गुन्हे नोंदणी, गुन्हे तपास, न्यायालयीन कार्यवाही व इतर माहिती विहीत नमुन्यात पोलीस ठाणे स्तरावरून ऑनलाइन भरली जात आहे. सीसीटीएनएस प्रकल्पातील सॉप्टवेअर, साधनसामग्री व नेटवर्क कनेक्टिव्हीटीचे सिक्युरिटी ऑडिट नोव्हेंबर – २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सीसीटीएनएससमार्फत प्रथम खबर अहवाल (एफआयआर) दाखल केल्यानंतर, त्यातील आरोपीच्या अटकेनंतर व पोलिसांनी गुन्ह्याच्या केलेल्या निर्गतीनंतर; फिर्यादीस त्याच्या मोबाइल नंबरवर एसएमएसद्वारे माहिती दिली जाते. सीसीटीएनएसचा वापर करून क्राईम ॲनॅलेटिक्स सॉफ्टवेअर तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या सॉफ्टवेअरचा वापर गुन्हे प्रतिबंध करण्यासाठी, गुन्हे कल विश्लेषण करण्यासाठी तसेच मनुष्यबळाचे उपयुक्त वाटप करण्यासाठी होणार आहे.

### तपासकार्यात सुविधा

सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये भरण्यात आलेल्या माहितीमुळे संबंधित नोंदवह्या आपोआप अद्ययावत होत असल्याने व अहवालसुद्धा आवश्यकतेप्रमाणे मिळत असल्याने, त्याच त्याच नोंदी परत नोंदवण्याचे पोलिसांचे काम कमी झाले आहे. सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये शोधा व विचारा ही सुविधा वापरून पोलिसांना १) व्यक्तीचा गुन्हेगारी इतिहास २) गुन्ह्याची पद्धत, गुन्ह्यात वापरलेले वाहन, गुन्हेगाराचे वर्णन ३) अनोळखी मृतदेह व हरवलेल्या व्यक्ती ४) मिळालेली मालमत्ता, चोरीस गेलेली मालमत्ता व बेवारस मालमत्ता यांची माहिती मिळवून जुळवणी करता येते.

सीसीटीएनएसच्या वापरामुळे गुन्हेगार/समाजकंटकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे शक्य झाले आहे. या प्रणालीचा वापर करून चंद्रपूर जिल्हा पोलिसांनी आतापर्यंत ४८०५ इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

'विशिष्ट व्यक्ती शोधा व पाहा,' या सुविधेचा उपयोग अटक, आरोपीची पोलीस कोठडी मिळवण्यासाठी, ती वाढवण्यासाठी तसेच आरोपीचा जामीन रद्द होण्यासाठी तपास अधिकारी करत आहेत.

**अपर पोलीस महासंचालक, पुणे**

## ऑनलाइन तक्रारीची सुविधा

सामान्य नागरिकांसाठी सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये महाराष्ट्र पोलीस सिटिझन पोर्टलवर (www.mhpolice.maharashtra.gov.in) खालील सुविधा उपलब्ध आहेत

■ शोधा व पाहा सुविधेंतर्गत पोलीस ठाण्याने प्रकाशित केलेले प्रथम खबरी अहवाल, अटक आरोपी, फरारी आरोपी, हरवलेल्या व्यक्ती, अनोळखी मृतदेह, चोरीस गेलेली व बेवारस मिळून आलेली वाहने याबाबतची माहिती पाहता येते. ■ परदेशी नागरिकांसाठी सी–फॉर्म व विविध अर्जांचे नमुने प्राप्त करता येतात ■ नागरिकांना घरबसल्या पोलिसांकडे ई–तक्रार करता येते. ई–तक्रारीची सद्य:स्थिती बघता येते, गुप्त माहिती पोलिसांना देता येते, पोलिसांबाबत अभिप्राय नोंदवता येतो. ■ भाडेकरू चारित्र्य पडताळणी, कर्मचारी चारित्र्य पडताळणी, घरकामगारांच्या चारित्र्य पडताळणीसाठी विनंती अर्ज करता येतात. ■ विविध स्वरूपाच्या कार्यक्रमांसाठी परवानगी, संप व निदर्शने यासाठी परवानगी, मिरवणुकीसाठी परवानगी, गणेशोत्सव / नवरात्रौत्सवासाठी परवानगी यासाठी सुद्धा नागरिकांना पोलिसांकडे विनंती अर्ज करता येतात. या प्रकल्पाला राज्य व केंद्रीय स्तरावरील 'स्कॉच अवार्ड फॉर सिक्युरिटी मेजर्स इन सीसीटीएनएस', 'एलीट्स अवार्ड फॉर स्मार्ट पोजेक्ट कॅटॅगिरी –सेफ सिटी', बेस्ट कपॅसिटी बिल्डिंग इनिशिएटीव्ह', 'बेस्ट इ–गव्हर्नंस' आदी पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



# सायबर युगाची आव्हाने

**सध्याच्या डिजिटल युगामध्ये सायबर क्राईमचे प्रमाण वाढत आहे. हे गुन्हेगार कुठे असतील याचा थांगपत्ता लागू शकत नसल्यामुळे त्यांच्या फायद्याचे झाले आहे. त्यामुळे पोलीसदलाला अशा गुन्ह्यांचा तपास व त्यांना शिक्षा होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सामग्रीची, आणि दररोज बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती असणे आवश्यक ठरणार आहे.**

**बाळसिंग राजपूत**

भारताची वाटचाल सध्या डिजिटल युगाकडे होत आहे. कमीअधिक प्रमाणात नागरिकांचा संगणकाद्वारे ऑनलाइन सेवा यांच्याशी संबंध येत आहे. त्यामुळे डिजिटल व्यवहारांशी संबंधित सायबर गुन्ह्यांमध्ये देखील वाढ होत आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी पोलीसदलही तयार होत आहे.

सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी गुन्हेगारांच्या मानसिकता लक्षात घेऊन, नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे पोलिसांना आवश्यक ठरत आहे. त्यासाठी राज्य शासनाने सायबर गुन्हेगारीशी लढण्यासाठी महाराष्ट्रातील पोलिसांना सशक्त करण्याचा निर्णय घेतला व राज्यस्तरावर विशेष सायबर सेल निर्माण केला. या सेलला सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरवण्यात आले.

राज्यातील सायबर विश्वातील घडमोडींवर या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यात सायबर पोलीस ठाणी निर्माण करून, सायबर गुन्हेगारीला आळा घालण्याचे प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक ठिकाणी सायबर प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. यामध्ये या गुन्ह्यांचे विश्लेषण करून गुन्ह्याची पद्धत, कल, तंत्र आदींचा अभ्यास करून; अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी उपाय योजण्यात येत आहेत. सायबर प्रयोगशाळांमुळे गुन्ह्यांना आळा घालण्यास मदत होत आहे.

जगभर झालेल्या रॅन्समवेअर हल्ल्याच्या वेळी सायबर पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे महाराष्ट्रात याचा जास्त त्रास झाला नाही.

### पहिले राज्य

सायबर सेल तसेच सायबर पोलीस ठाणे निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वाढत्या

## आम्ही तयार....

**लक्ष्मण कांबळे**

सध्या महाराष्ट्रात सायबर गुन्ह्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सायबर गुन्ह्यांचा शास्त्रशुद्ध व तांत्रिकदृष्ट्या तपास करण्यासाठी पोलिसांना कोणत्याही प्रकारची अडचण भासू नये म्हणून विशेष पोलीस महानिरीक्षक, ब्रिजेश सिंह व पोलीस अधिक्षक बाळसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र सायबरतर्फे पोलिसांना उच्चप्रतीचे सायबर प्रशिक्षण देण्यात येत आहे. महाराष्ट्रात एकूण ४७ सायबर लॅब स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यापैकी एकूण ४३ सायबर लॅब्सना सायबर पोलीस ठाणे म्हणून घोषित करण्यात आले. नवनिर्मित सायबर पोलीस ठाणे/सायबर प्रयोगशाळांना

वापरासोबतच सायबर गुन्हेगारीमध्येही वाढ होणार हे हेरून, सायबर सेल बळकट करण्यात येत आहे. पुढील काही वर्षात कोणकोणती आव्हाने समोर येऊ शकतात; याचा ऊहापोह होणे आवश्यक असून यासाठी दक्ष राहण्याची गरज आहे. या नव्या आव्हानांचा विचार करावा लागणार आहे.

### सायबर दहशतवाद

विविध संकेतस्थळे, समाजमाध्यमे यांचा वापर करून, तरुणांना वेगळ्या मार्गावर नेण्याचे प्रमाण वाढले आहे. या माध्यमातून समाजामध्ये वितुष्ट निर्माण करून देशात तणाव वाढवण्याचे काम अगदी सोपे झाले आहे. त्यामुळे सायबर दहशतवादाचे मोठे आव्हान पोलीसदलासमोर उभे ठाकले आहे. अशी कृत्ये करणाऱ्यांचा ठावठिकाणा लागत नसल्यामुळे त्यावर आळा घालण्यास मर्यादा येतात.

### सायबर युद्ध

देशामध्ये मोठ्या प्रमाणावर सायबर हल्ल्यांच्या माध्यमातून एकमेकांविरुद्ध समाज माध्यमांचा वापर केला जाणार आहे. पूर्वीप्रमाणे दोन देशातील युद्ध अथवा वाद हे सीमेपर्यंतच न राहता, ते आता प्रत्येक क्षेत्रापर्यंत पोहोचले आहे. प्रत्येक क्षेत्रात नेटवर्किंगचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे, सायबर युद्धाचा धोका वाढणार आहे. दुसऱ्या देशातील महत्त्वाच्या यंत्रणा हॅक करणे, अशा यंत्रणांवर नियंत्रण मिळवून पाहिजे ती गोपनीय माहिती मिळवणे, महत्त्वाच्या योजना, प्रकल्पांना धोका निर्माण करणे अशा माध्यमातून सायबर युद्ध खेळले जाईल.



महाराष्ट्र सायबरची अत्याधुनिक लॅब

### सायबर क्राइम व आर्थिक गुन्हे

नेटवर्किंगच्या वाढत्या वापरामुळे सायबर गुन्हे हे आपल्या वैयक्तिक आयुष्यापर्यंत पोहोचले आहेत. ऑनलाइन व्यवहार वाढल्यामुळे आर्थिक गुन्हे वाढण्यात मदत झाली आहे. २०२५ पर्यंत आपली अर्थव्यवस्था संपूर्ण डिजिटल होईल. त्यामुळे पुढील काळात पोलिसांना या गुन्ह्यासंदर्भात अधिक सतर्क राहण्याची गरज आहे.

### माहितीची चोरी

फेसबुक, व्हॉटस्‌अप, ट्विटर, इन्स्टाग्राम आदीसारख्या समाजमाध्यमांमुळे वैयक्तिक माहिती तत्काळ या संकेतस्थळाकडे जमा होत असते. अनेक संकेतस्थळांचे सर्व्हर हे बाहेरील देशात असल्यामुळे या माहितीची चोरी होण्याचा धोका वाढला आहे. सायबर कायद्याच्या मर्यादेमुळे अशा चोरीला आळा घालण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. भविष्यात अशा चोरींची प्रकरणे वाढत जाणार आहेत.

### इंटरनेट ऑफ थिंग्ज

सध्याच्या युगात या नवीन संकल्पना मागील एक वर्षापासून

अत्याधुनिक सायबर उपकरणे पुरवण्यात आली आहेत. ही उपकरणे कार्यान्वित करताना त्याबाबतचे प्रशिक्षण संबधितांना देण्यात आले. सायबर पोलीस ठाणे येथे दाखल होणारे गुन्हे व सदर गुन्ह्यांचा तपास आणि पुरावा गोळा करणे व आरोपीविरुद्ध दोषसिद्धी करणे यासाठी पोलीस अधिकारी /पोलीस अंमलदार यांना सायबर प्रशिक्षण देण्यात आले. त्यामुळे हे अधिकारी आणि कर्मचारी अत्याधुनिक सायबर उपकरणांचा अत्यंत समर्थपणे वापर करत आहेत. सायबर प्रशिक्षणामध्ये ■ डिजिटल फोरेन्सिक व मोबाइल फोरेन्सिक ■ इंटरनेट तंत्रज्ञान व सोशल मीडिया नालीसीस व त्यांचा तपास ■ सायबर लॉ व सायबर क्राईम संदर्भात तत्सम कायदे, ■ सायबर क्राईम इनव्हेस्टीगेशन ■ सायबर सिक्युरीटी व डिजीटल तंत्रज्ञान व डिजीटल इव्हिडन्स ॲनालीसिस व इतर बाबी ■ सायबर फ्रॉड कंट्रोल ॲनालिस्ट या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात ४३ सायबर पोलीस ठाणी व ४ सायबर प्रयोगशाळा अशा एकूण ४७ सायबर पोलीस ठाण्यांतील व सायबर प्रयोगशाळांमधील एकूण ४७० अधिकारी/अंमलदारांना प्रशिक्षण देण्यात येईल.

दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ११२१ पोलीस ठाण्यामधील प्रत्येकी ५ याप्रमाणे एकूण ५६०५ पोलीस अधिकारी/अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात येईल.

पोलीस निरीक्षक, महाराष्ट्र सायबर

वापरात येत आहेत. टीव्ही, फ्रिज आणि एसी यांसारख्या गृहोपयोगी वस्तू ज्या रिमोट कंट्रोलसारख्या यंत्राने नियंत्रित केल्या जात असत त्या आज तंत्रज्ञानाच्या मदतीने इंटरनेटशी जोडल्या गेल्या आहेत. उपकरण वापरणाऱ्या व्यक्तीस जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून ही उपकरणे वापरात आणणे शक्य झाले आहे. अशा उपकरणांवर इंटरनेटद्वारे नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. या तंत्रज्ञानाचा सायबर गुन्हेगारांकडून वापर करून घरातील विविध उपकरणांवर नियंत्रण करता येणे शक्य आहे. यामुळे विविध प्रकारचे गुन्हे करणे सहज शक्य होईल.

### रोबोटिक्स

आगामी काळात रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होणार आहे. रोबोटिक्स वापराच्या फायद्याबरोबरच तोटेही प्रचंड आहेत. रोबोचा वापर करून चोरी, खून, दरोडा, बॉम्बस्फोट, दहशतवादी कारवाया आदींचे प्रमाण वाढण्याची भीती आहे. अशा गुन्ह्यांमध्ये गुन्हेगाराचा शोध कसा घ्यायचा आणि गुन्हेगार म्हणून कोणाला कायद्यापुढे उभे करायचे हे मोठे आव्हान निर्माण होणार आहे.

### कृत्रिम बुद्धिमत्ता

सामान्य माणूस जसा विचार करतो तसे विचार करणारे सॉफ्टवेअर व मशीनचा वापर करून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती फसवणूक करू शकतील. अशा कृत्रिम बुद्धिमत्तेचा शोध घेण्याचे व त्यामध्ये कारवाई कोणावर करावी यासाठी अडचणी निर्माण होऊ शकतात.

### ड्रोन्स

यांचा वापर चित्रीकरणासाठी सध्या होत असला तरी भविष्यामध्ये त्याच्या उपयोग करून कीटक, मधमाशा ते वेगवेगळे पक्षी यांच्या आकाराप्रमाणे दिसणारे रोबोटिक ड्रोन्स तयार केले जातील. दहशतवादी व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या कारवायासाठी त्याचा वापर होऊ शकेल.

### व्हर्च्युअल आणि ऑगमेंटेड रिॲलिटी

पोलीससुद्धा भविष्यात याचा वापर करून गुन्ह्याची पार्श्वभूमी तयार करू शकतात. आभासी वास्तव/ प्रतिमेचा वापर गुन्हेगार गुन्ह्यांसाठी करू शकतात. या आभासी जगताचा पोलिसांना गुन्ह्यांच्या शोधासाठी व न्यायालयात पुरावा म्हणून वापर करता येईल. परंतु या तंत्रज्ञानाच्या उपयोगाप्रमाणे, त्याचा दुरुपयोग गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण करण्याचा धोकाही आहे.

### मोबाइल टेक्नॉलॉजी

इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळेही जग जवळ आले आहे. विविध संकेतस्थळे, समाज माध्यमे यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे २०२५ हे पोलिसांसाठी मोठ्या आव्हानाचे ठरेल. ही आव्हाने मोडून काढण्यासाठी आजच्या घडीपासून तयारी करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वच पोलिसांना टेकसॅव्ही होण्याची गरज आहे.

**पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र सायबर**

---

# सायबर क्राइम म्हणजे नक्की काय?

**तुषार आढाव**

सायबर क्राइम म्हणजे कंम्प्यूटर व नेटवर्कव्दारे केले जाणारे गुन्हे, आपण दररोज इंटरनेटचा वापर समाज माध्यमे वापरण्यासाठी, वैयक्तिक किंवा व्यवसायामध्ये, बँकिंग सेवा वापरण्यासाठी, बातम्या आणि क्रीडासंबंधित माहितीसाठी भरपूर प्रमाणावर करतो. पण आपण इंटरनेट वापरताना सायबर गुन्हेगारांपासून किती सुरक्षित आहोत हे माहिती असणे आवश्यक आहे.



एकदा सायबर गुन्हेगाराला आपली वैयक्तिक माहिती कळली की, मग ते तुमचे खासगी अकाऊंट वापरू शकतात. यामध्ये क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, बँक अकाउंट यांचाही समावेश आहे .

### अशी बाळगा सावधगिरी

■ जर तुम्हाला वाटत असेल की आपल्या बँक अकाउंटला सायबर गुन्हेगारांपासून धोका नसावा तर ई-बँकिंगचा पासवर्ड नेहमी बदलत राहा, किमान महिन्यातून एकदा किंवा दोनदा, आपला लॉगिन पासवर्ड बदलून, सायबर गुन्हेगारंपासून आपले अकाऊंट सुरक्षित ठेऊ शकता.

- सुरक्षित संगणकसुद्धा सायबर गुन्हेगारापासून असुरक्षित होऊ नये म्हणून आपल्या संगणकामध्ये ॲण्टिव्हायरस असणे आवश्यक आहे. कारण व्हायरसद्वारे आपली खाजगी माहिती चोरली जाऊ शकते.
- आपल्या मोबाइलला पासवर्ड ठेवावा. जो मोबाइल क्रमांक आपल्या बँक खात्याबरोबर जोडला गेलेला आहे. त्याबाबत विशेष काळजी घ्यावी. पासवर्डमुळे कोणीही तुमच्या परवानगी शिवाय तुमचा मोबाइल वापरू शाकणार नाही.
- कोणत्याही संकेतस्थळाला तुमची खासगी माहिती देताना ते संकेतस्थळ https ने सुरुवात होते का ते बघा.

https://chedoweb.wordpress.com/ https ने होणारे



संकेतस्थळ नवीन प्रोटोकॉलनुसार सुरक्षित असतात.

- तुम्हाला लॉटरी लागलेली आहे, तुम्ही बक्षीस जिंकला आहात असे ई मेल तुम्हाला येऊ शकतात  पण अशा खोट्या ई मेलला उत्तर देऊ नका.

## कार्यप्रणाली व आव्हाने

माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० नुसार भारतात एखाद्या व्यक्तीवर पुढील गुन्हे दाखल केले जाऊ शकतात.

**ई-मेलद्वारे त्रास :** हा गुन्हा बऱ्याच वेळा घडत असतो, यामध्ये ई-मेल पाठवून सांगितले जाते की, तुम्ही मोठी रक्कम जिंकली आहात. ती रक्कम तुमच्यापर्यंत पोहोचण्यासाठी काही खर्च आहे, तो पाठवा आम्ही तुमच्या बँक खात्यावर जिंकलेली रक्कम टाकतो. अशा प्रकारच्या ई-मेलला प्रत्युत्तर देऊ नका.

**सायबर पाठलाग** (Cyber-Stalking) **:** याचा अर्थ एखाद्याला ई-मेल, मोबाइल, वेब कॅमेरा, व्हिडिओद्वारे इंटरनेटचा वापर करून धमकी देणे.

**अश्लील साहित्याचा प्रसार :** समाज माध्यमांवर किंवा संकेतस्थळाद्वारे कायद्याने बंदी असलेल्या गोष्टी दाखवणे. (अल्पवयीन मुलामुलींच्या अश्लील चित्रफिती) या बाबींमुळे लहान मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होतो. या गोष्टी मुलांना बिघडवू शकतात.

**बदनामी :** ई-मेलद्वारे एखाद्या व्यक्तीचे नाव खराब करणे, हा गुन्हा मानला जातो. एखाद्याचा ई-मेल अकाऊंट हॅक करून त्या अकाऊंटमधून दुसऱ्या व्यक्तीला अपमानास्मद किंवा अश्लील ई-मेल पाठविला जातो.

**हॅकिंग :** इंटरनेटचा चुकीचा वापर करून अनधिकृत माहिती मिळवली जाते, उदा : एखादे संकेतस्थळ किंवा संगणक प्रणालीत घुसखोरी (हॅक) करून माहिती चोरणे, माहितीचे विद्रुपीकरण करणे. घुसखोर (हॅकर्स) नेहमी मोबाइल यंत्रणेद्वारे घुसखोरी करतात.

**क्रॅकिंग :** एखाद्याच्या संगणकामधील खासगी माहिती किंवा फाइल्स चोरणे.

**कार्डिंग :** दुसऱ्याचा एटीएम कार्ड वापर करून त्यातून पैसे काढणे किंवा खरेदी करणे.

**फसवणूक :** दुसऱ्याच्या अकाऊंटचा पासवर्ड चोरणे आणि त्याचा वापर करणे.

**अल्पवयीन मुलांचे लैगिंक चित्रपट :** संकेतस्थळाद्वारे, ई-मेल किंवा समाज माध्यमाद्वारे अश्लील गोष्टी पुरवणे.

## ऑनलाइन फसवणुकी

मागील दोन वर्षांत देशभरात तब्बल ४० टक्क्यांनी सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. नॅशनल सायबर रेकॉर्डस ब्यूरोने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, यामध्ये संकेतस्थळ हॅकिंग, अश्लील साहित्य अपलोड करणे, क्रेडिट कार्ड आणि बँकिंग क्षेत्रातील फसवणुकीच्या प्रकरणांचा समावेश आहे.

केंद्र सरकारने या गुन्हेगारीचा निपटरा करण्यासाठी प्रभावी धोरण तयार केले आहे. त्यासाठी एक विशेषतज्ज्ञांची समिती गठित केली आहे. गृह मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार २०१३ मध्ये सायबर गुन्ह्यांची ७१,७८० प्रकरणे समोर आली. २०१२ मध्ये त्याची संख्या २२ हजार इतकी होती. परंतु यावर्षी जूनपर्यंत ६२,१८९ सायबर गुन्हे समोर आले आहेत.

२०१३ मध्ये जगभरात पसरलेल्या विविध हॅकर समूहांकडून भारतातील २४,४८१ संकेतस्थळे हॅक करण्यात आले. २०१२ मध्ये २७,४०४ आणि २०११ मध्ये २१,६६९ अशा घटना उघडकीस आल्या. अश्लील सामग्रीचा आणि अनधिकृत सामग्रीचा प्रसार करणे, क्रेडिट कार्ड आणि बँकिंग फसवणूक जगात सर्वसामान्य मानली जाते.

**सहायक पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस, नाशिक (ग्रामीण)**



# सायबर गुन्ह्यांचा पाठलाग

**दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारी वाढत आहे. त्याला बळी पडणाऱ्या नागरिकांची संख्याही वाढत आहे. या गुन्ह्यांची शोध घेणारी यंत्रणा पोलिसांनी प्रभावीपणे कार्यान्वित केली आहे. या यंत्रणेद्वारे अनेक गुन्ह्यांचा शोध यशस्वीपणे लावला जात आहे. अशा काही यशकथा...**

### अहमदनगर : डीलरशीपचे जाळे

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी या तालुक्यातील शिलाई काम करणाऱ्या दहिफळे नामक व्यक्ती पतंजली या कंपनीची उत्पादने याची विक्री करीत असे. भविष्यात आर्थिक वृद्धी व्हावी या विचाराने पतंजली कंपनीच्या उत्पादनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात करावा असा विचार त्याच्या मनात आला. ही गोष्ट त्याने त्याचा मित्र दीपक म्हसे यांना बोलून दाखवली. हा व्यवसाय करण्याचे स्वप्न घेऊन या दोन्ही मित्रांनी पतंजली कंपनीची डीलरशीप कशी मिळते याची माहिती योगेश सिनारे या दुसऱ्या एका मित्राच्या मदतीने इंटरनेटवरून मिळवण्याचा प्रयत्न केला. त्या क्षणापासून ते फसवणुकीच्या जाळ्यात अडकू लागले. तंत्रज्ञान वापरण्याचे अज्ञान हे त्याचे महत्त्वाचे कारण ठरले.

दहिफळे, म्हसे आणि सिनारे यांनी पतंजलीच्या संकेतस्थळावरील टोल फ्रीनंबरच्या माध्यमातून नाशिक येथील किसन आव्हाड यांचा मोबाइल क्रमांक मिळवला. किसन आव्हाड हे नाशिक येथील पतंजली कंपनीच्या मेगास्टोअरचे इनचार्ज आहेत. मिळालेल्या मोबाइल क्रमांकाद्वारे दहिफळे व म्हसे यांनी आव्हाड यांच्याशी संपर्क साधला व ते त्यांना भेटले. संबंधित कंपनीचे सर्व व्यवहार ऑनलाइन चालतात ही गोष्ट आव्हाड यांच्याकडून या दोघांना कळली. पतंजलीच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन फॉर्म भरून डीलरशीप मिळवता येईल, असे आव्हाड यांनी सांगितले. दहीफळे व म्हसे हे आपल्या गावी राहुरी येथे परत आले. आता या दोघांना पतंजलीच्या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन फॉर्म भरायचा होता. मात्र, संगणकाचे ज्ञान दोघांनाही नव्हते. एखाद्या सायबर कॅफेवर जाऊन आपल्याला हे काम करता येईल या उद्देशाने किरण यांच्या सायबर कॅफेवर गेले. सायबर कॅफे चालवणाऱ्या किरणलादेखील सुरक्षित किंवा असुरक्षित संकेतस्थळाबद्दल ज्ञान नव्हते. किरण याने संबंधित कंपनीचे संकेतस्थळ उघडले व



ऑनलाइन फॉर्म भरला. या फॉर्ममध्ये ई-मेल आयडीची गरज होती. स्वत:चा ई-मेल आयडी दहिफळे याने आयुष्यात पहिल्यांदाच तयार करून घेतला होता. दहिफळे यांच्या ई-मेलवर लगेच ई-मेल आला. त्या मेलमध्ये नोंदणी फॉर्म मिळाला. त्यात एक टोल फ्री क्रमांक दिला होता. या टोल फ्री क्रमांकावर राघवेंद्र नावाच्या व्यक्तीने त्याच्यामध्ये एक टोलफ्री क्रमांक दिला होता. या क्रमांकावर संपर्क साधल्यावर राघवेंद्र नावाच्या व्यक्तीने २५,००० रुपये इतकी रजिस्ट्रेशन फी भरावयास लावली. या दोघांनी दिनांक ३ ऑगस्ट २०१७ रोजी ही रक्कम भरली. लगेचच दुसऱ्या दिवशी म्हणजेच ४ ऑगस्ट २०१७ रोजी मोबाइल क्रमांकावरुन राघवेंद्र याने रजिस्ट्रेशन झाल्याचे कळवले. सुरक्षा अमानत रकम २ लाख ७५ हजार रुपये भरावयास सांगितले. पैसे भरल्याची पावती दुसऱ्या व्हॉट्सअॅपचा मोबाइल क्रमांकावर पाठवण्यास सांगितली. इतकी मोठी रकम या दोघा मित्रांनी त्याच दिवशी भरलीदेखील.

दिनांक ५ ऑगस्ट २०१७ रोजी दहिफळे यांना ईमेल आला की रक्कम मिळाली व आपणास पतंजलीची डिस्ट्रिब्युटरशिप मिळाली आहे. त्याच दिवशी दुपारी राघवेंद्र याचा पुन्हा फोन आला. त्याच बँक खात्यावर त्याने १० लाख रुपये भरण्यास सांगितले. एवढी मोठी रक्कम भरणे या मित्रांना शक्य नव्हते. तसे त्यांनी राघवेंद्र यास सांगितले. आता मात्र दहिफळे व म्हसे यांच्या मनात शंकची पाल चुकचुकली. शंकानिरसन करावे या उद्देशाने त्यांच्या ओळखीचे श्रीरामपूर येथील पतंजली कंपनीचे डीलर डॉ.जोंधळे यांचा सल्ला घेतला. अहमदनगर जिल्हा पतंजली डिस्ट्रिब्युटरशिप तपासणी करणारे अधिकारी पंडित भोई यांच्याशी संपर्क केला. तेव्हा आपली फसवणूक झाल्याचे दहिफळे आणि म्हसे यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलीस ठाण्यात येऊन तक्रार नोंदवली. पोलीस निरीक्षक सुनील पवार (सायबर पोलीस ठाणे, अहमदनगर) यांनी तपास सुरू केला. दहिफळे व म्हसे या दोन या दोघांकडून बनावट संकेतस्थळ, बनावट ई-मेल पत्ता व संपर्क केलेले मोबाइल क्रमांक इतकीच माहिती मिळाली होती. मात्र पोलिसांनी सखोल तांत्रिक तपास केला. त्यातून हे प्रकरण बिहारची राजधानी पाटनापर्यंत पोहोचले. संपूर्ण तयारी करून पोलीस उपनिरीक्षक प्रतीक कोळी व पोलीस कॉन्स्टेबल राहुल गुंडू हे पथकासह पाटन्याला रवाना झाले. अत्यंत शिताफीने तपास कौशल्य वापरून भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहणाऱ्या विकासकुमार या २२ वर्षांच्या तरुणाला ताब्यात घेतले.

विकासकुमारला सायबर पोलीस ठाणे अहमदनगर येथे आणण्यात आले. अनेक बँकेचे डेबिट व क्रेडिट कार्ड, पासबूक, चेकबूक, खूप मोबाइल फोन, वेगवेगळ्या कंपन्यांचे सीमकार्ड, लॅपटॉप आणि इतर वस्तू त्याच्याकडे सापडल्या. या सर्व गोष्टी जप्त केल्यानंतर विकासकुमार याला गुन्हा कबूल होण्याशिवाय पर्याय नव्हता. अशा प्रकारचा गुन्हा पूर्ण भारतभर झाल्याची शंका पोलिसांना होतीच. राज्यभर संदेश पाठवून पोलिसांना माहिती दिली गेली. बऱ्याच जिल्ह्यातील व राज्यातील पोलीस याच्या शोधातच होते. 'कानून के हात बहुत लंबे होते है,' याची खात्री विकासकुमारला नक्कीच झाली असेल.

## कोल्हापूर : फेसबूक ब्लॅकमेलिंग

कोल्हापूर शहरातील मध्यवस्तीत राहणाऱ्या एका सुशिक्षित तरुणीने रोजच्याप्रमाणे तिचे srushtipadwale या नावाचे फेसबुक खाते उघडण्याचा प्रयत्न केला असता ते उघडले नाही म्हणून तिने पासवर्ड रिसेट करण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीही अकाऊंट सुरू होत नव्हते. त्यामुळे त्याच दिवशी तिने srushtipadwale नावाने नवीन फेसबुक अकाऊंट तयार केले.

या नवीन फेसबुक अकाऊंटवर थोड्याच वेळात तिच्या जुन्या फेसबूक अकाऊंटवरून "He account ka kadhles' असा संदेश आला. त्या वेळी तिच्या लक्षात आले की जुने फेसबूक अकाऊंट कोणीतरी अज्ञात इसम वापरत आहे. त्यावरून तो इसम तिच्या नवीन फेसबुक अकाऊंटवर संदेश पाठवत आहे. त्याने जुन्या फेसबुक अकाऊंटचा बेकायदेशीररीत्या ताबा घेतला असल्याची बाब लक्षात आल्यानंतर तिने जुन्या फेसबुक अकाऊंटचा पासवर्ड देण्याबाबत विनंती केली. त्या वेळी त्याने त्यातून अकाऊंटचा पासवर्ड परत देतो.



याबदल्यात तू माझ्या पेटीएम खात्यावर ५०० रुपये भर. तरच मी तुला ई-मेल आयडी व पासवर्ड देईन, असा मेसेंजरवरती संदेश पाठवला.

अशा पद्धतीने या युवतीच्या फेसबूक फ्रेंडलिस्टमधील मित्रांना संदेश पाठवून पैशाची मागणी करू लागला. फ्रेंडलिस्टमधील मैत्रिणीला पेटीएमवर पैशाची मागणी तो इसम करू लागला. फ्रेंडलिस्टमधील मैत्रिणीला पेटीएमवर पैशाची मागणी करून पैसे दिले नाही तर तुझा फोटो टाईमलाईनवर शेअर करीन असे सांगून तिचा चेहरा असलेला अर्धनग्न अवस्थेतील बनावट छायाचित्र तिच्या मेसेंजरवर पाठवले.

यानंतर या युवतीने कोल्हापूर सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या प्रकाराची गंभीर दखल घेऊन सायबर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक शीतल जाधव, पोलीस नायक राजेंद्र निगडे, अमित सर्जे, अमर आडसुळे, अमर वासुदेव या पथकाने या घटनेची चौकशी सुरू केली. या चौकशीद्वारे वडणगे (ता.करवीर,

जि.कोल्हापूर) येथील प्रशांत श्रीकांत चौगुले याचे नाव समोर आले.

या युवकास सापळा लावून पोलिसांनी ताब्यात घेतले. हा युवक इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. या युवकाने हे कृत्य मीच केले असून फेसबूक अकाऊंट हॅक करण्याचे तंत्रज्ञान यू-ट्युबवरून शिकलो अशी कबुली दिली. हे कृत्य पैशासाठी केले असल्याचे त्याने सांगितले.

### यवतमाळ: बनावट सिमकार्ड

यवतमाळ जिल्ह्यातील प्रियांक चद्रशेखर देशमुख, (आर्णी रोड, मोठे वडगांव, यवतमाळ) याच्या मॅक व्हिकर्स प्रा.लि. कॅश क्रेडिट खात्यामधून ऑनलाइन बँकिंगद्वारे एकूण ४९ लाख रुपये वेगवेगळ्या खाते क्रमांकावर ट्रान्सफर करून फसवणूक करण्यात आली. या संदर्भातील तक्रार प्रियांकने नोंदवल्यानंतर चौकशीस प्रारंभ करण्यात आला.



सौजन्य: www.kaspersky.com

प्रियांक देशमुखच्या बँक ऑफ इंडिया यवतमाळमधील कॅश क्रेडिट खात्यामधून आर.टी.जी.एस.मार्फत सहा व्यक्तींच्या खात्यामध्ये ४९ लाख रुपये ट्रान्सफर करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. ही रक्कम आयसीआयसी बँक व एचडीएफसी बँकमधील खातेधारकांच्या खात्यात जमा झाल्याबाबत देशमुखच्या मोबाइलवर बँकेचे एसएमएस आल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. चौकशीसूत्रे या दिशेने काम करू लागली. ही चौकशी जसजशी पुढे जाऊ लागली, तसे गुन्हेगारांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मिळत गेला. अखेर मुख्य आरोपी विकास साव व रवी याचा शोध घेण्याकरिता कोलकाता येथे तपासणी पथक पोहोचले. या तपासात १) सागर गाजो महतो, २) सम्राट उर्फ राज नजरुल शेख, ३) उज्ज्वाव देवदास घोष यांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली.

फिर्यादीच्या खात्यातून ट्रान्सफर झालेल्या ४९ लाख रुपयांपैकी ज्या बँकेच्या खातेधारकाच्या नावाने रक्कम जमा झाली, त्याचे खाते गोठवण्यात आले. एकूण ३१ लाख रुपये गोठवण्यात यश मिळाले. आरोपींकडून नगदी १,३०,००० रुपये व ३ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक बालकृष्ण जाधव तसेच सायबर सेल येथील तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक सुगत पुंडगे, सायबर सेल यांच्या संयुक्त पथकाने केला.

### नाशिक : मोबाइल वॉलेट फसवणूक

एका अज्ञात इसमाचा पोलिसांकडे तक्रार केलेल्या अर्जदारास फोन आला, 'मी बँकेतून बोलतोय, तुमचे कार्ड बंद होणार आहे. तुम्ही तुमचा आधार कार्ड आणि एटीएम कार्ड नंबर सांगा. तुमच्या मोबाइलवर आलेला ओटीपी (वन टाइम पासवर्ड) सांगा.' संबंधित अर्जदाराने विशेष खात्री न करता ही माहिती दिली. त्यानंतर त्याच्या बँक खात्यातून १,८५,००० रुपये काढून घेण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर संबंधिताने सायबर सेलकडे तक्रार केली. या प्रकरणाच्या चौकशीत आरोपीने पैसे कोणत्या मोबाइल वॉलेटवर वळते केले याची माहिती काढण्यात आली. त्यावरून झिप कॅश, वन नाईंटी सेव्हन कम्युनिकेशन, पेटीएम, ऑक्सिजन वॉलेटवर व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले. हे व्यवहार स्थगित करून आरोपीची संपूर्ण माहिती मिळवण्यात आली. पेटीएम वॉलेट व ओला कॅब यांनी व्यवहार प्रक्रिया थांबवली. त्यामुळे अर्जदाराचे १,०२,७३४ रुपये परत मिळवता आले आहेत.

अर्जदाराच्या ॲक्सिस बँकेतील चालू खात्यातून ३६,६२९ रुपये अज्ञात इसमाने ऑनलाइन पद्धतीने पैसे काढून घेतले. अर्जदार यांना कोणत्याही प्रकारचा ओटीपी आलेला नव्हता. अर्जदाराने त्याच्या बँक खात्याची गोपनीय माहिती कुणालाही सांगितली नसताना त्याच्या खात्यातून पैसे काढण्यात आले. चौकशीमध्ये हा आंतरराष्ट्रीय गैरव्यवहार असल्याचे निदर्शनास आले. रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शन सूचनांनुसार अशी फसवणूक झाल्यास संबंधित बँकेने तक्रारदारास संपूर्ण रक्कम देण्याची तरतूद आहे. ॲक्सिस बँकेशी सायबर पोलिसांनी सातत्याने पाठपुरावा करून अर्जदाराची संपूर्ण रक्कम मिळवून दिली.

### औरंगाबाद : एटीएम कार्ड अदलाबदल

एटीएम कार्डच्या अदलाबदलीद्वारे फसवणूक करणाऱ्या भामट्यांना औरंगाबाद ग्रामीण पोलिसांनी तत्काळ कार्यवाही करून पकडले. या भामट्यांनी वैजापूर येथील सुधाकर रंगनाथ म्हस्के यांची फसवणूक करून एटीएम कार्डाच्या अदलाबदलीद्वारे त्यांच्या खात्यावरून पैसे लंपास केले. श्री. म्हस्के यांच्या लक्षात ही बाब आल्यावर त्यांनी

ग्रामीण पोलिसांकडे तक्रार केली. या तक्रारीच्या आधारे सायबर सेल कार्यान्वित झाले. कसून तपासणी सुरू झाली. या तपासणीमध्ये हे भामटे रायपूर (छत्तीसगढ) येथील असल्याची प्राथमिक स्वरूपाची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे एक विशेष पथक आरोपीच्या शोधार्थ रायपूर (छत्तीसगढ)च्या दिशेने रवाना झाले. या पथकाने मोबाइल लोकेशनद्वारे संशयितांवर नजर ठेवली होती. या लोकेशनद्वारे हे भामटे बालाघाटच्या नजीक असल्याचे दिसून आले. अतिशय हुशारीने त्यांचा माग घेत एका हॉटेलमध्ये चार भामट्यांना पकडण्यात यश मिळाले.

त्यांच्याकडून ६५ एटीएम कार्ड, एक स्वीफ्ट कार जप्त करण्यात आले. या भामट्यांनी आतापावेतो जवळपास १०० लोकांना फसवल्याचे निदर्शनास आले. ही  कामगीरी डॉ. आरती सिंह (पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण); श्रीमती उज्वला वनकर (अपर पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण) यांच्या मार्गदर्शनानुसार, सुभाष भुजंग (पोलीस निरीक्षक); सय्यद मोसीन (पोलीस उपनिरीक्षक); रतन वारे (पोलीस हवालदार); पोलीस नायक किरण गोरे, रवींद्र लोंखडे, सागर पाटील, सुभाष ठोके, योगेश तरमाळे, योगेश दारवंटे, गजानन बनसोड यांनी यशस्वीपणे पार पाडले.

## ठाणे : संकेतस्थळ फसवणूक

महाराष्ट्रातील सर्वात मोठी सायबर लॅब ठाणे शहर आयुक्ताच्या कार्यालयात सुरू करण्यात आली आहे. ही लॅब सुरू झाल्याबरोबर ठाणे शहरात घडणाऱ्या सायबर गुन्ह्यांचा छडा लावण्याचे काम अधिक जोमाने सुरू झाले.



नव्याने स्थापन करण्यात आलेल्या या लॅबकडे अत्याधुनिक वर्कस्टेशन, उच्चक्षमतेचे  लॅपटॉप, सीडीआर व आयपीडीआर यांचे विश्लेषण करणारे अद्ययावत सॉफ्टवेअर तसेच हार्डडिक्स व मोबाइल फोन ॲनेलायझर साधने यांचा उपयोग करून सायबर लॅबच्या कामात लक्षणीय प्रगती झाली आहे. या कामामध्ये पोलीस आयुक्त परमबीर सिंग व सह पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी प्राधान्याने लक्ष घातले. अप्पर पोलीस आयुक्त रानडे, पोलीस उपायुक्त भाजीभाकरे व सहायक पोलीस आयुक्त अवसरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर लॅबचे दैनंदिन कामकाज परिणामकारकरीत्या सुरू आहे.

ठाणे सायबर क्राइम सेलकडे १) फोन करून एटीएम क्रमांक व ओटीपी मागून घेणे व त्याद्वारे आर्थिक फसवणूक करणे २) लग्नाचे तसेच नोकरीचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करणे ३) लोन देण्याचे आमीष दाखवून आर्थिक फसवणूक करणे व ४) समाजमाध्यमाकडून एखाद्या व्यक्तीस विशेषत: स्त्रियांना त्रास देणे अशा प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद होत असते.

लोन फ्रॉड म्हणजे कर्ज देतो असे आमीष दाखवून पैसे उकळणाऱ्या तीन टोळ्यांचा पर्दाफाश ठाणे सायबर लॅब यांनी केला आहे.

सध्या लग्नासाठी जोडीदार सुचवणाऱ्या अनेक संकेतस्थळे इंटरनेटवर उपलब्ध आहेत. या संकेतस्थळाच्या मदतीने महिलांना फसवले जाते. अशा प्रकारे विवाहोत्सुक महिलांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या २ नायजेरीयन व्यक्तींना दिल्ली येथून अटक करण्यात यश मिळाले.

## सायबर क्लब व पोलीस – पब्लिक पार्टनरशिप

नाशिक पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांनी शहरात सायबर जाणिवजागृती कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. या संकल्पनेनुसार, नाशिक शहरातील नागरिक, व पोलीस प्रशासन यांनी एकत्रित येऊन पोलीस पब्लिक पार्टनरशिप हा उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये वेगवेगळ्या महाविद्यालयांमधील विद्यार्थी–विद्यार्थिनी, सायबर फॉरेन्सिक तज्ज्ञ, व पोलीस मिळून जनतेला सायबर गुन्हेगारी कशी, कोठे, का, कोणामुळे व कोणकोणत्या प्रकारे घडत असते, त्याबद्दलचे सर्व ज्ञान देण्यात येते. त्यासाठी सायबर क्लबची स्थापना करण्यात आली आहे.

सायबर जाणिवजागृती उपक्रमांतर्गत नाशिक शहरातील १२५ शाळा व महाविद्यालयातील सुमारे ९७,७२२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थी, सहभागी कर्मचारी, अधिकारी, प्रमुख सुरक्षा कर्मचारी, अधिकारी यांना स्मार्ट फोन, इंटरनेट, समाजमाध्यमाचा वापर, सुरक्षितता कशी राखवी, व्हॉटस्ॲप बाबतची सुरक्षितता विषयक खरबरदारी, ऑनलाइन शॉपिंग, ए.टी.एम., वापर व सुरक्षित उपाययोजना, मशीनचे प्रकार, यांचा वापर, नोकरीचे आमीष दाखवून फसवणूक, फेक मेसेजेस, कॉल पासवर्ड, ओ.टी.पी. व इतर संबंधित माहितीही देण्यात येते.

समाज माध्यमांमध्ये नाशिक शहर पोलिसांचे सायबर क्लब व सायबर जाणिवजागृतीविषयक फेसबुक पेज NashikCityPoliceCyberSecurity तयार करण्यात आले आहे. व्हॉटस्ॲप ग्रुप करून नागरिकांनाही त्यात सामावून घेण्यात येत आहे. व्हॉटस्ॲप क्रमांक ९७६२१००१०० असा असून, त्यावरही टाकण्यात येते. संकेतस्थळही तयार करण्यात आले असून, www.cyber.nashikpolice.com वर नागरिक संपर्क साधू शकतात.

शहरातील सायबर गुन्हेगारीवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस आयुक्तालयात स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले आहे. नाशिकमध्ये मुंबईव्यतिरिक्त राज्यातील पहिल्या फॉरेन्सिक लॅबची स्थापना करण्यात आली.

अद्ययावत प्रणालींनी परिपूर्ण असे पहिले सायबर पोलीस ठाणे हे नाशिक शहरातील आडगांव येथे स्थापन करण्यात आले आहे.



## सागरी सुरक्षेचे स्तर

- **पहिला टप्पा:** सागरी किनाऱ्यापासून १२ नॉटिकल मैलांपर्यंत – (महाराष्ट्र पोलीस) पोलीस आयुक्तालय/जिल्हा सागरी पोलीस.
- **दुसरा टप्पा:** १२ नॉटिकल मैलापासून २०० नॉटिकल मैलांपर्यंत – भारतीय तटरक्षक दल.
- **तिसरा टप्पा:** २०० नॉटिकल मैलांपासून आंतरराष्ट्रीय सीमेपर्यंत – भारतीय नौदल.

# सागरी सुरक्षिततेची सज्जता

**छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संरक्षणासाठी सागरी धोके ओळखून सागरी सुरक्षेसाठी १७ व्या शतकात आरमाराची स्थापना केली. यावरून सागरी सुरक्षेचे महत्त्व आपल्या लक्षात येते. अलीकडच्या काळात समुद्रमार्गे असलेले धोके ओळखून सागरी सुरक्षेसाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध यंत्रणांनी उपाययोजना केल्या आहेत. या यंत्रणांपैकीच एक आहे, महाराष्ट्र पोलिसांच्या गुप्त वार्ता विभागांतर्गत कार्यरत, सागरी सुरक्षा विभागाने केंद्रीय यंत्रणांच्या खांद्याला खांदा लावून सागरी सुरक्षेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.**

**किशोर गांगुर्डे**

देशाला ७५१६.६ कि.मी लांबीचा सागरी किनारा लाभला असून त्यात गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, ओरिसा, आणि पश्चिम बंगाल या राज्यांसह दमन–दीव, लक्षद्वीप, पुदुच्चेरी आणि अंदमान निकोबार या केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. महाराष्ट्रालाही ७२० कि.मी. लांबीची सागरी किनारपट्टी लाभली असून ती पालघर, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांमध्ये विभागली आहे. समुद्रामार्गे स्फोटके, शस्त्रास्त्रे, दारुगोळा यांची अवैधपणे होणारी वाहतूक रोखण्याबरोबरच; देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ नये यासाठी दहशतवाद्यांची घुसखोरी, परकीय हल्ले रोखणे, सागरी मार्गाने होणारी तस्करी रोखणे आणि समुद्र किंवा किनारा भागात गुन्हेगारी कारवायांचा बीमोड करण्यासाठी सागरी सुरक्षेच्या विविध उपाययोजना अहोरात्र राबवल्या जात आहेत.

### बळकट सागरी सुरक्षा

सागरी मार्गाने असणारे धोके लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने सागरी सुरक्षा बळकट केली आहे. केंद्र शासनाच्या सागरी सुरक्षा योजनेतूनही समुद्र किनाऱ्यांची सुरक्षा मजबूत करण्यात येत आहे. आजमितीस एकूण ४४ सागरी पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून सागर किनाऱ्यांची सुरक्षा पाहिली जात असून या सर्व पोलीस ठाण्यांना अत्याधुनिक शस्त्रे, उपकरणे–साधनसामग्री पुरवण्यात आली आहे. गस्तीसाठी स्पीड बोटी, फायबर बोटी, सी–लेग्ज आदी गस्तीसाठी सागरी पोलीस ठाण्यांना देण्यात आले आहेत. समुद्री किनाऱ्यांकडे जाणाऱ्या मार्गांवर सागरी तपासणी

आपले पोलीस, आपली अस्मिता

नाके (चेक पोस्ट) उभारण्यात आले आहेत. पोलिसांच्या गस्ती नौकांवर नियंत्रणासाठी किनाऱ्यालगत ऑपरेशनल रूम बांधण्यात आल्या असून टेहळणीसाठी मनोरेदेखील उभारण्यात आले आहेत. सागरी सुरक्षेसाठी आवश्यक तांत्रिक, बोट दुरुस्ती, जीवरक्षक उपकरणे, बोट चालवण्यासह, गोळीबार आदींचे प्रशिक्षणदेखील या सागरी पोलिसांना भारतीय तटरक्षक दलाच्या वतीने नियमित देण्यात येत आहे. सागरी हद्दीतील १२ नॉटिकल मैलापर्यंतचे गुन्हे संबंधित सागरी पोलीस ठाण्यात तर त्यापुढील महाराष्ट्राच्या सागरी हद्दीतील गुन्हे मुंबईच्या यलोगेट पोलीस ठाण्यांमध्ये नोंदवून तपास केला जातो.

सागरी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या मासेमारी बोटींच्या ओळखीसाठी १८७९५ नोंदणीकृत बोटींना जिल्हानिहाय सांकेतिक रंग देण्यात आले आहेत. संवेदनशील ठिकाणी लॅन्डिंग पॉईंटस निश्चित करण्यात आले असून मत्स्यव्यवसाय विभागातर्फे प्रशिक्षित सुरक्षा रक्षक व पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले आहे. मासेमारी करणाऱ्यांना बायोमॅट्रिक कार्ड देण्यात आलेले आहेत.

सागरी किनाऱ्यालगतच्या सर्व सातही जिल्ह्यांमध्ये पाच हजार नऊशेपेक्षा अधिक सदस्य असलेल्या ५०६ सागर रक्षक दलांची निर्मिती करण्यात आली आहे. या सदस्यांसह सर्व मच्छीमार सोसायटींना वेळोवेळी सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मोबाइल संदेशाद्वारे सतर्क, दक्ष केले जाते.

मोफत कोस्टल हेल्पलाइन सेवा (क्रमांक १०९३) सुरू करण्यात आली आहे. सागरी सुरक्षेसंबंधी सर्वसमावेशक नियंत्रण व आणीबाणीच्या स्थितीत योग्य समन्वयासाठी नौदल, कस्टम, तटरक्षक दल, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मत्स्यव्यवसाय विभाग आणि सागरी पोलिसांचे 'संयुक्त अभियान केंद्र' सुरू करण्यात आले आहे. त्याशिवाय सागरी सुरक्षेचा आढावा आणि गुप्तवार्ता देवाणघेवाणीकरिता राज्य आणि जिल्हास्तरावर सागरी सुरक्षा समन्वय समिती गठित करण्यात आली आहे.

## ...आणि प्राण वाचले

- १३ जानेवारी २०१७ – मालवण बंदरासमोर ९ नॉटिकल मैल अंतरावर किंगफ़िशर ही मच्छीमार बोट गिअर शाफ्ट तुटल्याने बंद असून बोटीत १० मच्छीमार असून बोटीत पाणी शिरत असल्याने मदत मिळण्याचा संदेश रत्नागिरी कोस्टगार्डकडून आला. सिंधुदुर्ग–५, अप्सरा आणि पावनाई तसेच वेंगुर्ला बंदर येथून पंचगंगा बोटीसह पोलीस अधिकारी–कर्मचाऱ्यांनी रात्री 'किंगफिशर' बोटीचा शोध घेऊन सुरक्षितपणे बोटीवरील इसमांना मालवण बंदरात आणले.
- ४ सप्टेंबर २०१७ रोजी मुंबई–अहमदाबाद मार्गावरील घोडबंदर येथील पुलावरून एका तरुणाने आत्महत्येच्या उद्देशाने खाडीत उडी मारली. यावेळी घोडबंदर खाडीत सागरी गस्तीसाठी तैनात 'उत्तन' या पोलीस बोटीवरील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी विलंब न करता या तरुणाला वाचवले.

### सागरकवच आणि सागरसजग

सागरी सुरक्षा यंत्रणांची तत्परता आणि प्रतिसादासाठी तटरक्षक दलामार्फत 'सागरकवच' आणि 'सागरसजग' अभियान राबवण्यात येत असून समुद्र अथवा सागर किनाऱ्यावरील आक्षेपार्ह हालचालींची माहिती पोलिसांना देता यावी यासाठी सागरी जिल्हा नियंत्रण कक्षात



### सागरी सुरक्षा दल

सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी केंद्रीय पोलीस दलाच्या धर्तीवरच स्वतंत्र सागरी सुरक्षा दलाची स्थापना करावी अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. जून २०१६ मध्ये मुंबईत केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी केलेल्या या मागणीला श्री. सिंह यांनी सकारात्मकता दाखवली असून, सागरी सुरक्षेसाठी केंद्रीय सागरी पोलीस दल स्थापण्यास मान्यता दिली आहे. महाराष्ट्र पोलिसांचा सागरी सुरक्षा विभाग राज्याच्या सागरी किनाऱ्यांच्या सुरक्षेसाठी केंद्रीय यंत्रणांच्या बरोबरीने प्रयत्नशील आहे. दिवसरात्र सागरप्रहरीची भूमिका बजावणाऱ्या या सागरी पोलिसांच्या सुरक्षेमुळे समुद्रमार्गे होणाऱ्या विघातक कारवाया, अनधिकृत प्रवेश आणि गुन्हेगारी कृत्यांना पायबंद बसण्यास मदत होत आहे.

**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**



**नागरिकांच्या जीविताचे आणि मालमत्तेचे रक्षण करणे हे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. पोलीस ही जबाबदारी चोखपणे बजावत आहेत. या कामी त्यांना महत्त्वपूर्ण मदत लाभते ती होमगार्ड यांची. निकड भासते तेव्हा कामावर हजर होऊन स्वत:ची सामाजिक प्रतिष्ठा विसरून, हे सुजाण नागरिक गृहरक्षक (होमगार्ड) या नात्याने कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आपले कर्तव्य पार पाडतात.**

# गृहरक्षक : निष्काम सेवा

**वामन धकाते**

देशाला आतापर्यंत महाराष्ट्राने विविध योजना/संकल्पना दिलेल्या आहेत, त्यामध्ये होमगार्ड (गृहरक्षक) या महत्त्वाच्या मानसेवी संघटनेच्या संकल्पनेचाही समावेश होतो. मानसेवी तत्त्वाच्या पायावर उभारलेल्या या संघटनेचा आदर्श केंद्र शासनाने देशामधील इतर राज्यांपुढे ठेवला. १९५९ मध्ये केंद्र शासनाने तशी शिफारस इतर राज्यांना केली. त्यानुसार सद्य:स्थितीत देशातील बहुतांश राज्यामध्ये होमगार्ड संघटना कार्यरत आहे.

समाजातील विविध स्तरांतील पुरुषांबरोबर महिलासुद्धा गृहरक्षक दलामध्ये दाखल होऊन, दैनंदिन जीवनाच्या व व्यवसायाच्या चाकोरी बाहेर जाऊन त्या सेवा करतात. समाजात कायदा व सुव्यवस्था टिकून राहावी यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले जाते. जरुरीच्या प्रसंगी कामावर हजर होऊन स्वत:ची सामाजिक प्रतिष्ठा विसरून होमगार्ड या नात्याने ते कर्तव्य पार पाडत असतात.

## संघटनेची स्थापना

तत्कालीन मुंबई राज्यामध्ये १९४६ मध्ये होमगार्ड संघटनेची स्थापना केली गेली. हे दल पूर्णत: ऐच्छिक स्वरूपाचे आहे. १९४७ मध्ये मुंबई होमगार्ड अधिनियम विधानमंडळाने मंजूर केला. त्यानंतर या संघटनेला कायद्याने अधिष्ठान प्राप्त झाले.

## कर्तव्य

पोलीस दलाला अंतर्गत सुरक्षा राखण्याच्या कार्यात साहाय्यकारी दल म्हणून काम करणे हे होमगार्ड संघटनेचे प्रमुख कर्तव्य आहे. याव्यतिरिक्त शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या कार्यात होमगार्ड अधिनियमानुसार बरीचशी कर्तव्ये साहाय्यकारी दल म्हणून होमगार्डकडून पार पाडली जातात. उदा. अग्निशमन, विमोचन, पूरपरिस्थिती, भूकंप, वादळे इ. आपत्कालीन अथवा संपकालीन परिस्थितीमध्ये जीवनावश्यक सेवा चालू ठेवणे, जीवनाश्यक वस्तूंचा पुरवठा अबाधित ठेवणे याबाबत होमगार्ड संघटनेला जबाबदारी उचलावी लागते. यासोबत समाजोपयोगी व कल्याणकारी योजना राबवण्यासाठीही होमगार्ड हातभार लावतात. उदा. वृक्षारोपण, नेत्रशिबिरे, शहर स्वच्छ मोहीम, इस्पितळातील रुग्णसेवा, अल्पबचत योजनेची अंमलबजावणी इ.



## संधी

होमगार्ड संघटनेत नोंदणी करण्यासाठी खालील अटी व शर्तींची पूर्तता होणे आवश्यक आहे. ■ वय २० वर्षे ते ५० वर्ष या दरम्यान असावे. ■ शैक्षणिक अर्हता किमान १० वी उत्तीर्ण ■ पोलीस भरतीकरिता लागू असणाऱ्या अटी व शर्तींनुसार उंची व वजन आवश्यक ■ वैद्यकीय चाचणी व पोलीस चारित्र्य पडताळणीनुसार पात्र असणे आवश्यक ■ दैनंदिन गरजा भागवण्यासाठी स्वत:चा व्यवसाय किंवा नोकरी आवश्यक, बेरोजगारांची संघटनेत नोंदणी होत नाही.

सद्य:स्थितीत होमगार्ड्सना पोलीस भरती, वनरक्षक व फायरमन या पदांसाठी संबंधित आस्थापनांमध्ये ठेवलेल्या अटी व शर्तींच्या अधीन ५% आरक्षण ठेवण्यात येते. त्याचा लाभ होमगार्ड्सना होत आहे.

## प्रशिक्षण

होमगार्ड्सना प्रशिक्षण देण्यासाठी जिल्हा प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या केंद्रातून जिल्हा स्तरावरील प्राथमिक व उजळणी अशा दोन स्वरूपांचे प्रशिक्षण दिले जाते. जिल्हास्तरावरील प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर राज्यस्तरावरील मध्यवर्ती प्रशिक्षण संस्थेमध्ये कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक इतर प्रगत प्रशिक्षण दिले जातात.

इतर बंदोबस्तादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्याकामी होमगार्ड सर्वतोपरी मदत करतात. महिला रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे पोलिसांना साहाय्यक म्हणूनसुद्धा होमगार्ड कर्तव्ये बजावत आहेत.

**वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, गृहरक्षक दल**

## राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण

# संधी न्यायाची...

उमाकांत मिटकर



**पोलिसांविरुद्धच्या तक्रारींसाठी स्वतंत्र प्राधिकरण करावे या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलीस तक्रार प्राधिकरण कार्यान्वित करण्यात आले आहे. नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती व नवी मुंबई या पाच ठिकाणी हे प्राधिकरण स्थापण्यात येईल. पुणे येथील विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण सुरू झाले आहे. सहायक पोलीस आयुक्त, पोलीस उप विभागीय अधिकारी या पदापासून थेट पोलीस महासंचालक पदापर्यंतच्या सर्व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांबाबत राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे तक्रारी करता येतात. पोलीस शिपाई ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदापर्यंतच्या तक्रारी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण कार्यालयात करता येतात.**

केंद्र सरकारने पोलीस व्यवस्थेतील सुधारणांसाठी वेळोवेळी आयोग व समित्या नेमल्या होत्या. राष्ट्रीय पोलीस आयोग रिबेरा समिती, सोली सोराबजी यांच्या नेतृत्वाखालील पोलीस कायदा मसुदा समिती हा त्याचाच एक भाग. पोलीस कायदा मसुदा समितीने प्रत्येक राज्यात राज्यस्तरीय व विभागस्तरीय पोलीस तक्रार निवारण प्राधिकरण स्थापण्याची तरतूद २००६ मध्ये आदर्श पोलीस कायद्यात केली. विविध अहवालांच्या आधारे सर्वोच्च न्यायालयानेही २२ सप्टेंबर २००६ रोजी प्रकाश सिंग व अन्य, विरुद्ध केंद्र सरकार या प्रकरणात एक ऐतिहासिक निकाल दिला. पोलीस विभागात कायदा व सुव्यवस्था आणि गुन्ह्यांचा तपास असे दोन वेगळे विभाग असावेत. तसेच नागरिकांच्या पोलिसांविरुद्धच्या तक्रारींसाठी स्वतंत्र प्राधिकरण करावे, असे निर्देश दिले. पोलिसांनी आपले कर्तव्य जबाबदारीपूर्वक व कायद्याला अनुसरून पार पाडावे आणि प्रत्येक कृती कायद्याला धरूनच करावी, हा उद्देश त्यामागे होता. गृह विभागाने २५ जुलै २००८ रोजी राज्य व विभागस्तरीय पोलीस तक्रार निवारण प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारने प्राधिकरणांच्या स्थापनेसाठी २५ जून २०१४ रोजी महाराष्ट्र पोलीस कायद्यात सुधारणा केली. दरम्यान २०१४ च्या एका फौजदारी रिट याचिकेच्या निमित्ताने हा विषय पुन्हा एकदा उच्च न्यायालयासमोर आला. तेव्हा शासनाने हा विषय गांभीर्याने घेऊन राज्यस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरण कार्यान्वित केले. प्राधिकरणाने दिलेला निकाल, तक्रारदाराला अमान्य असल्यास त्याविरोधात उच्च न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

### तक्रारी कशा संदर्भात करता येतील?

नागरिकांना पोलिसांविरुद्ध या प्राधिकरणाकडे तक्रार करता येईल. कोणत्याही पोलिसांविरुद्ध गंभीर आरोप किंवा तक्रार आली तर प्राधिकरण स्वत:हून त्याविषयी चौकशी करू शकते. अशी प्रकरणे सरकारकडून प्राधिकरणाकडे सोपवली जाऊ शकतात. त्याचबरोबर पीडित व्यक्ती अथवा त्यांच्या वतीने कुटुंबीय किंवा साथीदाराकडून, एखाद्या प्रत्यक्षदर्शीकडून, पोलीस विभाग किंवा राष्ट्रीय वा राज्य मानवाधिकार आयोगासारख्या विविध मंचांकडूनही प्राधिकरणासमोर तक्रार मांडली जाऊ शकते. चौकशीत पोलिसाने गैरकृत्य केल्याचे निष्पन्न झाले तर प्राधिकरण संबंधित पोलिसांविरुद्ध विभागीय शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करू शकते. कायद्याचे उल्लंघन करून गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले तर त्याच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याची शिफारस करू शकते. प्रसंगी पीडित व्यक्तीला नुकसानभरपाई देण्याची शिफारसही राज्य सरकारला करू शकते. तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी संबंधित साक्षीदारांना बोलावण्याचे अधिकार दिवाणी न्यायालयाप्रमाणे या प्राधिकरणालाही असतील. तसेच पुरावे म्हणून सरकारी कागदपत्रे मिळवणे, प्रतिज्ञापत्रावर पुरावे गोळा करणे आदी अधिकारही प्राधिकरणाला असतील. आवश्यकता भासल्यास तक्रारदाराला संरक्षण देण्याचे निर्देशही प्राधिकरण सरकारला देऊ शकते.


### येथे साधा संपर्क

दक्षिण मुंबईतील महर्षी कर्वे रोडवरील कूपरेज एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज इमारतीत चौथ्या मजल्यावर राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे कार्यालय सुरू झाले आहे. कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २२-२२८२००४५/४६/४७ व ई-मेल mahaspca@gmail.com आहे. माजी न्यायमूर्ती ए.व्ही.पोतदार यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक प्रेम कृष्ण जैन, उमाकांत मिटकर हे सदस्य आहेत.

**सदस्य, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण**
**संपर्क: ०९४२१४८०८७४**

**निवृत्त ज्येष्ठ पोलीस महिला अधिकारी मीरा चड्ढा-बोरवणकर यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीवर आधारित प्रेरणादायी पुस्तक लिहिले आहे. हे आजच्या तरुणतरुणींना मोठी ऊर्जा देणारे आहे.**

# प्रेरणादायी ऊर्जा




भारतातील दोन महिला आयपीएस अधिकारी पोलीस सेवेत येणाऱ्या तरुणींसाठी 'आयडॉल' आहेत. त्यात पहिले नाव आहे. किरण बेदी यांचं. दुसरे नाव म्हणजे मीरा चड्ढा-बोरवणकर. मीरा बोरवणकर या १९८२ च्या भारतीय पोलीस सेवेतील तुकडीच्या अधिकारी. पोलीस सेवेत त्यांनी जवळपास ३५ वर्षे काम केले. त्या मूळच्या पंजाबच्या मात्र, त्यांची पोस्टिंग महाराष्ट्रात झाल्याने त्यांची बरीच वर्षे महाराष्ट्रात झाली. त्यांना महाराष्ट्रात नाशिक, कोल्हापूर, मुंबई पुणे औरंगाबाद अशा वेगवेगळ्या ठिकाणी महत्त्वाच्या पदांवर काम करण्याची संधी मिळाली. त्या अत्यंत शिस्तीच्या, संयमी, संवेदनशील आणि प्रामाणिक पोलीस अधिकारी असल्याने, त्यांनी सेवा काळात गुन्हेगारांवर वचक ठेवून आपल्या कर्तृत्वाचा एक वेगळा ठसा पोलीस प्रशासनात उमटवला. ३५ वर्षांच्या काळात त्यांना अनेक बरेवाईट अनुभवही आले.

## प्रेरणादायी अनुभवकथन

या अत्यंत आव्हानात्मक असलेल्या पोलीस सेवेत तरुण मुलामुलींनी यावं, आपल्या पोलीस सेवेतील अनुभवांचा १४ ते २५ या वयोगटातल्या तरुणतरुणींना फायदा व्हावा असे त्यांना वाटते. त्या म्हणतात, 'मागे वळून पाहताना मला वाटते की, मला कोणीतरी अशी कथा सांगणारे, प्रेरणा देणारे लाभले असते तर फार बरे झाले असते. कदाचित आयुष्याच्या सुरुवातीलाच मी थोडी निर्धास्त झाले असते. ही उणीव भरून काढण्यासाठी त्यांनी 'माझ्या आयुष्याची पाने' हे पुस्तक लिहिले आहे.' हे पुस्तक एका वेगळ्याच धाटणीचे असल्याने अल्पावधीतच या पुस्तकाचा विक्रमी खप झाला आहे. या पुस्तकाची वैशिष्ट्ये म्हणजे हे पुस्तक अत्यंत छोटेखानी व सुटसुटीत आहे. पुस्तकात छोटछोटी २७ प्रकरणे आहेत. या प्रत्येक प्रकरणात एक घटना किंवा त्यांचे अनुभव त्यांनी विषद केले आहेत व त्यातून वाचकाने काय अनुबोध घ्यावा, हे सांगितले आहे.

## योग्य दिशा देण्यासाठी कृती

या पुस्तकात त्यांनी पोलीस सेवेत हाताळलेले अगदी हलकेफुलके प्रसंगही सांगितले आहेत. आयुष्य आणि करिअरला योग्य दिशा देण्यासाठी तरुणांनी कृती कशी करावी याबद्दल काही मुद्देही त्यांनी या पुस्तकात मांडले आहेत. या पुस्तकात सांगितलेले अनुभव, विचार तुम्ही पटले तर घ्या. कारण प्रत्येकाचा अनुभव वेगळा असू शकतो, असं पुस्तकाच्या सुरूवातीलाच प्रांजळपणे त्यांनी नमूद केलं आहे.

## आंतरिक इच्छेला महत्त्व

जीवनामध्ये आंतरिक इच्छेला फार महत्त्व असते, असे त्या लिहितात. तीस-पस्तीस वर्षांपूर्वी नागरी सेवेची परीक्षा देत असताना इंग्रजी विषयात जास्त गुण मिळू शकत नाहीत, असे माझ्या बहिणीचे मत होते. त्यामुळे पदव्युत्तर पदवीच्या शिक्षणासाठी मी इतिहास विषय घ्यावा, अशी तिची इच्छा होती. पण माझी आंतरिक इच्छा आणि इंग्रजी भाषेवरील माझी हुकमत यामुळे मी इंग्रजी विषय घेतला तर मला भविष्यात लिखाणात उपयोग होईल, असे मला मनातून अगदी वाटत होते. मला जे वाटले तेच मी केले. तो माझ्यासाठी कसोटीचा क्षण होता. तेव्हा कोणत्याही समस्येचा तर्कसुसंगत विचार करून आपल्या आंतरिक इच्छेशी तोल साधावा असं त्या सांगतात.

जीवनामध्ये आव्हाने कशी येतात याबद्दल एक प्रकरण आहे. औरंगाबादला पहिल्या महिला जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून काम करण्याची संधी त्यांनी मिळाली. एके दिवशी त्या सुटी घेऊन दौलताबाद किल्ल्यावर आपल्या मुलासोबत फिरायला गेल्या होत्या. तेव्हा त्या साध्या कपड्यात होत्या. तिथे फिरायला आलेल्या परदेशी नागरिकांना अचानक गुंडांनी त्रास देण्याचा प्रयत्न केला. तेव्हा रजेवर आहेत हे विसरून त्या गुंडांना त्यांनी आव्हान दिले. त्या नागरिकांची सुटका केली. तेव्हा या प्रकरणात त्यांनी शिकण्यासारखी गोष्ट म्हणजे पोलीस कधी सुटीवर नसतात. कृती कशी कराल? तुम्हाला शक्य असेल तर संकटात असलेल्या अनोळखी व्यक्तीस मदत करा. प्रशिक्षणामध्ये आलेले अनेक अनुभवही या पुस्तकात त्यांनी नमूद केले आहेत. एकदा उंचीवर चढताना त्यांना भीती वाटू लागली. या वेळी त्यांचे प्रशिक्षक कडक असल्याने अन् योग्य वेळी त्यांनी मनोधैर्य एकवटल्याने त्यांनी एक अवघड कडा पार केला. स्वत:ची सर्वोत्कृष्ट कामगिरी पूर्ण करेपर्यंत माघार न घेण्याचा धडा त्या या प्रसंगातून शिकल्या.

(माझ्या आयुष्याची पानं, लेखिका : मीरा चड्ढा-बोरवणकर, अनुवाद : सायली गोडसे, प्रकाशक : विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे. पृष्ठे : ९४/ मूल्य : १२५ रुपये)

– **डॉ. बबन जोगदंड,** संपर्क: ०९८२३३३८२६६

# दीदीचे साहाय्य




**ज्येष्ठ नागरिक, तरुण महिला व मुली, विद्यार्थीनींच्या सुरक्षेचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर असतो. औरंगाबादमध्ये दामिनी पथक, दीदी, पीसीआर, चार्ली महिला पोलिसांच्या कडक पहाऱ्यामुळे छेडछाड, मंगळसूत्र चोरी, लुटमारी आदी गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. अडचणीच्या प्रसंगी पाच मिनिटांमध्ये हे पथक हजर होऊन गुन्हेगारांवर कारवाई करते.**

**संतोष देशमुख**

महिला सुरक्षेच्या दृष्टीने ८ जानेवारी २०१४ रोजी औरंगाबाद पोलीस आयुक्तांनी स्वतंत्र दामिनी पथकाची नियुक्ती केली. गेल्या चार वर्षांमध्ये या पथकाने अतुलनीय कामगिरी केली आहे. गुन्हेगारांना पकडण्यात या दामिनी तरबेज झाल्या आहेत.

## तत्काळ मदत

रोड रोमियो व व महिलांची छेडछाड करणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी दामिनी पथक पाच ते दहा मिनिटांत घटनास्थळी पोहोचते.१००, १०९१ या हेल्पलाइनवर तसेच पोलीस नियंत्रण कक्षात ०२४०-२२४०५०० या दूरध्वनीवर  दररोज १० ते २० कॉल येतात. जवळच्या ठिकाणी पाच मिनिटांत तर वाळूंज, मुकुंदवाडी, जळगाव टी पॉईंट तसेच निर्जळस्थळी पंधरा मिनिटात हे पथक पोहोचून कारवाई करते.

शाळ, महाविद्यालये, वसतिगृहे, शिकवणी वर्ग, विद्यापीठ, दोन बसस्थानक, रेल्वे स्थानक, उद्यान तसेच  ४५० निर्जनस्थळांवर दामिनी पथकाची सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत सूक्ष्म नजर असते. महिला, विद्यार्थीनींशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून त्या सोडवल्या जातात.

## चार्ली महिला पोलीस

सिटीचौक, क्रांती चौक, वेदांतनगर, सिडको पोलीस ठाणे आणि उस्मानपुरा येथे मोटार सायकलवर गस्त घालण्यासाठी विशेष चार्ली महिला पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिवस आणि रात्र अशा दोन शिफ्टमध्ये चार्ली महिला पोलीस महिलांना सुरक्षा प्रदान करतात.

## दीदी पोलीस पथक

औरंगाबाद शहरातील महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, छेडछाडीच्या घटना, मंगळसूत्र चोरी रोखण्यासाठी पीसीआर व दीदी महिला पोलीस पथकदेखील महत्त्वपूर्ण जबाबदारी बजावत आहे. यामुळे मंगळसूत्र चोरी व छेडछाडीच्या गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे. पोलीस आयुक्त यशस्वी यादव यांचे सर्व महिला पोलीस पथकांना वेळोवेळी मार्गदर्शन लाभते.

## महत्त्वपूर्ण जबाबदारी

औरंगाबाद शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी महिला पोलिसांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे. उपायुक्त डॉ. दीपाली धाटे -घाडगे, सहायक पोलीस आयुक्त डॉ. अनिता जमादार तसेच पोलीस निरीक्षक, महिला फौजदार, महिला पोलिसांची संख्या २०० हून अधिक आहे. महिला पीसीआर मोबाइल व्हॅन, चार्ली महिला पोलीस, वरिष्ठ महिला पोलीस अधिकारी रात्रभर गस्त घालत असल्याने, शहरातील महिला सुरक्षितेचा अनुभव घेत आहे. व्हॅन चालवण्यासाठी, एवढेच नव्हे तर, अधिकारी, आरोपींची ने आण करणे असो की, व्हीआयपी ताफ्यात पायलट वाहनचालक म्हणून असो अशा २० पेक्षा अधिक महिला पोलीस चालक म्हणून कर्तव्य बजावत आहेत.

**दिव्य मराठी पत्रकार, औरंगाबाद**

## हेल्पलाइन


अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी  १००, १०९१ या हेल्पलाइ, नियंत्रण कक्ष ०२४०-२२४०५०० तसेच पोलीस आयुक्तालयाचे ७७४१०२२२२२ व ८३९००२२२२२ हे व्हॉटसअॅप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यावर संपर्क साधताच त्वरित मदत प्राप्त होते.


# संपर्कदूत 'दक्षता'


**दक्षता मासिकाने पोलीस व सामान्य जनता यांच्यामधील दुव्याची भूमिका गेल्या ४४ वर्षांपासून यशस्वीपणे पार पाडली आहे.**

**यशवंत व्हटकर**

महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र समजले जाणाऱ्या 'दक्षता' मासिकाचा पहिला अंक १९७४ सालच्या सप्टेंबर महिन्यात प्रसिद्ध झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात जनता ज्या विरोधी भावनेने पोलिसांकडे पाहत होती त्या भावनेत स्वातंत्र्यानंतर २५-२६ वर्षे उलटून गेल्यावरही फारसा फरक पडलेला नव्हता याचे प्रमुख कारण म्हणजे पोलीस व जनता यांच्यामधील संपर्क व सहकार्याची कमतरता हे तत्कालीन वरिष्ठांनी जाणले होते. ही कमतरता दूर करण्यासाठी पोलीस व जनता यांच्यामधील एक दुवा म्हणून हे मासिक सुरू व्हावे यासाठी तत्कालीन गृहराज्यमंत्री शरद पवार व महाराष्ट्र पोलीस दलाचे तत्कालीन पोलीस महानिरीक्षक अ.ग. राजाध्यक्ष यांच्या विशेष प्रयत्नाने सप्टेंबर १९७४ पासून 'दक्षता' मासिक चालू झाले. या मासिकाच्या पहिल्या सल्लागार मंडळात प्रख्यात कवी व लेखक ग. दि. माडगूळकर, मुकुंदराव किर्लोस्कर, मधु मंगेश कर्णिक व वसंत सबनीस हे मान्यवर होते. या मासिकाचे पहिले संपादक होण्याचा मान महाराष्ट्र पोलीस दलाचे तत्कालीन जनसंपर्क अधिकारी वा. कृ. जोशी यांच्याकडे जातो. या मासिकाच्या पहिल्या अंकाच्या प्रस्तावनेत तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून जनतेच्या मनात पोलिसांबद्दल असलेल्या दुराव्याची परिस्थिती बदलून नागरिकांचा मित्र व रक्षक ही पोलिसांची खरी भूमिका समजण्यास व त्यांची योग्य प्रतिमा जनमानसात निर्माण करण्यात हे मासिक साहाय्यक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. महाराष्ट्रातील जनमानसात रुळलेले 'दक्षता' पाहून हे मासिक आजतागायत या अपेक्षेवर खरेच उतरले आहे. विविध क्षेत्रांमधील दिग्गजांच्या हस्ते सुरुवात झालेल्या या मासिकाने सप्टेंबर २०१७ मध्ये ४४ व्या वर्षात पदार्पण केले आहे.




## आमूलाग्र बदल

सुरुवातीच्या काळातील व आताच्या दक्षतामध्ये कालौघात आमूलाग्र बदल घडलेले आहेत. दक्षताने बदलत्या काळास अनुकूल असे रूप धारण करून, नेहमीच वाचकांच्या पसंतीस पात्र ठरण्याची किमया साधली आहे. पोलीस महासंचालक सतीश माथूर व अपर पोलीस महासंचालक व्ही. व्ही. लक्ष्मीनारायण यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली हे मासिक हे जास्तीत जास्त लोकाभिमुख व्हावे या उद्देशाने, गेल्या वर्षभरापासून उत्तमोत्तम साहित्यही वाचकांसाठी दिले जात आहेत. यामध्ये 'आत्म परम आत्म', 'मनभावन', 'रिलॅक्स झोन', इत्यादी सदरांमधून मनोरंजनातून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला जातो. गाजलेल्या व क्लिष्ट गुन्ह्यांच्या तपासकथा (उदा 'अंजनाबाई गावित यांचे निर्घृण बालहत्याकांड', 'इस्थर अनुह्या खून खटला', '२६/११ मुंबईवरील अतिरेकी हल्ला') वाचकांना रोमांचित करतात. पोलीस तपास कसा व कोणत्या परिस्थितीमध्ये केला जातो याचीही माहिती या कथांमधून मिळते. इतिहासावर आधारित लिखाण करणारे लेखकांचे विविध लेख वाचकांना फार आवडतात. विशेषतः रोहिदास दुसार यांचे माहितीपूर्ण असे पोलीस दलाचा ज्ञात-अज्ञात इतिहास उलगडून दाखवणारे लेख, इतिहासप्रिय वाचकांसाठी मेजवाणी ठरत आहेत. फ्लॅश बॅकमधून जुन्या व अतिशय गाजलेल्या अशा 'पाठलाग रंगा-बिल्लाचा', 'क्रुरकर्मा रामन राघव', 'ऑपरेशन खिंडीपाडा' यांचा समावेश आहे.

## आश्चर्यकारक आणि सकारात्मक

आजचा 'दक्षता' हा पारंपरिक पद्धतीने वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हेगार व गुन्ह्यांप्रतिच्या माहितीद्वारे वाचकांचे प्रबोधन करण्याबरोबरच वाचकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन चित्रकोडे व शब्दकोडे, प्रवास वर्णने, तरुणांसाठी करिअरविषयक मार्गदर्शनपर लेख, आरोग्यविषयक लेख व स्त्रियांसाठी विशेष पाककिया सदरे इत्यादी विविध प्रकारच्या साहित्याद्वारे वाचकवर्गात लोकप्रिय होण्यात यशस्वी ठरले आहे. दक्षताची मुखपृष्ठे नावीन्यपूर्णता व सुंदरतेबरोबरच दिसताक्षणीच मनाचा ठाव घेणारी असतात. दक्षतामधील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी पोलीस कामकाजाव्यतिरिक्त इतर गोष्टींमध्ये मिळवलेले विशेष प्रावीण्य, त्यांनी केलेल्या विशेष कामगिऱ्या, जोपासलेले छंद, पोलीस कल्याणविषयक वेगवेगळ्या योजनांबाबतची माहिती दिली जाते. यासोबतच पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहित करून अधिक चांगल्या कामगिरीसाठी उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. पोलीस

खात्यातील वेगवेगळ्या विभागांची उदाः लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाहतूक विभाग, गुन्हे शाखा, फोर्स–वन, राज्य पोलीस बल, रेल्वे पोलीस दल, मुंबई पोलीस दल, इत्यादींबाबत सविस्तर माहिती दिली जाते. विविध पोलीस घटकांमार्फत राबवण्यात येणाऱ्या जलसंधारण, वृक्षारोपण इत्यादी विविध उपक्रमांद्वारे समाजोपयोगी कार्याची वाचकांना माहिती करून देण्यात येते. ऑगस्ट २०१७ चा स्वातंत्र्यदिन तसेच गणेशोत्सव विशेषांकाची जास्त माहिती दृकश्राव्य पद्धतीने मिळावी या उद्देशाने प्रथमच क्यू.आर. कोडचा वापर करण्यात आला.

### दर्जेदार साहित्य

विविध प्रकारच्या दर्जेदार साहित्याने भरलेल्या या मासिकाची वाचकांनी आतुरतेने वाट पाहणे साहजिकच आहे. पूर्वी दहा पोलिसांमागे एक दक्षता मासिक असे असलेले प्रमाण आता हा अंक पोलीस अंमलदारांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देऊन, प्रत्येक पोलिसामागे एक अंक असे प्रमाण वाढवण्यात आले आहे. त्यामुळे नजीकच्या काळात सर्वात जास्त प्रती छापण्यात येणारे वाचकप्रिय मासिक असे नवीन रूप दक्षता मासिकास प्राप्त होणार आहे.




**सहायक पोलीस महानिरीक्षक तथा सरसंपादक (दक्षता मासिक)**

# संधी शिक्षणाची...



**राजेश सुर्वे**

पोलीस कल्याण निधीमार्फत पोलीस पाल्यांच्या शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर साहाय्य केले जाते. पोलीस कल्याण निधीमधून पोलीस विभागातील पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कल्याण निधीचे सभासद असलेले लिपिकवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांच्या इयत्ता ५ वी पासून पुढील विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या पाल्यांकरिता पाठ्यपुस्तके खरेदी करण्यासाठी पुस्तक अनुदानाची सुविधा उपलब्ध आहे. ही सुविधा ज्या शैक्षणिक वर्षात लागू होत असेल त्याच्या लगतपूर्वीच्या वार्षिक परीक्षेत निर्धारित केलेले गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या पोलीस पाल्यांना हे साहाय्य केले जाते.

ही सुविधा पोलीस विभागात सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या २ पाल्यांना त्या दिवंगत अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत, पदवी किंवा इयत्ता १२ वी नंतर फक्त ३ वर्षांपर्यंतच्या कोणत्याही अभ्यासक्रमासाठी देखील उपलब्ध असते. पुस्तक अनुदानासाठी अर्ज करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी एक विशेष सूचना म्हणजे त्यांच्या पाल्याच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत निकालाच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या हेतूने २०१७–१८ या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक प्रोत्साहन अनुदान योजनादेखील सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेत असलेल्या दोन मुलींना प्रत्येकी ५००/– रुपये या दराने शैक्षणिक प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. ते मिळवण्यासाठीचे अर्ज मुलींच्या शिक्षण घेत असल्याबाबतच्या शालेय प्रमाणपत्राच्या प्रतीसह प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑगस्टपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

| अभ्यासक्रम | गुण / श्रेणी (टक्केवारी) | देय असलेले अनुदान |
|---|---|---|
| इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत | ८५% किंवा किमान ३ विषयात अ–२ किंवा त्यावरील श्रेणी | रु. १,२५० |
| इयत्ता ११ वी/१२ वी | ८०% | रु २,५०० |
| वरिष्ठ महाविद्यायल/पोस्ट ग्रॅज्युएट/बीए /बी.कॉम, एम.ए., बीएएसी., एम एम. कॉम., हॉटेल मॅनेजमेट इत्यादी | ७०% | रु ३,७५० |
| अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) | ६५ % | रु३,७५० |
| वैद्यकीय पदविका/डी.फार्मसी | ६५ % | रु३,७५० |
| अभियांत्रिकी पदवी/पदव्युत्तर पदवी B.E/M.E | ६५ % | रु८,७५० |
| वैद्यकीय पशुवैद्यकीय पदवी पदव्युत्तर पदवी BPharm M Pharm | ६५ % | रु१८,७५० |

# २४ तास आपल्या सेवेत...

**संकटसमयी आठवतात ते पोलीस. अशा प्रसंगी पोलिसांशी तत्काळ संपर्क साधता यावा, यासाठी खालील दूरध्वनी, भ्रमणध्वनी तसेच व्हॉट्सॲप क्रमांकावर आपल्याला पोलिसांशी संपर्क साधता येईल..**

| पोलीस मुख्यालय, मुंबई | | | | |
|---|---|---|---|---|
| **कार्यालय** | **एसटीडी** | **टेलिफोन क्रमांक** | **फॅक्स क्रमांक** | **व्हॉट्सॲप क्रमांक** |
| पोलीस मुख्यालय, मुंबई | ०२२ | २२८२२६३१/ २२०२६६३६/२२०२६६८० | २२०२६५६६ | ७५०६७७७१००/ ७५०६८८८१०० |

| आयुक्तालय नियंत्रण कक्ष | | | | |
|---|---|---|---|---|
| **कार्यालय** | **एसटीडी** | **टेलिफोन क्रमांक** | **फॅक्स क्रमांक** | **व्हॉट्सॲप क्रमांक** |
| मुंबई शहर | ०२२ | २२६२१८५५/३०५४/ ५०२०/ २२६३३३३ | २२६३३३१९ | -- |
| नवी मुंबई शहर | ०२२ | २७५६१०९९/ २७५७४९२८/ २७५६६३७० | २७५७४९२९ | ८४२४८२०६६५, ८४२८८२०६८६ |
| ठाणे शहर | ०२२ | २५४४३६३६/ ३५३५/ २८२८/ २१२१/ ५३५३ | २५३४६६६० | ९७६९७२४१२७, ९९६९३६५१०० |
| पुणे शहर | ०२० | २६१२६२९६/ २६१२२८८०/ २६१२२२०२ | २६१२८१०५ | ८९७५२८३१००, ८९७५९५३१०० |
| नागपूर शहर | ०७१२ | २५६१२२२/ २५६४३३४/ २५६६८३२ | २५६६६६७ | ८०५५८७६७७३, ८०५५४७२४२२ |
| नाशिक शहर | ०२५३ | २३०५२३३/ २३०५२३४ | २३०५२१९ | ९६७३६७७७३१ |
| अमरावती शहर | ०७२१ | २५५१००० | २५५१०१० | ९९२३०७८६४६, ९९२३०७८६९६ |
| औरंगाबाद शहर | ०२४० | २२४०५०० | २२४०५९६ | ८३९००२२२२२, ७७४१०२२२२२ |
| सोलापूर शहर | ०२१७ | २७४४६००/ १०/ २० | २७४४६१८ | ९४२२९५०००३, ९४२३८८०००४ |

| प्रादेशिक आणि जिल्हा पोलीस नियंत्रण कक्ष | | | | |
|---|---|---|---|---|
| **पोलीस ठाणे घटक** | **एसटीडी** | **टेलिफोन क्रमांक** | **फॅक्स क्रमांक** | **व्हॉट्सॲप क्रमांक** |
| अमरावती रेंज | ०७२१ | २६६३२५६ | २६६३२५६ | ७७१९९८५०००, ७७१९९८६००० |
| अमरावती ग्रामीण | ०७२१ | २६६५०४१ | २६६५०४१ | ७०३८६५६५४१, ७०३८६२२६५१ |
| अकोला | ०७२४ | २४४५३३३/ २४३५५००० | २४४५३१७ | ८८०५४५११००, ८८०५४६११०० |
| बुलडाणा | ०७२६२ | २४२४०० | २४२२४३ | ९४२२८८०११३, ९४२२८८०२१३ |
| वाशिम | ०७२५२ | २३४८३४ | २३३१९१ | ८६०५१२६८५७, ८६०५८७८२५४ |
| यवतमाळ | ०७२३२ | २५६७०० | २५६७१० | ७२६४८९७७७२, ९०११८९९८८८ |
| औरंगाबाद रेंज | ०२४० | २३३४३२४ | २३५८७३३ | ९५२७४८२२२२, ९५२७४७२२२२ |
| औरंगाबाद ग्रामीण | ०२४० | २३८१६३३/ २३९२१६६/ १५१ | २३९२६३३ | ९८८१९३२२२२, ७७६८९३२२२२ |
| उस्मानाबाद | ०२४७२ | २२२७००/ २२२९०० | २२७६२६ | ७५८८५२७६२०, ७२१८८०४००० |
| बीड | ०२४४२ | २२२३३३/ २२३४१४ | २२१३३३ | ७७४९०८९१०२ |
| जालना | ०२४८२ | २२४८३३/ २२५१०० | २२५३५२ | ९६०४१२११००, ९६०४१६११०० |
| गडचिरोली रेंज | ०७१३२ | २२२४२२/ २२३०१२ | २२२४२२ | -- |
| गडचिरोली | ०७१३२ | २२२१००/ २२३१४२/ ९ | २२२५११ | ९४२१८४२३०२, ९४२२१५००८९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गोंदिया | ०७१८२ | २३६१०० | २३६०९८ | ९४०५८३११००, ९४०५८४११०० |
| कोल्हापूर रेंज | ०२३१ | २६६७५३३ | २६६७५३३ | ९५५२३२८३८३, ७२१८०३८५८५ |
| कोल्हापूर ग्रामीण | ०२३१ | २६६२३३३/ २६५३१३१ | २६५१९११ | ९५५२३२८३८३, ७२१८०३८५८५ |
| सांगली | ०२३३ | २६७२१००/ २६७१०५५ | २६७२३२३ | ९७३०९२८९५८, ७८७५७१४८८३ |
| सातारा | ०२१६२ | २३३८३३/ २३११८१ | २३०२३२ | ९०१११८१८८८ |
| पुणे ग्रामीण | ०२० | २५६५७१७१/ २५६७१९६२ | २५६७४६४१ | ९९२३४६३१००, ९४२२४०५४२१ |
| सोलापूर ग्रामीण | ०२१७ | २७३२०००/ ९/ १० | २७३२००८ | ७२६४८८५९०१, ७२६४८८५९०२ |
| नागपूर रेंज | ०७१२ | २५६१६२० | २५२८३१८ | -- |
| नागपूर ग्रामीण | ०७१२ | २५६०२००/ २५६६६५० | २५६०७७९ | ७७५८९०३०७९, ७७५८९०३०७५ |
| वर्धा | ०७१५२ | २३२५००/ २० | २३२५२१ | ८८८८६६७८१२, ८८८८३३८३५४ |
| भंडारा | ०७१८४ | २५२४०० | २५४२८७ | ९४०५८३११०० |
| चंद्रपूर | ०७१७२ | २५१२००/ २७३२५८ | २५५८०० | ९४०४८७२१०० |
| नांदेड रेंज | ०२४६२ | २५१२५३ | २५१४५१ | ७७९८७४४०४४, ८३०८९११२२२ |
| नांदेड | ०२४६२ | २३४७२०/ २३२८०६ | २३५१०३ | ८८८८८८९२५५ |
| परभणी | ०२४५२ | २२०१००/ २२६२४४ | २२३१५७ | ७७४५८५२२२२ |
| लातूर | ०२३८२ | २४२२९६ | २४३६३३ | ९२२७६४९१०० |
| हिंगोली | ०२४५६ | २२०२३२ | २२३२३३ | ९१५८०४४६२५, ९१५८०४२४८९ |
| नाशिक रेंज | ०२५३ | २५९८०११ | २५९८०११ | ८३९०८२४८३७, ८३९०८२९९३७ |
| नाशिक ग्रामीण | ०२५३ | २३०९७१५/ १७ | २३०९७१८ | ८३९०८२१९५२, ८३९०८२२३५२ |
| जळगांव | ०२५७ | २२२३३३३/ २२२५०३२/ २२२३५२३२, विस्तार – १०९१ | २२२०५११ | ९४२२२१०७०१, ९४२२२१०७०२ |
| धुळे | ०२५६२ | २८८२११/ २८८२१२ | २२९१८८ | ९४०४१५३५२०, ९४०४२५३५१९ |
| अहमदनगर | ०२४१ | २४१६१००/ २४१६१३२/ २४१६१३८ | २४१६१३३ | ९६६५८८७००९, ९१५६४३८०८८ |
| नंदूरबार | ०२५६४ | २१०१००/ ११० | २१०११० | ९४०५६२८३७१, ९४०५६२६३१५ |
| ठाणे रेंज | ०२२ | २७५७१५०३ | २७५७१५०३ | ९९८७१७८३८३ |
| ठाणे ग्रामीण | ०२२ | २५३४२७८४/ २५३०४८८३/ २५३९८५०० | २५३०४८७३ | ७०४५१००१११, ७०४५१००२२२ |
| पालघर | ०२५२५ | २९७००४/ २५२१००/ २५२३०० | २५२१०० | ९७३०८११११९, ९७३०७११११९ |
| रायगड | ०२१४१ | २२२१००/ २२२०२८/ २२८४७३ | २२८७८९ | ७०५७६७२२२७, ७०५७३६२२२६ |
| रत्नागिरी | ०२३५२ | २२२२२२/ २२३५३३/ २७१२५७ | २७१२५८ | ८८८८५०६१८१, ८८८८९०५०२२ |
| सिंधुदुर्ग | ०२३६२ | २२८२००/ १०९३ | २२८२०५ | ८२७५७७६२१३, ८२७५७७६२१६ |

**रेल्वे पोलीस नियंत्रण कक्ष**


| कार्यालयाचे नाव | एसटीडी | टेलिफोन क्रमांक | फॅक्स क्रमांक | व्हॉट्सअॅप क्रमांक |
|---|---|---|---|---|
| रेल्वे रेंज | -- | -- | २२०५११९१४ | -- |
| मुंबई रेल्वे | ०२२ | २३७५९२८३/ २३७५९२०१ | २३७५९२८० | ९८३३३१२२२२ |
| पुणे रेल्वे | ०२० | २५५४१६३१/ ५६ | २५५४१६३१ | ९४२२३२७१३०, ९४२२३२७१३१ |
| नागपूर रेल्वे | ०७१२ | २७४३९८४ | २७५५८३५ | ७७९८८८८८१३ |

सौजन्य: गृहविभाग









# वनवैभव आणि निसर्ग पर्यटन

**गोंदिया जिल्ह्याची निर्मिती निसर्गाने पर्यटनाच्या दृष्टीने केली असावी. या जिल्ह्यात फिरताना प्रत्येक तालुक्यात पर्यटनाला चालना देणारे काहीना काही निश्चित आहे. मांडोदेवी, नागरा, प्रतापगड, हाजराफॉल धबधबा पर्यटकांना आकर्षित करून घेतो. येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. गोठणगाव येथे तिबेटियन बौद्ध बांधवांची मोठी वसाहत आहे. येथे बऱ्याचदा बौद्ध आध्यात्मिक धर्मगुरू दलाई लामा येत असतात. नवेगावबांध जलाशय डोळ्याचे पारणे फेडणारे आहे.**

**जयपाल वाघमारे**

गोंदिया जिल्ह्याची ओळख आदिवासी व नक्षलग्रस्त अशीच. प्रत्यक्षात या जिल्ह्याची भटकंती करीत असतांना उन्हाळ्याच्या दिवसात चाळिशीपार तापमानात थकवा वाटत नाही. तसा गोंदिया जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने छोटा. आठ तालुक्यांचा, शहरापासून तासाभरात कोणत्याही तालुक्यात जाणे सहज शक्य आहे. याचे कारण ग्रामीण भागातील रस्ते अतिशय उत्कृष्ट दर्जाचे. या रस्त्यांचे वर्णन जणू हवाईपट्टी असे केले तर वावगे ठरू नये. कोणत्याही तालुक्यातील अगदी दुर्गम भागात गेलात, तरी रस्त्याचा दर्जा उत्तम आहे. दुर्गम भागातून जाताना चारचाकी गाडी शंभरच्या गतीने धावते. एवढे चांगले रस्ते कसे काय? याचे नवल अन् कौतुक वाटते.

### सुंदर परिसर

गोंदिया जिल्हाधिकारी अभिमन्यू काळे यांना रस्त्यांबद्दल विचारणा केली असता ते म्हणाले, येथील कंत्राटदार काम चांगल्या दर्जाचे करतात. तशी चांगल्या कामाची संस्कृती पूर्वीपासून या जिल्ह्यात आहे.

गोंदिया जिल्हा वनराईने म्हणजे जंगलाने नटलेला एक सुंदर परिसर आहे. या भागाला वनराईचे वरदान लाभले आहे. जिल्ह्यातून वैनगंगा नदी वाहते. सिंचन व औद्योगिक विकासाच्या दृष्टीने वैनगंगा नदी महत्त्वाची मानली जाते. वैनगंगा नदीसोबत जिल्ह्यात गाढवी, बाघ, चुलंबद नद्या वाहतात. या नद्यांवर बांधण्यात आलेल्या धरणामुळे तसेच काही माजी मालगुजारी तलावांमुळे जिल्ह्यातील शेती कायम हिरवाईने नटलेली दिसते. भर उन्हाळ्यात भातशेतीमधील हिरवळ डोळ्यांना सुख देऊन जाते. येथे तर काही भागात बारा महिने शेतकरी पीक घेतात. येथील शेतकरी आत्महत्या करत नाही असे सांगण्यात आले. कमी शेतीमध्ये चांगले उत्पादन शेतकऱ्यांना मिळविता येते. त्यामुळे बारा महिने शेतकरी आनंदाने शेती करतो.

## पर्यटनाला चालना

नवेगाव–नागझिरा राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्पामुळे मोठी चालना मिळाली आहे. यातून स्थानिकांना रोजगार मिळत आहे. जंगलाभोवती राहणारा गोंड आदिवासी समाज मूळ पारंपरिकेतून बाहेर पडताना दिसतो. महिला वर्गाने बचतगटाच्या माध्यमातून विकासाची कास धरली आहे. मुले शाळेत शिकत आहेत. आदिवासी असले तरी या भागातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व व जाणीव आहे. कदाचित त्यामुळे साक्षरतेचा दर पंच्याहत्तर टक्क्यांच्या वर आहे.

लाखो आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान कचारगड पहाडातील गुफेत आहे. यात्रेच्या निमित्ताने लाखो आदिवासी बांधव येतात. यातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होत असतो.





गोंदिया जिल्ह्याची निर्मिती निसर्गाने पर्यटनाच्या दृष्टीने केली असावी. या जिल्ह्यात फिरताना प्रत्येक तालुक्यात पर्यटनाला चालना देणारे काहीना काही निश्चित आहे. मांडोदेवी, नागरा, प्रतापगड, हाजराफॉल धबधबा पर्यटकांना आकर्षित करून घेतो. येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. गोठणगाव येथे तिबेटियन बौद्ध बांधवांची मोठी वसाहत आहे. येथे बऱ्याचदा बौद्ध आध्यात्मिक धर्मगुरू दलाई लामा येत असतात. नवेगावबांध जलाशय डोळ्याचे पारणे फेडणारे आहे. बोदलकसा, पांगडी, इटियाडोह, शिरपूर, कालीसराड, पुजारीटोला, चुलबंद, चोरखमारा सिंचन प्रकल्पदेखील पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असून ते पर्यटकांना आकर्षित करतात. विदर्भातील अनेक भागातून पर्यटक येथे येतात.

## वैशिष्ट्ये

जिल्ह्यात अनेकजण हिंदी भाषेत बोलतात. यांचे शिक्षण मराठी अन् भाषा हिंदी हे समीकरण जरा नवल वाटणारे आहे. याचे कारण म्हणजे गोंदिया जिल्हा हा मध्यप्रदेश व छत्तीसगढ या दोन राज्यांच्या सीमेवर वसला आहे. त्यामुळे हिंदी भाषेचा प्रभाव जिल्ह्यांतील लोकांवर आपोआप आहे. दुसरे वैशिष्ट्य सांगायचे झाल्यास, सायकलवर फिरणारा जिल्हा. शाळेत जाणारा प्रत्येक विद्यार्थी व कामगार सायकलचा वापर करताना दिसतो. आदिवासी समाज मोहाची फुले, तेंदूपत्ता, डिंक व लाख गोळा करून उपजीविका करताना आनंदाने आयुष्य जगतो.

या मातीमधील माणसांमध्ये कलाही ठासून भरली आहे. लाकडी खेळण्यांसाठी सावंतवाडीचे नाव घेतले जाते. मात्र, या भागाची ओळख सावंतवाडीसारखी होऊ शकली नाही. परंतु येथे पट्टीचे काष्ठशिल्प कलावंत आहेत. लाकडापासून अत्यंत नक्षीदार शिल्प ते हाताने तयार करतात. सर्वात महत्त्वाचे या जिल्ह्याचे वैशिष्ट्य सांगायचे म्हणजे, गोंदिया जिल्हा लोहमार्गाने सर्वदूर जोडलेला आहे. गोंदिया येथून रेल्वेने मुंबई, कोलकता, दिल्ली जवळपास भारतातील महत्त्वाच्या शहरांना जाता येते.

गोंदिया जिल्ह्याने आदिवासी जिल्हा ही ओळख पुसल्यात जमा आहे. आदिवासी समाजाने प्रगतीची कास धरल्याने या समाजाचे रूपांतर रोजगाराभिमुख नवसमाज असे करावे लागेल. जिल्ह्यातील अदानी समूहाचा वीज निर्मिती प्रकल्प हा राज्यात सर्वात मोठा खासगी वीज निर्मिती उद्योग आहे. रोजगाराची संधी यातून काही स्थानिकांना प्राप्त झाली असून, गावांचा विकास होण्यास हातभार लागत आहे.

जिल्हाधिकारी अभिमन्यू काळे यांनी गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी भागातील माता व बालमृत्यू दर शून्यावर आणण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे. सात–बारा ऑनलाइन करणे, डासमुक्त गाव, झाडे जगवण्याच्या दृष्टीने विशेष मोहीम सुरू केली आहे. याचा परिणाम दीर्घकालीन दिसणारा आहे.

**एखाद्या शेतकऱ्याची आत्महत्या घडते तेव्हा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्यांची, त्याच्यावर प्रेम करणाऱ्यांची, त्याला आधार मानणाऱ्यांची भावनिक व मानसिक हत्याच ठरते. आत्महत्येमुळे कुटुंब व समाजाची मोठी हानी होते. त्यामुळे यापुढे आत्महत्या होऊ नयेत आणि आत्महत्या झालेल्या कुटुंबातील सदस्यांसाठी काहीतरी भरीव काम केले पाहिजे, या सामाजिक भावनेपोटी औरंगाबाद विभागीय आयुक्त डॉ. पुरूषोत्तम भापकर यांनी उभारी हे अभिनव अभियान सुरू केले आहे.**

# नवी ऊर्जा देणारी 'उभारी'



**आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांशी 'उभारी' उपक्रमांतर्गत संवाद साधताना औरंगाबाद विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर**

**डॉ. विजयकुमार पं. फड**

संतभूमीतील शेतकऱ्याने आत्महत्या करावी ही बाब संतांवर श्रद्धा ठेवणाऱ्यांचे, मनुष्य देहाची महती जाणणाऱ्यांचे मन सुन्न करणारी आहे. आत्महत्या हा कोणत्याही समस्येवरील पर्याय होऊच शकत नाही, असे असतानाही मराठवाड्यानुसार संतभूमीत आत्महत्या का होत आहेत? हा संशोधनाचा विषय झाला आहे.

संत एकनाथ महाराजांनी,

***ब्रम्हहत्या गोहत्येसी। प्रायश्चित असे शास्त्रार्थेसी।***
***परी आत्महत्या घडे ज्यासी। प्रायश्चित त्यासी असेना।।***

या शब्दांत वाईटातल्या वाईट कृत्याला प्रायश्चित्त आहे; पण आत्महत्या हे वाईटाचे शिखर असल्याने या वाईट कृत्याला प्रायश्चित्त सुद्धा नाही. असे यथार्थपणे सांगून ठेवले आहे. त्यामुळे असे महापातक कोणत्याही परिस्थितीत होणार नाही, याची दक्षता ज्याने त्याने घ्यायलाच हवी. माझ्या कुटुंबातील कोणाच्याही मनात आत्महत्येचा विचार येऊ देणार नाही, असे प्रत्येकाने ठामपणे ठरवून कुटुंबातील सदस्यांबरोबर अधूनमधून एकत्र बसून गप्पाटप्पाही केल्या पाहिजेत.

हे जरी सत्य असले तरीही रागात, दु:खात, ताणात, चिंतेत किंवा अन्य प्रकारच्या मन:स्थितीत अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाची काय परिस्थिती आहे, त्यांना नेमकी कोणत्या प्रकारची मदत हवी आहे, अशी कुटुंबे स्वबळावर उभी आहेत किंवा कसे? स्वबळावर उभी नसतील तर त्यांना कोणत्या अडचणी आहेत? अशा कुटुंबीयांच्या अनुषंगाने शासनाकडून राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांची, प्रभावीपणे अंमलबजावणी होत आहे का? याबाबतची माहिती करून घेण्याबरोबर अशा कुटुंबांना स्थैर्य प्राप्त करून देणे, कुटुंबीयांचे मनोबल उंचावणे, आत्मविश्वास निर्माण करणे, अशा अनेक उद्देशाने विभागीय आयुक्त डॉ. पुरूषोत्तम भापकर यांनी, प्रत्येक शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास भेट देऊन, त्यांची सद्य:स्थिती जाणून घेण्याचे व आवश्यक ती उपाययोजना करता येण्यासाठीचे 'उभारी' हे समर्पक नाव असलेले नावीन्यपूर्ण अभियान सुरू केले आहे.

### विशेष प्रशिक्षणाचे नियोजन

औरंगाबाद विभागात १ जानेवारी २०१२ ते ३० आक्टोबर २०१७ या कालावधीत एकूण ३९५४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पात्र/अपात्र असा फरक न करता प्रत्येक कुटुंबाच्या घरी एक स्वतंत्र अधिकारी/कर्मचारी जाईल, असे नियोजन करून सर्वांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणात, प्रत्यक्ष भेटीत कुटुंबीयांसोबत कसा संवाद साधावा, माहिती कशी भरून घ्यावी, त्यांच्याशी कसे समरस व्हावे, या बाबींबरोबर गावासाठी, नागरिकांसाठी असणाऱ्या सर्व शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. अधिकारी/कर्मचाऱ्याने कुटुंबीयांना आवश्यक ते सहकार्य, मार्गदर्शन तर करावेच; पण त्याचबरोबर गावकऱ्यांना शासनाच्या सर्व योजनांची सविस्तर माहिती द्यावी, गावकऱ्यांच्या अडचणी, समस्या जाणून घ्याव्यात, गावाच्या विकासासाठी काय करता येणे शक्य आहे, त्याबाबत वरिष्ठांकडे अहवाल सादर करावा, याबाबत प्रशिक्षणात सर्वांची मानसिक व बौद्धिक तयारी करून घेण्यात आली. या अधिकाऱ्यांना त्या गावचा संपर्क अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. या सर्वांनी १५ नोव्हेंबर २०१७ रोजी त्यांना नेमून दिलेल्या कुटुंबीयांची भेट घेतली. या भेटीत कुटुंबीयांशी सांगोपांग चर्चा करून, आखून दिलेल्या विहित प्रपत्रात माहिती भरून घेतली. या माहितीमध्ये कुटुंबीयांना आतापर्यंत

कोणती मदत मिळाली आहे. अद्याप कोणती मदत देणे बाकी आहे, त्यांना नेमकी कोणत्या मदतीची, सहकार्याची अपेक्षा आहे, त्यांना मुले किती आहेत, ती काय करतात, त्यांचे शिक्षण किती झाले आहे, त्यांच्या शिक्षणात काही अडचण आहे का?, त्यांची लग्न झालीत का?, त्यांना कौशल्य विकास शिक्षणाची गरज आहे का? त्यांची आरोग्यविषयक उपचारांची स्थिती काय आहे?, त्यांना कर्जाची आवश्यकता आहे काय?, वीज जोडणीची परिस्थिती काय आहे?, हॉस्टेल सुविधा, शौचालय, घरकूल, जनधन बँक खाते, कुटुंब अर्थसाहाय्य योजना, विहीर, शेततळ्यांची गरज आहे का?, गॅस आहे का? अशा अनेक गरजांबाबतची माहिती घेण्यात आली. या माहितीचे संकलन झाल्यानंतर विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांकडे त्यांच्या विभागाशी संबंधित विषयाची मागणी कुटुंबीयांच्या यादी देण्यात आली. त्या कुटुंबीयांच्या गरजांची नियमानुसार पूर्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. या निर्देशाचा, कुटुंबीयांच्या मागणींचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी त्या नियुक्त अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे. जो अधिकारी संपर्क अधिकाऱ्यास सहकार्य करणार नाही, त्याबाबत विभागीय आयुक्तांकडे सरळ संपर्क साधता येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केल्याने सर्व अधिकारी तत्परतेने काम करीत आहेत. या प्रत्यक्ष भेटीत केवळ कुटुंबीयांची पाहणी किंवा माहिती गोळा करण्याचेच काम झाले असे नाही तर अनेक कुटुंबीयांच्या बऱ्याच समस्या मार्गी लागल्या आहेत.

औरंगाबाद विभागात आतापर्यंत किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या एवढीच आकडेवारी प्रशासनाकडे होती; पण 'उभारी' अभियानात, लिंग, वय, आत्महत्येचा मार्ग, शैक्षणिक स्तर, व्यवसाय (शेती व शेतीपूरक), आरोग्यस्थिती, विमा, आत्महत्येचे कारण अशीही माहिती संकलित झाली आहे.

या अभिनव अभियानाबाबत सामान्यांकडून येत असलेल्या प्रतिक्रिया भावनिक व सकारात्मक आहेत. शासनाच्या बऱ्याच योजनांची माहिती प्रथमच होत असल्याचेही काही ठिकाणी लोक बोलत आहेत. 'उभारी' हा विषय केवळ डोक्याचा नाही तर हृदयाचाही आहे.

**अप्पर विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. संपर्क: ०९४२२२१६४४८**

# सुरक्षित वीज, सुरक्षित जीवन

**सुहास स. बागडे**

विजेशिवाय जीवन ही कल्पनाच आपण करू शकत नाही. पण तिचा वापर सुयोग्य व सुरक्षितपणे होणे आवश्यक आहे. यंदा ११ ते १७ जानेवारी २०१८ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करण्यात येत आहे.

**ग्रामीण भागातील वीज सुरक्षा :** कोठेही विद्युत अपघात घडल्यास(घर, ट्रान्समिशन लाइन, उद्वाहन) मालकाने किंवा पाहणाऱ्याने परिसरातील विद्युत निरीक्षकाला सूचित करावे. अधिकृत नियमावलीनुसार वाणिज्य, मध्यमदाब, जनीत्रसंच, उच्चदाब, अतिउच्चदाब ह्या प्रकारच्या वीज संचमांडण्या, तात्पुरत्या संचमांडण्या सिनेमागृह ग्राहकाने विद्युत निरीक्षकांमार्फत दरवर्षी निरीक्षण करून वायरींग निर्धोक असल्याची खात्री करावी. विद्युत उभारणीचे कोणतेही काम अधिकृत ठेकेदाराकडून करून घेणे बंधनकारक आहे.

**आगीपासून बचाव–घरगुती व वाणिज्य ग्राहक:** अधिकृत नियमावलीनुसार १५ मीटरपेक्षा उंच इमारतीच्या वीजसंचमांडणीचे निरीक्षण, त्या भागातील विद्युत निरीक्षकांकडून करून घेणे बंधनकारक आहे. हे काम अधिकृत ठेकेदाराकडूनच करून घ्यावे. वायरिंगचे काम अनधिकृत माणसाकडून करून घेणे, अर्थिंग तुटलेले असणे, ओल्या हाताने उपकरणांना हात लावणे, जुने नादुरुस्त उपकरणे, जुने वायरिंग वापरणे, स्वतंत्र प्लगऐवजी मल्टी प्लगचा वापर करणे (सर्व उपकरणांच्या वायरी एकाच वेळी खोचून ठेवणे) हे शॉर्टसर्किटला आमंत्रण समजावे. घरातील उपकरणे ही आयएसआय मार्क असलेली किंवा दर्जा व नियंत्रण मंडळाने प्रमाणित केलेली असावी. विद्युत वायर, केबल ज्या डक्टमधून जातात, त्यात इतर केबलची सरमिसळ करू नये. त्यासाठी स्वतंत्र पाईपची व्यवस्था करावी. विद्युत वायरिंगसाठीचा डक्ट प्रत्येक मजल्यावर सील करावा. त्यामुळे त्या मजल्यावर समजा आग लागली तर ती पुढे पसरण्याचा धोका टाळता येऊ शकतो. घरगुती ग्राहकसुरक्षेसाठी वाशिंग मशिन, गीझर याला स्वतंत्र एमसीबी लावावेत. योग्यक्षमतेचा ३० मिली ॲम्पिअर लिकेज क्षमता असलेला ईएलसीबी बसवल्यास इलेक्ट्रिक शॉकपासून सुरक्षितता मिळते. इमारतीला तसेच प्रत्येक फ्लॅटसाठी कार्यक्षम अर्थिंग असावे. अतिउंच इमारतीवर Lightening Arrestor ची व्यवस्था असावी. त्यामुळे Lightening Stroke पासून घरातील विद्युत उपकरणांचा बचाव होतो. वीज संचमांडणीचे काम हे अधिकृत विद्युत ठेकदारांकडूनच करावे.

**उद्वाहने व त्याची सुरक्षितता :** अधिकृत ठेकेदाराकडून उद्वाहन (लिफ्ट) लावणे बंधनकारक आहे. विजेचे काम करीत असताना हातात रबरी मोजे घालावे. पायात सेफ्टी शूज वापरावे. विद्युत भारीत संचमांडणीवर विद्युत पुरवठा बंद करून काम करावे. या विद्युत सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने नादुरुस्त उपकरणे, जुने वायरिंग बदलून सर्व योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. ही काळजी विद्युत सुरक्षा सप्ताहापुरती मर्यादित न ठेवता वर्षभर सतर्क राहणे आवश्यक आहे.

**मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**




# आर्थिक स्वावलंबन ते यशस्वी उद्योजिका

**उद्योग–व्यवसायात महिलांचा सहभाग वाढावा यासाठी महिला उद्योजिकांना समर्पित उद्योग धोरण नुकतेच महाराष्ट्र शासनाने घोषित केले आहे. असे धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.**

**सुभाष देसाई,** उद्योगमंत्री



औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या महाराष्ट्रात महिलांचा उद्योगक्षेत्रातील सहभाग अवघा नऊ टक्के आहे. जवळपास १४ टक्क्यांच्या राष्ट्रीय सरासरीपेक्षाही कमीच. ही उणीव दूर करण्यासाठी राज्य शासनाने प्रगत असे उद्योग धोरण आखून, महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. आर्थिक स्वावलंबनासाठी धडपड ते यशस्वी उद्योजिका असा प्रवास करणाऱ्या यशस्विनींना हा सलाम आहे. त्यांनी आखून दिलेल्या पायवाटेतून होतकरू उद्योगिनींसाठी मार्ग प्रशस्त करणारा हा प्रयत्न आहे.

राज्याच्या औद्योगिक विकासात महिलांचा सक्रिय सहभाग वाढावा आणि देशातील सर्वाधिक महिला उद्योजक असलेले राज्य म्हणून ओळखले जावे यासाठी महिला उद्योग धोरण तयार करण्यात आले आहे. महिला उद्योजकता ही आर्थिक वाढीचा एक महत्त्वाचा स्रोत मानली गेली आहे. औद्योगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात महिला उद्योजकांच्या सक्रिय सहभागाने सर्वसमावेशक आर्थिक विकास होण्यासाठी एक समर्पित धोरण निश्चित करण्यात आले आहे. लिंगभेद व समाजातील स्थान, व्यवसाय सुरू करण्यासाठी अपुरे स्रोत, तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव, मर्यादित आर्थिक स्रोत व गुंतवणूक साहाय्य, परवडण्याजोगा व सुरक्षित व्यावसायिक जागांचा अभाव इत्यादी महिला उद्योजकांपुढील आव्हाने आहेत.

### महत्त्वाच्या अटी

सूक्ष्म, लघू आणि मध्यम उपक्रमातील महिला उद्योगांच्या उभारणीत एक कोटी रुपयांपर्यंतच्या भांडवली साहाय्याची हमी आणि त्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद, हे या धोरणाचे वैशिष्ट्य आहे. यातून सरकारी तिजोरीवर वर्षांला ६४८ कोटी रुपयांचा बोजा येणार आहे. लाभार्थी उद्योगिनी पहिल्या पिढीतील असावी आणि उद्योग एकल मालकी, भागीदारी, सहकारी कोणत्याही प्रकारचा असला तरी त्याचे संस्थापन महिलेकडून झालेले असावे. कर्मचारीवर्गात निम्मे प्रमाण महिलांचे असावे, अशा या धोरणातील महत्त्वाच्या अटी आहेत.

लोकसंख्येचा निम्मा हिस्सा असलेल्या महिलांना उद्योग उभारणीत पुरुषांच्या तुलनेत विशेष प्रोत्साहन आणि चालना देण्याचे काही निश्चित फायदे आहेत. उद्योगाची नव्याने उभारणी ते उद्योग तगून जोम धरेल यासाठी, पुरुषांच्या तुलनेत काही स्त्रीसुलभ स्वाभाविक गुण महिलांमध्ये अधिक पूरक असतात, असे जगभरच्या अभ्यासातून सिद्ध झाले आहे. महिलांसाठी वेगळ्या उद्योग धोरणाची गरज काय, या प्रश्नाचे हे उत्तर आहे. नव्या धोरणातून पाच वर्षांत २० हजार उद्योगिनी आणि त्यांच्याकडून लाखभर रोजगाराची निर्मिती हे या दिशेने मोठे योगदान ठरेल.

### धोरणाची उद्दिष्टे

राज्याला सर्वात जास्त महिला उपक्रम असलेले राज्य बनवणे, महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे, तांत्रिक, परिचालनात्मक व आर्थिक साहाय्य पुरवून; महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करणे, हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे.

● या धोरणामुळे महिला उद्योजकांच्या टक्केवारीत दुपटीने वाढ होईल. ● १००% भाग भांडवल असेल अशी कंपनी पात्र राहील. ● किमान ५०% महिला कामगार असलेल्या उपक्रमांना प्रोत्साहनासाठी पात्र समजण्यात येईल. ● भांडवली गुंतवणुकीच्या १५ ते ३५ टक्के दराने २० ते १०० लाख रुपये मर्यादेपर्यंत भांडवली अनुदान देण्यात येईल. ● मॉल / व्यावसायिक केंद्र / बाजारपेठेच्या जागी महिला उद्योजकांसाठी तसेच रेल्वे स्थानक, बस स्थानक, विमानतळ, चित्रपटगृहे, मंडया इत्यादी ठिकाणी जागा आरक्षित ठेवण्यात येईल. ● २५% अधिमूल्य घेऊन ते १० ते १५% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक राखीव राहील. ● उत्पादन सुरू झाल्यानंतर सुरुवातीची तीन वर्षे दर वर्षी ३०००/- रुपये प्रशिक्षणाची मदत दिली जाईल.

## प्रस्तावित घटक

● एकल मालकी घटकासाठी महिला उद्योजकाचे १००% भागभांडवल हवे. ● भागीदारी घटकासाठी भागीदारी घटकामध्ये महिला उद्योजकांचे १००% भागभांडवल हवे.

● सहकारी क्षेत्रासाठी सहकारी कायद्यानुसार त्या सहकारी संस्थेमध्ये १००% महिला उद्योजकांचाच समावेश असलेली संस्था पात्र राहील. ● खासगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटकांमध्ये महिला उद्योजकांचे १००% भाग भांडवल असलेली अशी कंपनी पात्र राहील.

● स्वयंसाहाय्यता बचत गट जे नोंदणीकृत असून, या व्याख्येतील क्रमांक ३ आणि ४ नुसार स्थापित झालेले आहेत. ● उद्योगांच्या उपरोक्त नमूद केलेल्या घटकांमध्ये किमान ५०% महिला कामगार असलेल्या उपक्रमांना प्रोत्साहनासाठी पात्र समजण्यात येईल.

## असे आहे धोरण

**भांडवली अनुदान :** नवीन पात्र सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमांना तालुका वर्गीकरणानुसार अनुज्ञेय स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १५ ते ३५ टक्के दराने २० ते १०० लाख रुपये मर्यादेपर्यंत भांडवली अनुदान देण्यात येईल.

**वीजदर अनुदान :** विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील उद्योगांना प्रत्येक युनिट वीजमागे २ रुपये व इतर जिल्ह्यातील उद्योगांना प्रत्येक युनिट वीजेमागे १ रुपये एवढी सवलत देण्यात येईल.

**व्याजदर अनुदान :** वित्तीय संस्थेचा प्रत्यक्ष व्याज दर किंवा ५% यापैकी जे कमी असेल त्या दराने व्याज अनुदान देण्यात येईल.

**कामगार कल्याण साहाय्य:** पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार कल्याण योजनेतील कंपनीच्या योगदानाच्या ५०% रक्कम अनुदानास पात्र असेल.

**मुद्रा विकास :** सूक्ष्म व लघू उद्योगातील महिला उद्योजकांनी आपल्या उत्पादनांचे विपणन होण्यासाठी मुद्राचिन्ह विकसित करण्यासाठी केलेल्या खर्चाच्या रकमेच्या ५०% व कमाल १ कोटी रुपयांपर्यंत शासन साहाय्य देईल.

**प्रदर्शनांसाठी प्रोत्साहन :** प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी रू. ०.५० लाख किवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या ७५% रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी रू. ३ लाख एवढ्या मर्यादेत सवलत देण्यात येईल.

**जागांचे आरक्षण :** मॉल / व्यावसायिक केंद्र / बाजारपेठेच्या जागी महिला उद्योजकांसाठी तसेच रेल्वे स्थानक, बस स्थानक, विमानतळ, चित्रपटगृहे, मंडया इत्यादी ठिकाणी जागा आरक्षित ठेवणे. २५% अधिमूल्य घेऊन ते १० ते १५% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक राखीव ठेवण्यात येईल.

**इन्क्युबेशन सेंटर (उबवण केंद्र) :** सार्वजनिक, खासगी, भागिदारी तत्त्वावर उबवण केंद्र स्थापन करण्यासाठी जमीन वगळून प्रकल्प खर्चाच्या ७५% रक्कम (कमाल ५ कोटी रुपये) पर्यंत प्रोत्साहन देण्यात येईल.

**क्लस्टर्ससाठी :** महिला उद्योजकांच्या पात्र उद्योगांचे किमान १० समूह विकास केंद्रे स्थापन करण्यास प्रकल्प खर्चाच्या ९०% रक्कम अनुदानरूपाने साहाय्य म्हणून देण्यात येईल.

**महिला मायक्रो, स्मॉल ॲण्ड मिडिअम एन्टरप्रायझेस – सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) संस्था :** महिला उद्योजकांच्या गरजांनुसार प्रमाणित व आखीव अभ्यासक्रम तयार करणे, व्यवस्थापकीय तसेच व्यावसायिक व तांत्रिक कौशल्यांशी संबंधित विविध कार्यशाळांचे आयोजन, प्रशिक्षणे व विकसन व धोरणसल्ला व्यवस्था निर्माण करण्यासाठी एक समर्पित संस्था म्हणून 'महिला एमएसएमई संस्था' स्थापन करण्यात येईल.

**पुरस्कार :** माहिती तंत्रज्ञान पुरस्कारांच्या धर्तीवर व्यवसायातील सर्वोत्तमतेसाठी महिला उद्योजकांना वेगवेगळ्या संवर्गामध्ये पुरस्कार देण्यात येतील.

**विशेष महिला कक्ष :** महिला उद्योजकांच्या अडचणी सोडवण्यासाठी 'मैत्री' अंतर्गत एक खिडकी योजनमध्ये विशेष 'महिला कक्ष' स्थापन करेल.

**साहस भांडवल :** महिला व बालकल्याण विभाग महिला उद्योजकांसाठी ५० कोटी रुपयांचा विशेष साहस निधी तयार करेल.

**कौशल्य विकास :** 'कै. प्रमोद महाजन कौशल्य विकास योजने' अंतर्गत प्रत्येक महिला कर्मचाऱ्याला उत्पादन सुरू झाल्यानंतर सुरुवातीची तीन वर्षे दर वर्षी ३०००/- रुपये प्रशिक्षणाची मदत करण्यात येईल.

या धोरणामुळे राज्यातील महिला उद्योजकांच्या टक्केवारीत दुपटीने वाढ होईल.

शब्दांकन : **अर्चना शंभरकर**
विभागीय संपर्क अधिकारी

**औरंगाबाद येथील सुहास वैद्य यांनी केवळ ५०० रुपयांवर सुरू केलेला त्यांचा रोपवाटिकाचा व्यवसाय आज कोट्यवधींचा झाला आहे. या रोपवाटिकेचे रूपांतर 'ट्री मॉल' (झाडांचा मॉल) मध्ये झाले आहे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीने या व्यवसायामध्ये शास्त्रशुद्धपणे रसही घेतला आहे. त्यांची सुकृत, संकेत दोन्ही मुले कृषी पदवीधर, पत्नी सुनीता, वास्तुविशारद सून अभिधा त्यांना या कामात मदत करतात. निसर्गाच्या सान्निध्यात रमलेले कुटुंब इतरांनाही प्रेरणा देणारे आहे.**





# रोपवाटिका ते ट्री मॉल

**श्याम टरके**

औरंगाबाद रेल्वे स्थानकापासून पाच कि.मी. अंतरावर असलेली पैठण रोडवरील पल्लवांकुर रोपवाटिका. संताजी पोलीस चौकीपासून अर्धा किलोमीटरवर आहे. सुहास वैद्य यांनी. केवळ ५०० रुपयांवर सुरू केलेला त्यांचा रोपवाटिकाचा व्यवसाय आज कोट्यवधींचा झालाय. रोपवाटिकेचे रूपांतर 'ट्री मॉल' (झाडांचा मॉल) मध्ये झालेय. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीने या व्यवसायामध्ये रसही घेतलाय. सुहास वैद्य यांची सुकृत, संकेत दोन्ही मुले कृषी पदवीधर, पत्नी सुनीता, वास्तुविशारद सून अभिधा त्यांना या कामात मदत करतात. निसर्गाच्या सान्निध्यात रमलेले कुटुंब इतरांनाही प्रेरणा देणारे आहे. इतरांनीही रमावे यासाठी 'पल्लवांकुर' रोपवाटिका, आताचा 'आंगन' मॉल आणि कृषी पर्यटन केंद्र, वनप्रेमींसाठी भुरळ घालणारे आहे.

## अथक परिश्रम

जिद्द, चिकाटी, संयमाने रोपवाटिका व्यवसायाला सन्मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी केलेला सुहास वैद्य यांचा आटापिटा, म्हणावा तितका सोपा नाहीय. त्यांचे शिक्षण अभियांत्रिकीचे. पण बालपणापासून आवड रोपवाटिकेची. म्हणूनच अभियांत्रिकीची शेवटच्या वर्षाची परीक्षाच त्यांनी दिली नाही. याबाबत ते म्हणतात, 'त्या काळात अभियांत्रिकीची बॅचच्या बॅचच वीज मंडळात शासकीय नोकरीला लागत असे. सध्या माझे काही मित्र अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आहेत. तसाच मीही असलो असतो. पण माझे रोपवाटिका व्यवसायाला सन्मान मिळवून द्यायचे स्वप्न अपुरे राहिले असते. ते आता पूर्ण झालेय.'

'वडील लक्ष्मणराव. स्वातंत्र्यसैनिक, हिंदी प्रचार सभेत त्यांची नोकरी. मूळ आम्ही नाशिकचे. पण नोकरीनिमित्त वडिलांना औरंगाबादेत यावे लागले. मग इथेच स्थायिक झालो. खऱ्या अर्थाने वृक्षप्रेमाचे रोपटे रोवले गेले ते १९७७ मध्ये. 'पल्लवांकुर'च्या माध्यमातून. आमच्या अंगणातच नर्सरीची सुरुवात झाली. त्या वेळी कुटुंबाने मला खूप पाठिंबा दिला. म्हणूनच आज या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झालेय. झाडांचा मॉल झालाय. त्यालाच आता कृषी पर्यटनाची जोड मिळाल्याने वनप्रेमींना बारा बलुतेदार, लोकग्राम, वनभोजनाचा आनंद खऱ्या अर्थाने इथे मिळेल, अशी संकल्पनाही प्रत्यक्षात साकारली आहे. त्यात आम्ही यशस्वी झालोत. बच्चे कंपनीपासून ज्येष्ठांपर्यंत रमण्याचा हा परिसर असणार आहे. औरंगाबाद पर्यटनाची राजधानी आहे. त्यातच पर्यटकांना

आता कृषी पर्यटनाचे दालनही या माध्यमातून खुले झाले आहे.'

## सर्व काही एकाच छताखाली

'डोळ्यात स्वप्न होते, पण ते सत्यात उतरविण्यासाठी धडपडीशिवाय पर्याय नव्हता. सायकलवर रोपे विकली. सुरुवातीला एकरभरात रोपवाटिका सुरू झाली. आता त्याचे रूपांतर सहा एकरावरील रोपवाटिका, ट्री मॉलच्या स्वरूपात पाहावयास मिळतेय. अंगणात लागणाऱ्या सर्व बागकाम वस्तूंची विक्री या ठिकाणी होतेय. गवत कापणाच्या यंत्रापासून ते तुळशी वृंदावन, रंगीत कुंड्या, क्ले-फॅब्रिक, म्युरल्ससह; फळ, फुलझाडांची निगा राखण्यासाठी अद्ययावत साधनांबरोबरच, वृक्षलागवड कार्यक्रमात आवश्यक असणारी वृक्षलागवडीच्या कीटपासून छोट्या-मोठ्या वृक्षांच्या रोपांपर्यंत. ५० रुपयांपासून ते हजारोंपर्यंतचे बागकाम साहित्य, फळ व फुलझाडे, वाचन साहित्य या ठिकाणी उपलब्ध आहे.'

## गुणवत्तेचा ध्यास

'सहा एकरच्या रोपवाटिकेत तीन हजार प्रकारची रोपे आहेत. जवळपास ५ लाख झाडांचा हा 'ट्री मॉल' आहे. तसा हा व्यवसाय जिकिरीचाच. दररोज नवी दिशा, उमेद घेऊन व्यवसाय करावा लागतो. निसर्गावरच बरेचसे अवलंबून असते. तरीही बदलत्या जगाबरोबर आधुनिकतेची कास आम्ही धरली. म्हणून रोप दर्जेदार असावे, गुणवत्तेत तडजोड नसावी, हाच आमचा आग्रह. त्याचबरोबर त्यासाठी त्याची निगा, हवामान, व्यवस्थापन याची योग्य काळजी आम्ही सर्वचजण घेतो.'

## शासनाचे अनुदान महत्त्वाचे

'शासनाच्या योजनांचा फायदाही आम्हाला रोपवाटिका व्यवसायासाठी झाला. त्यात विशेषत्वाने सांगायचे झाल्यास सहा एकरांच्या परिसरात १० आणि ५ गुंठ्यांवर दोन पॉलिहाऊस उभारलेत. तर ६ शेडनेटही आहेत. यासाठी कृषी विभागाकडून शासकीय अनुदान मिळाले. यशाची पुढची पायरी गाठण्यासाठी ते महत्त्वाचे होते. आज रोपांच्या गुणवत्तेमुळे दररोज एक हजार विविध जातींच्या रोपांची विक्री होते, यातूनच ग्राहकांची पसंती मिळाल्याची पावती मिळते. ८० च्या दशकात मराठवाडा विकास महामंडळाकडूनही २ हजार २०० रुपयांचे अनुदान मिळाले होते.'

## कृषी पर्यटनाची संकल्पना

'विविध प्रकारची रोपे, झाडे यांची माहिती पुढच्या पिढीला व्हावी, पूर्वीची महत्त्वाची साधने त्यांना कळावी, बारा बलुतेदार पद्धत कळावी, वनभोजनाचा आस्वाद त्यांना चाखता यावा, प्रात्यक्षिकातून ज्ञान मिळावे, निसर्गरम्य वातावरणात. प्रदूषणापासून दूर, अशा ठिकाणी कुटुंबाला वेळ घालवता यावा, निसर्ग संवर्धन चळवळ वृद्धिंगत व्हावी, अशा दृष्टिकोनातून 'ट्री मॉल'चे कार्य सुरू आहे. नुसतेच कार्य करत नाही. तर त्याचबरोबर सामाजिक जबाबदारीचे भानही वैद्य यांनी जपलेय. सुकृत आणि अभिधा यांच्या विवाहाप्रीत्यर्थ असलेला आनंद सोहळाही हटकेच पार पाडला. लग्नानंतरच्या रिसेप्शनऐवजी वनभोजनाचा आस्वाद त्यांच्या आप्तस्वकीयांसह, मित्रमंडळींनी या ठिकाणी घेतला. निसर्गाच्या सान्निध्यात पारंपरिक पद्धतीच्या कलाकृतींचा आनंद त्यांनी लुटला. बऱ्याच वर्षांपासून औरंगाबादेत असूनही एकमेकांना न भेटणाऱ्यांची भेट या सोहळ्यात झाली. दिवसभर त्यांनी ठिकठिकाणी हजेरी लावली. त्यांना आनंद, समाधान मिळाले. अगदी त्याचप्रकारे इथे येणाऱ्या पर्यटकांना समाधान मिळावे, असाच आमचा मानस आहे. म्हणूनच तर कृषी पर्यटनाची संकल्पना आम्ही प्रत्यक्षात उतरवत आहोत. औरंगाबादला येणाऱ्या प्रत्येकासाठी ती मेजवानीच असेल. त्याचबरोबर बच्चे कंपनीसाठी या ठिकाणी पारंपरिक खेळांची साधनेही उपलब्ध करून दिली आहेत. त्यात लगोरी, भोवरे, झोके, चंपूल, सागरगोटे आदी प्रकारच्या खेळांचीदेखील व्यवस्था केली आहे. विशेष म्हणजे सेल्फी पॉइंटही आजच्या काळाची गरज म्हणून विकसित केले आहेत.'

## पाण्याचे व्यवस्थापन

'रोपवाटिकेचा व्यवसाय पाण्यावरच अवलंबून. म्हणून पाण्याचे योग्य नियोजन हादेखील यशातील महत्त्वाचा घटक. सुहास वैद्य यांनी परिसरात असलेल्या विहिरीचे पुनर्भरण केले. या पाण्याचा वापर रोपांसाठी होतो. नियमित न चुकता वेळेवर रोपांना पाणी दिले जाते. पण ते पाणी फिल्टर केले जाते. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा त्यांनी उभारली आहे.'

## पुढच्या पिढीला जागृत करण्याचे कार्य

औरंगाबादच्या निसर्ग संवर्धनात मोलाचा वाटा उचलणारे, शहरातील अधिकांश बगिचे सुशोभित करणारे, सिडकोच्या ३२ सार्वजनिक बगिचांचा विकास करणारे, औरंगाबादेतील औद्योगिक कंपन्यांचा परिसर नेटाने हिरवागार करणारे, सामाजिक बांधिलकी जपत रोपवाटिका व्यवसायाला सन्मानाचे स्थान मिळवून देणारे सुहास वैद्य आहेत. रोपवाटिकेला दरवर्षी ३० ते ३५ शाळा भेट देतात. विद्यार्थ्यांना विविध रोपांची माहिती, ओळख, रोपनिर्मिती प्रक्रिया, तंत्रज्ञान समजण्यास मदत होते. पर्यावरण जागृतीपर माहितीपटही मॉलमध्ये दाखवला जातो. या विद्यार्थ्यांनी मॉलचा परिसर लगबगून जातो. त्यामुळे आम्हालाही आनंद वाटतो, असे सुनीता वैद्य म्हणतात. पुढील पिढीने निसर्ग संवर्धनाबाबत अधिक जागृत झाले पाहिजे. पर्यावरण संवर्धन काळाची गरज आहे; असेही त्या म्हणतात. माझे क्षेत्र कृषी नसतानाही, सुहास वैद्य यांच्यामुळे मी आता या व्यवसायात रमल्याचे त्या सांगतात. एकूणच सर्व कुटुंबाने या मॉलमध्ये पूर्णत्वाने झोकून दिले आहे. चिकाटी व ध्येयाचे उत्तम उदाहरण त्यांनी यातून घालून दिले आहे.

**माहिती साहाय्यक, माहिती केंद्र, औरंगाबाद**

**पारंपरिक शेतीपद्धतीस फाटा देऊन आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून ऊस शेतीमध्ये कोथिंबीर, मेथी, पोकळा, भेंडी यांसारख्या भाजीपाल्याच्या पिकांबरोबरच बटाटा, हरभरा, रताळी, सोयाबीन, भुईमूग, केळी अशी आंतरपिके घेऊन फायदेशीर शेतीचे गणित यशस्वीपणे सोडवण्याचे काम पेठवडगांव येथील शेतकरी कृषिभूषण मच्छिंद्र कुंभार यांनी करून दाखवले आहे. महाराष्ट्र शासनाने २०१४-१५ सालच्या वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्काराने त्यांना गौरवले आहे. ऊस शेतीत आंतरपिके घेऊन परवडणाऱ्या शेतीची किमया मच्छिंद्र कुंभार यांनी घडवली आहे.**



# किमया आंतरपिकांची

**एस. आर. माने**

पेठवडगांव येथे राहणारे प्रगतशील शेतकरी कृषिभूषण मच्छिंद्र कुंभार यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करून फायदेशीर शेतीचा यशस्वी प्रयोग आपल्या शिवारात राबवला आहे. ऊसशेती म्हणजे आळशी माणसाची शेती! असा सर्वसाधारणपणे समज आहे. पण ऊसाबरोबरच वर्षभर नगही पैसा मिळवून देणारी विविध प्रकारची १६ आंतरपिके घेऊन मच्छिंद्र कुंभार यांनी शेतकऱ्यांसमोर परवडणाऱ्या शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. श्री. कुंभार यांनी आंतरपिकाद्वारे उत्पन्न मिळवून देणाऱ्या पिकांचे दरमहा तसेच तिमाही वेळापत्रक तयार करून त्यानुसार दरवर्षी जवळपास २ लाखाचे उत्पन्न घेतले आहे.

श्री. कुंभार यांनी १९९० मध्ये वाणिज्य शाखेची पदवी घेऊन नोकरीच्या मागे न लागता प्रगतशील शेतकरी बनण्याच्या निर्धाराने शेतीमध्ये लक्ष केंद्रित केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेती करण्यास सुरुवात केली. शेतीच करायची आहे, तर कृषीचे शिक्षण घेण्याचा संकल्प करून त्यांनी बीएससी हॉर्टिकल्चर ही पदविका यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून प्राप्त केली.

वडिलोपार्जित ७ एकर शेतीमध्ये परंपरागत शेतीला फाटा देऊन आधुनिक कृषी तंत्रज्ञानावर आधारित शेतीचा प्रयोग सुरू केला.

## कृषी शिक्षण

आंतरपीक पद्धतीमध्ये त्यांना कृषी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि मदत झाली. याबरोबरच सर्वार्थांने मदत झाली ती म्हणजे त्यांच्या पत्नी सौ. अनिता कुंभार यांची. सौ. कुंभार यांनी कष्ट आणि जिद्दीने शेती व्यवसायात हाती घेतलेले प्रयोग साध्य करण्यासाठी प्रयत्न केले. श्री. कुंभार यांनी आपला आधुनिक शेतीचा वारसा जोपासला जावा म्हणून की काय, आपल्या मुलींना कृषीचे शिक्षण दिले. मोठी कु. प्रियंका बीएससी (कृषी) झाली असून लहान कु. अमृता हिने कृषीची पदविका घेतली आहे. मुलगा पवन यांने बी.टेकची पदवी संपादन केली आहे. मुलामुलींनी शेतीचे शिक्षण घेऊन गावातच आधुनिक शेती करण्याच्या वडिलांच्या संकल्पाला बळकटी दिली आहे.

## आंतरपिकातून समृद्धीकडे

वडिलोपार्जित शेतीमध्ये चांगले नवनवे प्रयोग करून उत्पन्न मिळवणाऱ्या श्री. कुंभार यांनी आपली शेती १५ एकरांवर पोहोचवली आहे.

ऊस हे १७ ते १८ महिन्याचे पीक असून त्यापासून सव्वा ते दीड वर्षांनी उत्पन्न मिळते. मधल्या काळात ऊसशेतीतून काहीच उत्पन्न मिळू शकत नाही. यावर उपाय म्हणून ऊसामध्ये आंतरपिके घेऊन दर महिन्याला नगदी उत्पन्न मिळवण्यासाठी ऊसाच्या सऱ्यामध्ये पहिल्या महिन्यात कोथिंबीर, मेथी, पोकळा, भेंडी यासारखी भाजीपाल्याची पिके घेऊन त्यापासून चांगला पैसा मिळवणे आता शक्य आहे. यानंतर पहिल्या तिमाहीमध्ये बटाटा, हरभरा, रताळी, सोयाबीन, भुईमूग, केळी अशी आंतरपिके घेऊन उत्पादनाचा दुसरा टप्पा पार गाठता येतो. हे श्री. कुंभार यांनी सिद्ध करून दाखवले आहे. मक्याचे पीक हे सापळापीक म्हणून घेतल्याने, अन्य आंतरपिकावरील किडींचा बंदोबस्त होऊ शकतो. तसेच जनावरांना चाराही मिळतो. याबरोबरच वेळोवेळी घेतलेल्या पिकांच्या काढणीनंतर पिकनिहाय प्रतवारी करून आकर्षक पॅकिंगद्वारे विविध ठिकाणच्या बाजारपेठांची माहिती घेऊन तेथे उत्पादने पाठवण्याचे नियोजन केले. बाजारपेठांच्या मागणीनुसार सांगली, इचलकरंजी, पुणे, मुंबई, कोल्हापूर अशा ठिकाणी आंतरपिके पाठवली जातात. शेती उत्पादनांना बाजारपेठा मिळवण्यासाठी अन्य देशात राबवण्यात येणाऱ्या पद्धतींचा अभ्यास करून, त्यानुसार कार्यवाही करण्यावर श्री. कुंभार यांनी विशेष लक्ष दिले आहे.

### शेती परवडतेय...



'नव्या शेतीपद्धतीमध्ये शेतीची मशागत, आधुनिक पीक पद्धती, सेंद्रीय खतांची उपलब्धता, ठिबकद्वारे पाण्याची व खतांची व्यवस्था या सर्व पद्धतीचे शास्त्रशुद्ध नियोजन केले. पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी ठिबक सिंचन संच शेतीमध्ये बसवून त्याद्वारे पिकांना हवे तेवढे पाणी देण्याची पद्धत अवलंबली. ऊसामध्ये आंतरपिके घेतल्यामुळे जमिनीचा पोत सुधारण्यास मदत झाली. पीक फेरपालट केल्याने उत्पादनात मोठी वाढ झाली. आज समाजात शेती परवडत नाही, हाच सूर सर्वदूर ऐकायला येतोय, पण माझ्या अनुभवनावरून मी खात्रीने सांगतो की, शेती उत्तम उत्पन्नाचे साधन ठरू शकते.

## पाणी, कंपोस्ट खतांचा योग्य वापर

ऊसामध्ये आंतरपिके घेण्याबरोबरच ऊस पिकांसाठी ठिबक सिंचन सुविधेचा तर फळभाज्या आणि पालेभाज्यासाठी मायक्रो स्प्रिंकलरचा वापर केला. यामुळे उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त क्षेत्रासाठी किफायतशीर वापर होऊ लागला. पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी ऊसामध्ये पाचटाचे आच्छादन, एकसरी आड पाणी देण्यासारखे लाभदायी प्रकल्प हाती घेऊन अधिक उत्पादन घेण्याचा प्रयत्न केला. खतांच्या मात्रा ठिबकद्वारे दिल्या गेल्याने पिकांची योग्य आणि संतुलित वाढ होण्याबरोबरच, तणांचाही बंदोबस्त झाला. ठिबकने पाणी दिल्याने अधिक क्षेत्र पाण्याखाली येऊन, उत्पादन वाढीस चालना मिळाली. सुरुवातीला मातीपरीक्षण करून घेऊन दाणेदार व विद्राव्य स्वरूपातील खतांचा गरजेनुसार ड्रिपरमधून तसेच मातीपरीक्षण अहवालानुसार, खतांच्या मात्रा पिकांना मिळाल्याने भरघोस उत्पादन मिळू लागले. याबरोबरच गांडूळ खत, कंपोस्ट खत तसेच सेंद्रीय खतासाठी ताग, धैन्चा यांचा वापर हिरवळीच्या खतांसाठी केल्याने पिकाची वाढ गतीने होऊन, उत्पादन वाढ होऊ शकली.

## शेती तंत्रज्ञानाच्या वापरासाठी अभ्यास दौरा

श्री. कुंभार यांनी शेतीक्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची आणि पीक पद्धतीची माहिती घेण्यासाठी युरोपचा अभ्यासदौरा करून प्रगत शेती तंत्रज्ञान आत्मसात केले आहे. या अभ्यास दौऱ्यात त्यांनी फ्रान्स, जर्मनी, स्पेन, हॉलंड, स्वित्झर्लंड, नेदरलँड अशा देशातील शेतीचा अभ्यास केला. या अभ्यास दौऱ्यातून मिळालेल्या शेतीविषयक माहितीचा आणि ज्ञानाचा आपल्या मायभूमीसाठी विनियोग चालवला आहे. यामुळे परिसरातीलच नव्हे तर अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीविकासासाठी लाभ होत आहेत.

**माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर.**

# येथे कर माझे जुळती...

स्मरण

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात ३ जानेवारीला सावित्रीबाई फुले, १२ जानेवारीला राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद, २३ जानेवारीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी केली जाते, त्यांच्या कार्याविषयी...**



## राजमाता जिजाऊ

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री जिजाऊ यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड येथे झाला. जिजाबाईंची शिकवण आणि संस्कारामुळे शिवाजी महाराजांना स्वतंत्र राज्य निर्मितीची प्रेरणा मिळाली. जिजाबाईंनी केलेल्या संस्कारांमुळेच शिवाजीराजे घडले. शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीती शिकवली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोर शिक्षा देण्याचे धाडस दिले. शिवबांच्या शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर बारकाईने लक्ष ठेवले. शहाजीराजांची कैद व सुटका, अफझलखानाचे संकट, आग्रा येथून सुटका अशा अनेक प्रसंगांत शिवरायांना जिजाबाईंचे मार्गदर्शन लाभले. शिवराय मोठ्या मोहिमांवर असताना, जिजाबाई राज्यकारभारावर लक्ष ठेवत असत. सदरेवर बसून तंटे सोडवत.



## स्वामी विवेकानंद

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ मध्ये कलकत्यातील सीमलापल्ली गावात झाला. संन्यास घेण्यापूर्वी त्यांचे नाव नरेंद्रनाथ विश्वनाथ दत्त असे होते. ते रामकृष्ण परमहंसांचे शिष्य होते.

१८८४ मध्ये ते बी.ए.ची परीक्षा पास झाले. १० मे १८९३ रोजी राजा अजितसिंग खेत्री यांनी नरेन्द्रांना विवेकानंद नावाने सन्मानित केले. १८ सप्टेंबर १८९३ साली अमेरिकेच्या शिकागो शहरात, शिकागो-आर्ट इन्स्टिट्यूट येथे सर्वधर्मीय परिषदेत त्यांनी भाषण दिले. भाषणाची सुरुवात 'अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो,' अशी करताच जमावाने टाळ्यांचा सलग दोन मिनिटे गजर केला. नरेंद्र उर्फ स्वामी विवेकानंद यांनी संपूर्ण जगात वेदांताचा प्रसार केला. तत्कालीन अमेरिकन वृत्तपत्रांनी भारतातून आलेला 'एक वादळी व्यक्तिमत्त्वाचा संन्यासी,' असे स्वामींचे वर्णन केले. अमेरिका आणि इंग्लंडमध्ये अनेक वेदान्त सोसायट्यांची स्थापना केली. ४ जुलै १९०२ या दिवशी कोलकात्याजवळील बेलूर मठात त्यांनी समाधी घेतली.

## नेताजी सुभाषचंद्र बोस

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी झाला. १९२१ साली भारतीय नागरी सेवेच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊनही त्यांनी नोकरी स्वीकारली नाही. ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष



म्हणून दोन वेळा निवडून आले होते.राष्ट्रीय सभेतील ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचे मतभेद झाल्याने त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी फॉरवर्ड ब्लॉक हा पक्ष स्थापन केला. ब्रिटिशांनी त्यांना नजरकैदेत ठेवले असताना तेथून त्यांनी वेशांतर करून सुटका करून घेतली. १९४१ च्या एप्रिलमध्ये ते जर्मनीला पोहोचले. तेथे त्यांनी फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. जपानने १९४२ च्या पूर्वाधात आग्नेय आशियातील ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जिंकले, त्या वेळी तेथील ब्रिटिश सैन्यातील हजारो भारतीय सैनिक जपानच्या हाती लागले. युद्धबंदी झालेल्या भारतीय सैनिकांची एक फलटण, कॅप्टन मोहनसिंग यांच्या मदतीने रासबिहारी बोस यांनी तयार केली. तिला आझाद हिंद सेना नाव देऊन त्याचे नेतृत्व करण्याची विनंती सुभाषचंद्र बोस यांना करण्यात आली. सिंगापूर येथे नेताजींनी १९४३च्या ऑक्टोबरमध्ये आझाद हिंद सरकार स्थापन केले. १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात त्यांचे निधन झाले.





## सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे झाला. त्यांचे वडील खंडोजी नेवसे-पाटील होते. सावित्रीबाईंचा विवाह जोतिबा फुले यांच्याशी झाला. त्यांच्या कार्यात सावित्रीबाईंनी निष्ठेने साथ दिली. महात्मा फुलेंनी सुरु केलेल्या मुलींच्या शाळेत सावित्रीबाईंनी शिक्षिका म्हणून कार्य केले. महाराष्ट्रातील त्या पहिल्या स्त्री शिक्षिका होत. हे काम करत असताना त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. त्यांच्या अंगावर चिखलफेक झाली. त्यांनी हा अपमान सहन करत शिक्षणाचे पवित्र कार्य चालूच ठेवले. अस्पृश्योद्धाराच्या कार्यातही त्यांचा मोलाचा सहभाग होता. महात्मा फुलेंनी बालहत्या-प्रतिबंधगृह आपल्या घरीच सुरू केले. अत्यंत प्रेमाने व मातेच्या वात्सल्याने त्यांनी या मुलांचे संगोपन केले. सावित्रीबाई या स्वयंप्रकाशित स्त्री होत्या. अशा या महान व कर्तबगार स्त्रीचा मृत्यू प्लेगच्या रोग्यांची शुश्रूषा करताना, प्लेगची बाधा झाल्यामुळे १० मार्च १८९७ रोजी झाला.

**(संदर्भ : इयत्ता ८वी आणि ११वी इतिहास/मराठी विश्वकोश)**

**संकलन: गजानन पाटील**




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th January 2018
Date of Publication : 10th of every Month

## स्वयंसहाय्यता गटांना शून्य टक्के व्याजदरांनी बँक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाची योजना

# सुमतीबाई सुकळीकर
## उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना



0%

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

DDU-GKY

उमेद
क्षितिज नवे, विश्वास नवा...

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान
ग्रामविकास विभाग

### कर्जाची रक्कम वेळेत भरा व व्याजाची रक्कम परत मिळवा, यासाठी...

- स्वयंसहाय्यता गटाचा महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानात सहभाग आवश्यक
- एन. आर. एल. एम. च्या संकेतस्थळावर स्वयंसहाय्यता गटाची नोंदणी आवश्यक
- कर्जाच्या हप्त्याची नियमित परतफेड करणे आवश्यक

- व्याज अनुदानाची वाटप रक्कम: रु ७ कोटी ५० लाख
- सन २०१६-१७ मध्ये पात्र स्वयंसहाय्यता गटांची संख्या: ३४,३८१

चला, स्वयंसहाय्यता गटात सहभागी होऊन आयुष्य समृद्ध करू या



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

पंकजा गोपीनाथ मुंडे
मा. मंत्री, ग्रामविकास, महिला व बालविकास

श्री. दादाजी भुसे
मा. राज्यमंत्री, ग्रामविकास

अधिक माहितीसाठी पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह